अकोला । मंगळवार
दि. २२ एप्रिल २०२५
वर्ष : १९ अंक : ५२
पाने : ८ + ४

दैनिक **अजिंक्य भारत** बातम्यांचा गतिमान पाठलाग




www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये




### आजचा सामना

लखनौ
विरुद्ध
दिल्ली

स्थळ : एकाना आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, लखनऊ
वेळ : सायं. ७.३० वाजता.

## ॲटर्नी जनरलची परवानगी घ्या

# अवमान याचिकेसाठी आमची आवश्यकता नाही : सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली, दि. २१** वृत्तसंस्था

**भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी वक्फ प्रकरणी दिलेल्या निकालावरुन न्यायव्यवस्थेवर केलेली टिपण्णीने वाद निर्माण झाला आहे. आज (दि.२१) सर्वोच्च न्यायालयाकडे दुबे यांच्या विरोधात अवमान याचिका दाखल करण्यास परवानगी मागण्यात आली. याचिका दाखल करण्यासाठी तुम्हाला आमच्या मंजुरीची आवश्यकता नाही, असे न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.**



निशिकांत दुबे यांच्या विरोधात अवमान याचिका दाखल करण्यासाठी वकील अनस तन्वीर यांनी परवानगी मागितली. ते सर्वोच्च न्यायालयात वक्फ कायद्याविरुद्ध दाखल केलेल्या एका याचिकेचे प्रतिनिधित्व करत आहेत. या प्रकरणात याचिकाकर्त्याला ॲटर्नी जनरल यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे खंडपीठाने स्पष्ट केले. यानंतर अनस तन्वीर यांनी ॲटर्नी जनरल आर वेंकटरमणी यांना पत्र लिहून त्यांची मंजुरी मागितली आहे.

» सर्वोच्च न्यायालयाने वक्फ कायद्यातील काही तरतुदींबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत, त्यानंतर केंद्र सरकारने पुढील सुनावणीपर्यंत कायद्यातील काही तरतुदींच्या अंमलबजावणीवर बंदी घातली. यावर सरन्यायाधीश संजीव खन्ना हे देशातील सर्व गृहयुद्धांसाठी जबाबदार आहेत.जर सर्वोच्च न्यायालयाने कायदे बनवायचे असतील, तर संसद बंद करावी, अशी टिपण्णी भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी एक्सवर केली होती. दरम्यान, निशिकांत दुबे यांचे विधान त्यांचे वैयक्तिक मत असल्याचे भाजपने म्हटले. पक्षाध्य जेपी नड्डा यांनी पक्षाच्या नेत्यांना अशा प्रकारच्या टिप्पण्या करू नये, असे आवाहन केले आहे.

# राष्ट्रपतींना अंमलबजावणी करण्यासाठी आदेश पाठवावा का?

## मुर्शिदाबाद हिंसा : सुप्रीम कोर्टाचा सवाल





**नवी दिल्ली, दि. २१** वृत्तसंस्था

बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची आणि निमलष्करी दल तैनात करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर कोणताही आदेश देण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी नकार दिला. वक्फ कायद्याविरुद्ध मुर्शिदाबादमध्ये झालेल्या हिंसाचारानंतर न्यायालयाने यावर निर्णय घ्यावा, अशी याचिकाकर्त्याने विनंती केली होती.

न्यायमूर्ती बी आर गवई आणि न्यायमूर्ती ए जी मसीह यांच्या खंडपीठाने यावर कोणताही आदेश दिला नाही. खंडपीठाने याचिकाकर्त्याला विचारले, तुम्हाला वाटते का, की आम्ही राष्ट्रपतींना त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आदेश पाठवावा? आमच्यावर इतरांच्या अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप केल्याचा आरोप होत आहे. न्यायमूर्ती गवई पुढील महिन्यात सरन्यायाधीश होणार आहेत. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी शनिवारी म्हटले होते की, न्यायालय आपल्या मर्यादेपलीकडे जात आहे. त्याचवेळी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटले होते, की न्यायालये राष्ट्रपतींना आदेश देऊ शकत नाहीत. न्यायाधीश एका सुपर पार्लमेंटसारखे वागत आहेत. दुसरीकडे, मुर्शिदाबाद हिंसाचाराशी संबंधित आणखी एका याचिकेवर न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठात सुनावणी झाली. यामध्ये वकिलाने मुर्शिदाबाद हिंसाचारामुळे लोकांच्या स्थलांतराबद्दल सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने (पान २ वर)

## थोडक्यात

### ओमर अब्दुल्ला रामबनला पोहोचले



**श्रीनगर :** रविवारी जम्मू आणि काश्मीरमधील रामबन जिल्ह्यात ढगफुटी आणि भूस्खलनामुळे परिसरात प्रचंड हाहाकार माजला. यामध्ये ३ जणांचा मृत्यू झाला. पोलिसांनी सुमारे १०० लोकांना वाचवले. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला सोमवारी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी रामबनला पोहोचले. खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर उड्डाणाची परवानगी न मिळाल्याने उमर रस्त्याने रामबनला आले. अधिकाऱ्यांनी सांगितले की उमर सायंकाळी ५.३० वाजता पावसाच्या दरम्यान रामबनला पोहोचले आणि पूरग्रस्त भागांची पाहणी करण्यासाठी पायी निघाले. जम्मू-श्रीनगर महामार्गावर (एनएच-४४) १२ हून अधिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात चिखल साचला आहे. काही ठिकाणी २० फुटांपेक्षा जास्त चिखल साचला आहे. महामार्ग पुन्हा सुरू होण्यासाठी पाच ते सहा दिवस लागण्याची शक्यता आहे.

### वेन्स यांनी पाहिले दिल्लीतील अक्षरधाम



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी वेन्स यांनी सोमवारी त्यांच्या पत्नी उषा आणि मुले इवान, विवेक आणि मिराबेलसह दिल्लीतील अक्षरधाम मंदिराला भेट दिली. ते तिथे सुमारे १ तास राहिले. उपराष्ट्रपती झाल्यानंतर जेडी वेन्स यांचा हा पहिलाच अधिकृत भारत दौरा आहे. ते भारतात ४ दिवस राहणार आहेत. वेन्स यांचे विमान सकाळी ९:४५ वाजता दिल्लीच्या पालम विमानतळावर उतरले. येथे त्यांचे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी स्वागत केले. विमानतळावरच त्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. कलाकारांनी वेन्स, त्यांची पत्नी आणि मुलांसमोर पारंपारिक नृत्य सादर केले.

### रोहित पवारांनी विरोधी पक्षात काम केले पाहिजे

**मुंबई :** 'शरद पवारांची राष्ट्रवादी आणि अजित पवारांची राष्ट्रवादी वेगळी कुठे आहे? मी ती राष्ट्रवादी वेगळी मनातच नाही. ते एकच आहेत. पवार कुटुंबीयांनी महाराष्ट्राला वेड्यात काढण्याचे काम आजपर्यंत केलं आहे,' असं लक्ष्मण हाके यांनी म्हटलं आहे. महाविकास आघाडीमध्ये सर्व पक्ष विशेषत: राष्ट्रवादी पक्ष शरद पवार हे सत्तेच्या बाहेर कधीच राहू शकत नाहीत, भुजबळ यांना मंत्रिपदावरून डावलण्यात आले, कारण ती जागा एकतर रोहित पवार किंवा जयंत पाटील यांना ठेवली होती, असं हाके यांनी म्हटलं आहे. रोहित पवारांनी विरोधी पक्षात काम केलं पाहिजे. लोकनेता व्हायचं असेल तर जनसामान्य लोकांची कामं केली पाहिजेत, असा सल्लाही यावेळी हाके यांनी दिला आहे.

## राहुल गांधींच्या मनावर परिणाम झालाय - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई, दि. २१** वृत्तसंस्था

राहुल गांधी सातत्याने परदेशात जाऊन भारताची, लोकशाही संस्था आणि संविधानाची बदनामी करत आहेत. निवडणुकीत सातत्याने पराभूत झाल्यामुळे त्यांच्या मनावर परिणाम झालाय, अशी थेट टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

फडणवीस म्हणाले, विरोधी पक्षाचा नेता म्हणून जर कोणी परदेशात जाऊन देशाचं नाव खराब करत असेल, तर तो कोणाचा अजेंडा राबवतोय, हा संशय निर्माण होतो. त्यांना पराभव पचलेला नाही, म्हणून




राहुल गांधी निवडणूक प्रक्रिया आणि मतदार यादीवरच प्रश्न उपस्थित करत आहेत. हा केवळ बालिशपणा आहे. ते पुढे म्हणाले, राहुल गांधींनी देशात राहून काम करावं, जनतेत विश्वासार्हता निर्माण करावी. परदेशात फिरून भारताची निंदा करून मते (पान २ वर)

## विदर्भातील ११ शहरांमध्ये ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान

**चंद्रपूर, दि. २१** वृत्तसंस्था

राज्यासह चंद्रपूर जिल्हा सध्या होरपळून निघत आहे. मागील काही दिवसांपासून सूर्य अक्षरशः आग ओकत असून पार ४० अंश सेल्सिअसच्या पुढे आहे. चंद्रपूरमध्ये सोमवारी ४५.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, ते राज्यातील सर्वात उष्ण शहर ठरले आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने तीन दिवसांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी केला असून नागरिकांना बाहेर पडताना



काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

नागपूर येथील प्रादेशिक हवामान केंद्राने दिलेलया माहितीनुसार, विदर्भातील ११ शहरांमध्ये ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान नोंदवले गेले आहे. यामध्ये चंद्रपूरमध्ये सर्वाधिक ४५.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले आहे. गेल्या आठवड्यापासून जिल्ह्यात तीव्र उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागत आहे आणि चंद्रपूर जिल्ह्यातील एक-दोन ठिकाणी २४ एप्रिलपर्यंत उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. ब्रम्हपुरी तहसीलमध्ये ४५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आणि ते विदर्भातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात उष्ण शहर ठरले आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासून चंद्रपुरातील तापमानात वाढ होऊ लागली आहे. सलग तीन दिवस चंद्रपूरमधील (पान २ वर)

## राहुल गांधी भारतीय नागरिक आहेत का..?

**लखनऊ, दि. २१** वृत्तसंस्था

राहुल गांधी भारताचे नागरिक आहेत का ? याबाबत १० दिवसात उत्तर सादर करा असे निर्देश अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठाने आज, सोमवारी दिलेत. राहुल गांधींच्या नागरिकत्त्वाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना हायकोर्टाने हे आदेश दिलेत.



राहुल गांधींकडे भारत आणि ब्रिटन, असे दुहेरी नागरिकत्व असल्याचा आरोप आहे. अनेक वर्षांपासून हा मुद्दा चर्चेत आहे. दरम्यान, आता केंद्र सरकारला राहुल गांधींच्या नागरिकत्वाबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा लागेल आणि १० दिवसांच्या आत न्यायालयाला कळवावे लागेल. या प्रकरणाची पुढील सुनावणी ५ मे रोजी होणार आहे. राहुल गांधींच्या नागरिकत्त्वासंदर्भात केंद्र सरकारने सोमवार एक स्टेटस रिपोर्ट दाखल केला. पण न्यायालयाने त्याला पुरेसे (पान २ वर)

## आपण १ हजार वर्षांचे भविष्य ठरवत आहोत - मोदी

### नागरी सेवा दिन : ई-कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन

**नवी दिल्ली, दि. २१** वृत्तसंस्था

आपण आपल्या संविधानाचे ७५ वे वर्ष साजरे करत आहोत आणि हे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीचे वर्ष देखील आहे. २१ एप्रिल १९४७ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांनी तुम्हा सर्वांना भारताची स्टील फ्रेम म्हटले. त्यांनी स्वतंत्र भारताच्या नोकरशाहीसाठी नवीन मर्यादा घालून दिल्या. एक असा नागरी सेवक जो राष्ट्रसेवा करणे हे आपले सर्वोत्तम कर्तव्य मानतो, जो लोकशाही पद्धतीने प्रशासन चालवतो, जो प्रामाणिकपणा, शिस्त आणि समर्पणाने परिपूर्ण असतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सरकारी धोरणे



बनवण्याची आणि अंमलात आणण्याची जबाबदारी आयएएस-आयपीएस यांच्या खांद्यावर आहे. त्यांच्या सन्मानार्थ, २००६ पासून २१ एप्रिल रोजी नागरी सेवा दिन साजरा केला जातो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १७ व्या नागरी सेवा दिनाच्या कार्यक्रमात भाग घेतला. यावेळी त्यांनी जिल्ह्यांच्या एकूण विकासात सार्वजनिक प्रशासनातील उत्कृष्टतेसाठी पंतप्रधान पुरस्कार आणि सार्वजनिक प्रशासनातील उत्कृष्टतेसाठी पंतप्रधान पुरस्कारातून निवडक नवोपक्रम या विषयावरील ई-कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन केले. कार्यक्रमाला संबोधित करताना ते म्हणाले, काही काळापूर्वी मी लाल किल्ल्यावरून म्हटले होते की, आजच्या भारताला पुढील १ हजार वर्षांचा पाया मजबूत करायचा आहे. जर आपण एका दृष्टीने पाहिले तर १००० वर्षांच्या सहस्त्रकाची पहिली २५ वर्षे आधीच निघून गेली आहेत. हे नवीन शतकाचे २५ वे वर्ष आहे आणि नवीन सहस्त्रकाचे २५ वे वर्ष देखील आहे. आज आपण ज्या धोरणांवर काम करत आहोत, जे निर्णय घेत आहोत, ते १००० वर्षांचे भविष्य ठरवणार आहेत.

## झारखंडमध्ये चकमकीत ६ नक्षलवादी ठार

**बोकारो :** झारखंडमधील बोकारो जिल्ह्यातील लालपानिया भागातील लुगू टेकड्यांमध्ये राज्य पोलिसांसह केंद्रीय राखीव पोलिस दलाने ही संयुक्त कारवाई केली. या कारवाईदरम्यान, आज पहाटे, लालपानियाच्या लुगु टेकड्यांमध्ये सुरक्षा दलांनी ६ नक्षलवाद्यांना ठार केले. या कारवाईत सहभागी असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळावरून एक एसएलआर आणि एक इन्सास रायफल जप्त केली. केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) अधिकाऱ्यांनी सांगितले की, नक्षलवाद्यांशी झालेल्या चकमकीत सैनिकांना कोणतीही दुखापत झाल्याचे वृत्त नाही. शोध मोहिमेसोबत अधूनमधून गोळीबार सुरू आहे.

## पोप फ्रान्सिस यांच्या निधनानंतर चार भारतीय कार्डिनल चर्चेत!

### नवीन पोप निवडीत बजावणार मतदानाचा हक्क

**व्हॅटिकन सिटी, दि. २१**

गेल्या काही काळापासून आजारी असलेल्या पोप फ्रान्सिस यांचे पवित्र इस्टरच्या दुसऱ्या दिवशीच सोमवारी (२१ एप्रिल) निधन झाले. त्यांच्या निधनानंतर आता त्यांचा उत्तराधिकारी निवडण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

परंपरेनुसार, ८० वर्षांखालील १३८ कार्डिनल्सची कॉन्क्लेव्ह (गोपनीय सभा) बोलावली जाईल, जे पुढील पोपची निवड करतील. मीडिया रीपोर्टनुसार, या यादीत ४ भारतीय कार्डिनल्सचाही समावेश आहे. भारतामध्ये एकूण ६ कार्डिनल्स आहेत, पण त्यापैकी



दोघे ८० वर्षांहून अधिक वयाचे असल्याने त्यांना नवीन पोपच्या निवडीत मतदानाचा अधिकार नाही.

कार्डिनल जॉर्ज जेकब कुवकड: हे भारतातील सर्वात तरूण कार्डिनल आहेत. त्यांचे वय ५१ वर्षे आहे. केरळच्या सायरो-मलबार चर्चचे आर्चबिशप असलेले जॉर्ज हे वॅटिकनचे मुत्सद्दी आहेत. त्यांनी पोप फ्रान्सिसच्या परदेश दौऱ्यांचे आयोजन केले होते. २००४ मध्ये त्यांना पाद्री म्हणून दीक्षा मिळाली आणि २० वर्षांनी त्यांना कार्डिनल बनवण्यात आले. कार्डिनल अँथनी पूला: भारतातील पहिले दलित कार्डिनल होण्याचा (पान २ वर)

# सन २०६० पर्यंत भारत सर्वाधिक मुस्लीम लोकसंख्येचा देश!

**नवी दिल्ली, दि. २१** वृत्तसंस्था

**सन २०६० पर्यंत भारत जगातील सर्वाधिक मुस्लीम लोकसंख्या असलेला देश असेल. च्या अहवालातून ही बाब समोर आली आहे. सध्या मुस्लीम लोकसंख्येच्या बाबतीत इंडोनेशिया पहिल्या क्रमांकावर आहे.**

अहवालानुसार २०६० मध्ये भारताच्या एकूण लोकसंख्येचा १९.४ टक्के हिस्सा मुस्लीम असेल, पाकिस्तानमध्ये ९६.५ टक्के आणि बांगलादेशमध्ये ९१.९ टक्के मुस्लीम असतील. ७७ वर्षांपूर्वी झालेल्या फाळणीत भारत दोन भागांमध्ये विभागला गेला आणि पाकिस्तान एक स्वतंत्र देश बनला. फाळणीच्या वेळी लाखो हिंदू आणि मुस्लिमांना आपले घर, कुटुंब सोडून एका देशातून दुसऱ्या देशात जावे लागले. फाळणीनंतर पाकिस्तान मुस्लीम बहुल देश बनला आणि भारत हिंदू



बहुल देश राहिला. २४ वर्षांनी पुन्हा एक फाळणी झाली आणि पाकिस्तानचा पूर्वेकडील भाग वेगळा झाला, ज्यातून बांगलादेशची निर्मिती झाली. भारताच्या या फाळणीनंतर निर्माण झालेल्या पाकिस्तान आणि बांगलादेशमध्ये मुस्लीम बहुसंख्य आहेत, तर भारतात मुस्लीम एक अल्पसंख्यांक समुदाय आहे. तरीही, जगात सर्वाधिक मुस्लीम भारतातच राहतात. पाकिस्तानमध्ये ९६.४ टक्के लोकसंख्या मुस्लिम आहे, तर बांगलादेशमध्ये ९०.६ टक्के मुस्लीम आहेत आणि भारतात एकूण लोकसंख्येपैकी फक्त १४.९ टक्के लोक मुस्लीम आहेत. मात्र, आकडेवारीनुसार पाहिले तर या तिन्ही देशांमध्ये सर्वाधिक मुस्लीम भारतातच राहतात. Pew Research च्या अहवालात २०६० सालासाठी अंदाज दिला आहे. या अंदाजात तिन्ही देशांच्या मुस्लीम लोकसंख्येचा वाढीचा दर आणि जन्मदर विचारात घेऊन ३५ वर्षांनी भारत, पाकिस्तान आणि बांगलादेशात किती मुस्लिम असतील, हे सांगितले आहे.

**भारतात १९ कोटी ४८ लाख १० हजार मुस्लीम :** Pew Research च्या अहवालानुसार भारतात एकूण १९ कोटी ४८ लाख १० हजार मुस्लीम आहेत. पाकिस्तानमध्ये १८ कोटी ४० लाख, तर बांगलादेशमध्ये १४ कोटी ४० लाख २० हजार मुस्लीम राहतात. जर भारताची फाळणी झाली नसती आणि पाकिस्तान व बांगलादेश वेगळे देश बनले नसते, तर आज जगात सर्वाधिक मुस्लीम लोकसंख्या असलेला देश भारत असता. या अहवालात दिलेले लोकसंख्येचे आकडे २०१५ सालचे आहेत. जर हे तीनही देश एकच असते, तर मुस्लीम लोकसंख्या एकूण ५२ कोटी २८ लाख ३० हजार असती आणि ३५ वर्षांनी ती सुमारे ८० कोटी झाली असती.



# ठाकरे बंधूंच्या युतीला ठाकरे गटासोबतच मनसेतून विरोधाचा सूर

**मुंबई : दि. २१** वृत्तसंस्था

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एका मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या शक्यतांच्या चर्चांना उधाण आले आहे. अनेक वर्षांपासून केवळ चर्चेपुरती मर्यादित असलेली ही शक्यता यावेळी मात्र प्रत्यक्षात उतरण्याची चिन्हं दिसत आहेत. आगामी महापालिका निवडणुकांसाठी राज ठाकरे यांच्या मनसेने आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने (ठाकरे गट) पुन्हा हातमिळवणी केल्यास राज्याच्या राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारूण पराभवानंतर आता महापालिका निवडणुकांसाठी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसह महायुती आणि महाविकास आघाडीनेही जोरदार तयारी सुरू केली आहे. विशेष म्हणजे राज आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येण्यासाठी काही ठोस पावलंही उचलल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे यावेळी तरी हे दोघे बंधु एकत्र येणार का, मनसे-ठाकरे गटाची युती होणार का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. पण या युतीसाठी मात्र मनसे आणि ठाकरे गटातील नेत्यांकडूनच विरोधाचा सुरू उमटताना दिसत आहे.



गेल्या काही वर्षांत एकमेकांविरोधात टोकाच्या टीका आणि मतभेद असताना या युतीच्या चर्चांवरूनही दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये सध्या वाकयुद्ध सुरु असल्याने वातावरण तापले आहे. विशेषतः, कधी काळी राज ठाकरे यांनी 'माझ्या विठ्ठलाला बडव्यांनी घेरलंय' असं म्हणत शिवसेना सोडली होती. आज तेच 'बडवे' म्हणजे पक्षातील वरिष्ठ सल्लागार आणि मध्यस्थ या संभाव्य एकत्र येण्याच्या प्रयत्नांमध्ये अडथळा ठरत असल्याचं बोललं जात आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्यास राजकीय पटलावर मोठी हलचाल होऊ शकते, पण त्यांच्या सभोवतालच्या मंडळींनी हे समीकरण कसे हाताळले जाते, यावर या युतीचे भवितव्य अवलंबून असेल.

राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंसोबत युती करण्याची भूमिका मांडल्यानंतर काही क्षणातच उद्धव ठाकरे यांनीदेखील सकारात्मक प्रतिसाद दिला. पण त्याचवेळी मनसे नेते संदीप देशपांडे यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला उद्धव ठाकरेंनी भाजपसोबत युती तोडून त्यांना धोका दिला, आता ते पवारांनाही धोका देतील, असा आरोप त्यांनी यावेळी केला. तसेच, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना मनसेने मशिदीवरील भोंग्यांविरोधात आंदोलन केले होते, त्या वेळी मनसेच्या कार्यकर्त्यांवर १७ हजार गुन्हे दाखल केले होते. याची आठवण करून देत त्यांनी जुना वाद पुन्हा उकरून काढला.

दुसरीकडे, ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनीही राज ठाकरे यांच्यावर निशाणा साधत, ''महाराष्ट्रद्रोही कोण हे जर राज ठाकरे यांना समजत नसेल, तर त्यांच्यासाठी प्रशिक्षण वर्गच सुरू करावा लागेल,'' असा टोला लगावला. या आरोप-प्रत्यारोपांमुळे ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या शक्यतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, दोन्ही पक्षातील 'दुसरी फळी'च युतीच्या मार्गातील मुख्य अडथळा ठरू शकते, असे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.

# तुतारी गटानेही अजित पवारांच्या नेतृत्वात एकत्र यावे

**मुंबई, दि. २१** वृत्तसंस्था

उद्धव ठाकरे आणि आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चा सध्या सुरू आहेत. दोन्ही ठाकरे बंधूंनी सकारात्मक संकेत दिल्याने मनसे-ठाकरे गटाच्या युतीची शक्यता आहे. यावर अनेक राजकीय प्रतिक्रिया देखील समोर आल्या आहेत.

ठाकरे गटानंतर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवारांनी ट्विट करत ठाकरे बंधूंच्या संभाव्य मनोमिलनावर समाधानकारक प्रतिक्रिया दिली होती. त्यानंतर अजित पवार गटातील अमोल मिटकरींकडूनही राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने देखील अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली एकत्र यावं असे विधान केले आहे.अमोल मिटकरी म्हणाले, 'महाराष्ट्राच्या भल्यासाठी दोन भाऊ एकत्र येत असतील तर त्याचा स्वागतच आहे.

## अमोल मिटकरींचे आवाहन




राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा आदर्श घेऊन तुतारी गटानेही अजित दादांच्या नेतृत्वात एकत्र यावं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्रात भक्कम होण्यासाठी जर तुतारी गटाला वाटत असेल तर त्यांनी अजितदादांच्या नेतृत्वात एकत्र यावं' असे आवाहन त्यांनी केले.

**रोहित पवार काय म्हणाले होते?**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेचं स्वागत करत सर्वच कुटुंबांनी एकत्र यावं असं म्हटलं होतं. मराठी अस्मितेला नख लावू पाहणाऱ्या महाराष्ट्रद्रोही शक्तीच्या विरोधात ठाकरे कुटुंब एकत्र येत असेल तर मराठी मनासाठी हा सुवर्णक्षण असल्याचे रोहित पवार यांनी म्हटलं होतं. केवळ ठाकरे कुटुंबानेच नाही तर सर्वच कुटुंबांनी महाराष्ट्र धर्म जपण्यासाठी एकत्र यायला हवं आणि यातच महाराष्ट्राचं हीत असल्याचं वक्तव्य रोहित पवारांनी केलं होते. यावर आता अमोल मिटकरींनी देखील प्रतिसाद दिल्याचे पाहायला मिळत आहे.

# राज्यात उकाडा वाढला; चंद्रपूरचे तापमान ४४ अंशावर

## नागरिक हैराण



**मुंबई, दि. २१** वृत्तसंस्था

राज्यातील काही भागात तापमानात वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. विदर्भासह मराठवाड्यातील झालेल्या तापमान वाढीमुळे नागरिकही हैराण झाले आहेत. राज्यात रविवारी चंद्रपूरने सर्वात जास्त म्हणजे ४४.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद केली आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भ आणि मराठवाड्यात उष्णता आणखी वाढणार आहे. आज विदर्भातील नागपूर आणि अकोला येथे उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड या तीन जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज असून या जिल्ह्यांना उष्णतेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### चार जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता

सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. तर उर्वरित राज्यात अंशतः ढगाळ वातावरण आणि उष्ण हवामानाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

विदर्भातील नागपूर, अकोला, अमरावती, चंद्रपूर, वर्धा आणि ब्रह्मपुरी या शहरांमध्ये देखील सर्वात जास्त तापमान होते. विदर्भातील अनेक शहरांचे तापमान ४० अंशाच्या वर आहे. उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबारमध्येही तापमानाचा पारा ४३ अंशावर गेला आहे. दरम्यान, राज्यात उन्हाची तीव्रता आणखी वाढणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. पुढील ३ ते ४ दिवस विदर्भातील अनेक शहरांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्याचवेळी काही जिल्ह्यांत हवामान विभागाने तुरळक पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे.

# थोडक्यात

## बालगुन्हेगारी नियंत्रणासाठी 'केअर'च्या धर्तीवर 'हेल्पडेस्क'

**नागपूर :** वाढत्या बालगुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्यात 'केअर' नावाने पहिला हा उपक्रम नागपुरात राबविण्यात आला होता. आता 'केअर'च्या धर्तीवर राज्यभरात 'हेल्पडेस्क' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. गृहमंत्रायलयाने सकारात्मकता दाखविल्यामुळे या उपक्रमासाठी राज्यातील पाच शहरांची निवड करण्यात आली आहे. बाल गुन्हेगारांना मुख्य प्रवाहात आणण्यासह त्यांचे समुपदेशन करण्यासाठी राज्यातील पहिला उपक्रम नागपूर पोलिसांनी राबविला होता. तत्कालिन पोलीस आयुक्त डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी 'एन-कॉप्स एक्झलेन्स' या इमारतीत 'केअर' (कॉऊंसिलींग अँड रिफॉर्मेटिव्ह एज्युकेशन सेंटर) या उपक्रमाची सुरुवात केली होती. विधीसंघर्षग्रस्त बालकांना गुन्हेगारी सोडून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी येणाऱ्या अडचणींची सोडवणूक व्हावी, यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये बाल कल्याण पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली होती. विधिसंघर्षग्रस्त बालकांनी शिक्षण घेणे आवश्यक आहे. घडलेला गुन्हा पुन्हा घडू नये,अशी स्थिती निर्माण करीत परिवर्तनाच्या नव्या मार्गावर आणावे, पोलिसांनीही बाल गुन्हेगारांच्या नजरेने न बघता सामान्य मुलांप्रमाणे बघावे, हा उद्देश केअर उपक्रमात राबविण्यात आला होता. त्याच धर्तीवर आता राज्यात हेल्पडेस्क नावाने उपक्रम सुरु करण्यात आला आहे. मुलांचे हक्क व किशोरवयीन गुन्हेगारांचे पुनर्वसन करण्यासाठी, कायदेशीर, सामाजिक, समुपदेशन सेवा पुरविण्यासाठी राज्यातील निरीक्षणगृहांमध्ये 'हेल्पडेस्क' स्थापन करण्यात आला आहे. विधीसंघर्षग्रस्त बालक किंवा न्याय प्रविष्ट प्रकरण असलेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी 'हेल्पडेस्क' काम करणार आहे. सध्या पुणे, ठाणे, लातूर, नागपूर, यवतमाळ या पाच शहरांचा या उपक्रमात समावेश करण्यात आला आहे.

## विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षेत पुन्हा गोंधळ



**मुंबई:** विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या विधी अभ्यासक्रमांच्या परीक्षेत पुन्हा गोंधळ समोर आला आहे. महाविद्यालयांमध्ये या परीक्षांदरम्यान चुकीची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना देण्याच्या घटना घडल्या आहेत. यापैकी पहिली घटना ८ एप्रिल रोजी घडली, तर दुसरी घटना शनिवारी घडली. विद्यापीठाच्या कारभारावर विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.चेंबुरच्या एका महाविद्यालयात शनिवारी विधी तीन वर्षे अभ्यासक्रमाच्या सहाव्या सत्राची आणि पाच वर्षे अभ्यासक्रमाच्या दहाव्या सत्राची परीक्षा सुरू होती. भारतीय साक्ष अधिनियम या विषयाचा पेपर या विद्यार्थ्यांना मिळणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात त्यांना कालबाह्य झालेल्या पुरावाविषयक कायदा या विषयाची प्रश्नपत्रिका देण्यात आली. आम्ही सुधारित अभ्यासक्रमाप्रमाणे अभ्यास केला असताना परीक्षेच्या वेळी महाविद्यालयाने आम्हाला जुन्या अभ्यासक्रमावर आधारीत प्रश्नपत्रिका दिली. त्यामुळे आमचा गोंधळ उडाल्याचे एका विद्यार्थ्याने सांगितले. विद्यार्थ्यांनी ज्या अभ्यासक्रमावरून तयारी केली होती, त्यापैकी काहीच प्रश्न या प्रश्नपत्रिकेत नव्हते. याप्रकरणी विद्यार्थ्यांचा अर्धा तास वाया गेला. विद्यापीठाने विद्यार्थ्यांना अर्धा तास वाढवून दिला असला, तरी मानसिक तणावाचा सामना विद्यार्थ्यांना करावाच लागला. असे प्रकार वारंवार घडत गेले तर याला जबाबदार कोण, असा सवालही उपस्थित केला आहे.

## पाण्यासाठी १०० कोटी; जलसंपदा विभागाकडून पाणीदरात मोठी वाढ

**पिंपरी:** पिंपरी-चिंचवड शहराला मावळातील पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका जलसंपदा विभागाला दरवर्षी कोट्यवधींचे शुल्क भरते. जलसंपदा विभागाकडून दरवर्षी त्या शुल्कात १० टक्के वाढ केली जाते.

पुढच्या काही वर्षांत पवना तसेच, आंद्रा आणि भामा-आसखेड या तीनही धरणांमधून पाणी आरक्षित असल्याने पालिकेला सुमारे १०० कोटी रुपयांहून अधिक रक्कम जलसंपदा विभागाला द्यावी लागणार आहेत. परिणामी, पाणी महाग होत असून पाणीपुरवठा, शुद्धीकरण व वितरण व्यवस्थापनावर पालिकेस मोठा खर्च करावा लागतो. गेल्या चार वर्षांमध्ये जलसंपदा विभागाला द्याव्या लागणाऱ्या रकमेत तब्बल तिपटीने वाढ झाली आहे.शहराला पवना धरणातून ५१०, आंद्रा धरणातून १०० एमएलडी तसेच, एमआयडीसीकडून ३० असा एकूण ६४० एमएलडी पाणीपुरवठा दररोज शहराच्या अर्धा भागास केला जातो. तसेच, भामा-आसखेड धरणात पालिकेचे १६७ एमएलडी पाणी आरक्षित आहे. ती पाणी योजना अद्याप सुरू झालेली नाही. तरीही पालिकेस त्याचे शुल्क जलसंपदा विभागास दरवर्षी भरावे लागते.शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या पुढे पोहचली आहे.

त्यामुळे पाणीप्रश्न गंभीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# 'रेल्वे' विरोधात शेतकरी रस्त्यावर; वसगडेत ठिय्या आंदोलन


**पलूस, दि.२१** वृत्तसंस्था

मिरज-पुणे रेल्वेमार्ग दुहेरीकरणात शेतकऱ्यांच्या जमिनीवर प्रशासनाने अतिक्रमण करीत ताबा घेतला होता. विवादित शेतजमिनीची संयुक्त मोजणी सप्टेंबर २०२३ मध्ये पार पडली आहे. मोजणीनुसार नवीन रेल्वे मार्गाच्या दोन्ही बाजूस शेतजमिनीमध्ये रेल्वे विभागाचे अतिक्रमण आढळून आल्याचे स्पष्ट झाले. तरीही सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत शेतकऱ्यांवर अन्याय करीत असल्याचे मत आमदार डॉ. विश्वजित कदम यांनी व्यक्त केले.जमिनीचा मोबदला मिळावा यासह इतर मागण्यांसाठी रेल्वे प्रशासनाविरोधात वसगडे येथील शेतकऱ्यांनी स्वतःच्या जागेत ठिय्या आंदोलन सुरू केले. त्या आंदोलनास त्यांनी भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. रविवारी सकाळी १० वाजता ठिय्या आंदोलनास सुरुवात करण्यात आली. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी व रेल्वे प्रशासनाला देण्यात आले आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे, या घोषणेने परिसर दणाणून सोडला. आंदोलन केल्यानंतर प्रशासनाला लगेच जाग येते. तहसीलदार दीप्ती रिठे, प्रांताधिकारी रणजित भोसले जिल्हाधिकारी यांनी २३ तारखेला शेतकऱ्यांसोबत बैठकीचे आयोजन केले असल्याचे पत्र शेतकऱ्यांना दिले.

# मानसरोवर यात्रा लवकरच सुरू होणार

**राहाता, दि. २१** वृत्तसंस्था

चीन विरोधात आम्ही सर्वपरीने तयार असून, सिक्कीम सीमावर्ती राज्य असून, चीन-नेपाळ-भूतान अशा तीन देशांच्या आंतरराष्ट्रीय सीमाशी संलग्न आहे. डोकलाम वादानंतर चीन सीमेचा विषय अधिक संवेदनशील झाला. मात्र, आता शांतता असून, लवकरच मानसरोवर यात्रा सुरू होण्याच्या तयारीत आहे, असे सिक्किमचे मुख्यमंत्री प्रेम सिंह तमांग यांनी सांगितले. सिक्किमचे मुख्यमंत्री प्रेम सिंह तमांग यांनी काल, शनिवारी सायंकाळी उशिरा शिर्डीत साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी गृहनिर्माण व कामगार, श्रमिक मंत्री भीम हांग लिंबू, विधानसभा अध्यक्ष एम. एन. शेरपा, विधानसभा उपाध्यक्ष राज कुमारी थापा तसेच मंत्रिमंडळातील इतर सहकारी उपस्थित होते. दर्शनानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री प्रेम सिंह तमांग यांनी चीनविरोधात आम्ही सर्वपरीने तयार असल्याचे स्पष्ट करीत अलीकडेच उत्तर सिक्कीम हिमालय पार तिबेट पठारावर भारतीय सैन्याने पहिल्यांदाच शक्तिप्रदर्शन केले, ही बाब



कौतुकास्पद आहे. २०१४ नंतर सैन्यदल मजबूत झाले असून, शक्तिशाली झाले आहे. पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या कामाला संपूर्ण पाठिंबा असून, भाजप हा मोठा भाऊ आहे. पंतप्रधान मोदी सिक्कीमवर खूप प्रेम करत असल्याने त्यांना मोठा भाऊ मानतो. लहान होतो तेव्हापासून साईबाबांचा मी भक्त आहे. मात्र, कधी शिर्डीला येणे झाले नाही. साईबाबांचे बोलवणे आल्याने आपले शिर्डीला साईदर्शनासाठी पहिल्यांदाच येणे झाले आहे. दरवर्षी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येणार आहे. अशी इच्छा यावेळी मुख्यमंत्री प्रेम सिंह तमांग यांनी व्यक्त केली. सिक्कीम राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात आणि गावात साईबाबांचं मंदिर आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

# ३१व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रवीण गायकवाड यांची निवड

**मुंबई, दि.२१** वृत्तसंस्था



अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित ३१व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. याबाबतची माहिती परिषदचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी दिली.

शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून समता, बंधुता व एकात्मता ही मूल्ये केंद्रस्थानी ठेवून गेली ३५ वर्षे सामाजिक प्रबोधन व परिवर्तनासाठी गायकवाड कार्यरत आहेत. 'मराठे शूद्र, हिंदू की ब्राम्हणी, आरक्षण, शिवचरित्रातून रामदास व दादोजी कोंडदेव हटावो, 'संभाजी ब्रिगेड : एक अभ्यास', 'मराठा क्रांती मोर्चा' यांसारख्या महत्त्वपूर्ण ग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे. याशिवाय त्यांनी सामाजिक व ऐतिहासिक विषयांवर ३००० हून अधिक व्याख्याने दिली आहेत.

या संमेलनाचे आयोजन ९ व १० मे २०२५ रोजी कराड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार आहे. संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते होईल. ग्रंथदिंडी, उद्घाटन समारंभ, परिसंवाद, चर्चासत्र, कथाकथन, कविसंमेलन असे विविध कार्यक्रम संमेलनात होणार असून देशभरातून सुमारे ९०० साहित्यिक यामध्ये सहभागी होणार आहेत.

याआधी हे संमेलन पुणे, मुंबई, नांदेड, उदगीर, तुळजापूर, लातूर, धाराशिव, वणी, रत्नागिरी, गोंदिया, शेवगाव, बारामती, मंठा, सोलापूर व छत्रपती संभाजीनगर येथे पार पडले आहे. नारायण सुर्वे, मंगेश पाडगांवकर, द. मा. मिराजदार, शिवाजी सावंत, सुरेश भट, केशव मेश्राम, विश्वास पाटील, सुवर्णा पवार, श्रीपाल सबनीस, गंगाधर पाणतावणे, जनार्दन वाघमारे, भास्कर चंदनशिव, मुरहरी केळे अशा मान्यवरांनी यापूर्वी संमेलनाध्यक्षपद भूषवले आहे.

संमेलनाच्या तयारीसाठी नुकतीच एक बैठक कराड येथे डॉ. शरद गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सर्वानुमते प्रवीण गायकवाड यांची संमेलनाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

# जोतिबा डोंगरावर उधळण्यात आलेला गुलाल काठावर पास

## गुलालामध्ये आढळले केमिकलचे प्रमाण

**कोल्हापूर, दि.२१** वृत्तसंस्था

लाखो भाविकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या दख्खनचा राजा श्री जोतिबा देवाच्या यंदाच्या यात्रेत डोंगरावर उधळण्यात आलेला गुलाल 'सकाळ'ने केलेल्या 'फॅक्टचेक' मध्ये काठावर पास झाला आहे. तेथील एका ठिकाणच्या गुलालामध्ये रसायनाचे (केमिकल) प्रमाण निदर्शनास आले.

दरम्यान, या डोंगरावरील गुलालात मक्याच्या पीठाचा वापर वाढला असून, पर्यावरणपूरकतेकडे सुरू झालेली ही वाटचाल महत्त्वपूर्ण आहे; मात्र, याठिकाणी पूर्णपणे रसायनमुक्त गुलालाचा वापर होणे आवश्यक आहे.

वाडीरत्नागिरीतील चैत्र पौर्णिमाच्या यात्रेची तयारी सुरू झाली की, तिथल्या गुलालात रासायनिक अंश आहे का, असा विषय चर्चेत येतो. दक्षिण दरवाजा नगारखाना, उत्तर दरवाजा कमान डावीबाजू आणि उजव्या बाजूच्या पायऱ्या, काशी विश्वेश्वर मंदिर पायरी या परिसरातील विक्रेत्यांकडून गुलालाची खरेदी केली.



त्यासह मंदिराच्या आवारातील दक्षिण दरवाज्यातून आत आलेल्या दीपमाळ परिसरात उधळलेला गुलालही संकलित केला.या पाच ठिकाणच्या गुलालाचे नमुने शिवाजी विद्यापीठाच्या औद्योगिक रसायनशास्त्र विभागातील प्रयोगशाळेतून तपासून घेण्यात आले. त्यातील दीपमाळ, उत्तरबाजू कमान, पायऱ्या आणि आणि काशी विश्वेश्वर मंदिर परिसरातील गुलालामध्ये रसायनाचे प्रमाण आढळून आले नाही.

दक्षिण दरवाजा नगरखान्याजवळील गुलालात रसायन मिसळल्याचे निदर्शनास आले असून, त्यातील 'पीएच' सहा असून तो काही प्रमाणात 'ॲसिडिक' आहे. मात्र तो मानवी आरोग्यास मोठ्या प्रमाणात धोकादायक नाही, असे दिसून आले. या तपासणीत गुलालामध्ये मक्याच्या पीठाचा वापर होत असल्याचे आढळून आले आहे.

# वीज बिल वसुलीकडे 'महावितरण'चे सपशेल दुर्लक्ष

## 'मोफत' घोषणांमुळे कृषी पंपांचे ७५ हजार कोटी थकीत

**मुंबई , दि.२१** प्रतिनिधी

लोकसभा-विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून झालेल्या 'मोफत'च्या घोषणा, याच काळात वीज थकबाकी वसुलीकडे 'महावितरण'चे झालेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे सर्व ग्राहकांच्या वीज बिलाची थकबाकी तब्बल ९८ हजार कोटी रुपयांवर गेली आहे. धक्कादायक म्हणजे यात एकट्या कृषीपंपांच्या बिलांची थकबाकी ७५ हजार कोटींहून अधिक आहे. थकबाकीचा आकडा फुगत चालला असून, त्याने एक लाख कोटी रुपयांचा टप्पाही ओलांडला असल्याचे उच्चपदस्थांनी 'लोकसत्ता'ला सांगितले.

महायुतीने विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांना ७.५ अश्वशक्तीपर्यंत क्षमता असलेल्या कृषीपंपांसाठी मोफत वीज पुरविण्याची घोषणा केली. त्याचा लाभ राज्यातील ४४ लाख सहा हजार शेतकऱ्यांना होईल आणि त्यासाठी सुमारे १४ हजार ७६१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी २८ जून २०२४ रोजी विधिमंडळात सादर केलेल्या अर्थसंकल्पात नमूद केले होते. राज्यातील कृषीपंपांची संख्या सुमारे ४८ लाख आहे. त्यापैकी ७.५ अश्वशक्तीहून अधिक क्षमतेचे पंप असलेल्या सुमारे चार लाख शेतकऱ्यांनीही वीज बिल भरणे थांबविल्याचे समोर आले आहे.




गेल्या वर्षी लोकसभा व विधानसभा निवडणुका होत्या. त्यामुळे शेतकरी, घरगुती व अन्य ग्राहकांकडूनही वीज बिल वसुलीसाठी वीजजोडण्या तोडणे व वसुलीसाठी पाठपुरावा करणे, यांवर महावितरणचा फारसा भर नव्हता. त्यामुळे ३१ मार्च २०२४ रोजी ८९ हजार ३२० कोटी रुपयांची थकबाकी ९ महिन्यांमध्ये म्हणजे ३१ मार्च २०२५ रोजी ९७ हजार ७७० कोटी रुपयांवर गेली आहे. गेल्या तीन-चार महिन्यांमध्ये थकबाकीचा आकडा प्रचंड फुगला असून तो एक लाख कोटी रुपयांवर गेला आहे, असे सूत्रांनी नमूद केले.महावितरणने थकबाकी वसुली करणे बंधनकारक असून त्यामुळे प्रामाणिकपणे वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांवरील आर्थिक भार हलका होईल. जर महावितरणने थकबाकी वसूल केली, तर शेतकरीच नव्हे, तर सर्व ग्राहकांना किमान वर्षभर मोफत वीज पुरविता येईल किंवा पुढील पाच-सात वर्षे वीज दरवाढ करावी लागणार नाही. अशोक पेंडसे, वीजतज्ज्ञमहावितरणने थकबाकी वसुली केली, तर पुढील पाच-सात वर्षे वीज दरवाढ करावीच लागणार नाही, उलट सर्व वीज ग्राहकांचे दर कमी करता येतील. परंतु महावितरणकडून थकबाकी वसुलीसाठी फारसे प्रयत्न होत नसल्याने थकबाकीचा आकडा वाढत असल्याचे वीजतज्ज्ञांनी सांगितले.

'महावितरण'च्या वीज बिल थकबाकीवर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी टप्पा दोन ही योजना सुरू केली आहे. स्वस्त वीज उपलब्ध होऊ लागल्यावर हळूहळू थकबाकी कमी होईल व महावितरणचे अर्थकारण सुधारेल.

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## भगवद्गीता आणि नाट्यशास्त्र देशाचे कलात्मक दीपस्तंभ!

भगवद्गीतेचे गेल्या काही वर्षात जगातील अनेक भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. गीतेला 'युनेस्को'ने जागतिक वारसा म्हणून मान्यता दिल्याने हे स्पष्ट झाले आहे, की गीता हा केवळ भारतीयांचा वारसा नसून संपूर्ण मानवजातीचा वारसा आहे आणि तिची शिकवण आणि तत्त्वे केवळ भारतापुरती मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी ती प्रेरणास्त्रोत आहेत. भारताची ज्ञान परंपरा आणि सांस्कृतिक वारशाच्या समृद्धीने पुन्हा एकदा जागतिक स्तरावर आपली प्रतिष्ठा प्रस्थापित केली आहे. 'युनेस्को' (युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशन) ने आपल्या मेमरी ऑफ द वल्र्ड रजिस्टरमध्ये दोन महान भारतीय ग्रंथ, भगवद्गीता आणि भरत मुनींचे नाट्यशास्त्र समाविष्ट करून भारताच्या शाश्वत परंपरा आणि सांस्कृतिक श्रेष्ठतेला जागतिक मान्यता दिली आहे. ही केवळ भारतासाठीच नाही, तर जागतिक संस्कृती आणि संपूर्ण मानवजातीसाठी अभिमानाची बाब आहे. कारण हे दोन्ही ग्रंथ केवळ भारतीय जीवनाच्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंबच नाहीत, तर जागतिक सभ्यतेला दिशा देणारे तात्विक आणि कलात्मक दीपस्तंभ आहेत. या मान्यतेने हे सिद्ध केले आहे, की भारताच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि कलात्मक परंपरा आजही तितक्याच प्रासंगिक आणि प्रभावशाली आहेत. 'युनेस्को मेमरी ऑफ द वल्र्ड रजिस्टर' हे ऐतिहासिक वारशाचे दस्तावेजीकरण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ आहे. 'मेमरी ऑफ द वल्र्ड' हा कार्यक्रम 'युनेस्को' द्वारे १९९२ मध्ये जगातील महत्त्वाच्या डॉक्युमेंटरी हेरिटेजचे जतन, डिजिटायझेशन आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आला आणि त्याला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवून दिली. अशा प्रकारचे ऐतिहासिक ग्रंथ, हस्तलिखिते, नोंदी, चित्रे, दृकश्राव्य साहित्य आणि इतर डॉक्युमेंटरी वारसा जतन करणे आणि मानवी सभ्यतेच्या स्मृती आणि संस्कृतीचे जतन करणारे सार्वत्रिक वारसा म्हणून स्थापित करणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे. सुरक्षितता, डिजिटायझेशन आणि दस्तवेजांचे जागतिक प्रदर्शन हे सुनिश्चित करतात, की आपला वारसा काळाच्या ओघात हरवला जाणार नाही; परंतु युगानुयुगे राहील. 'युनेस्को'च्या या रजिस्टरमध्ये कोणत्याही दस्तवेजाचा समावेश करणे हे त्याच्या जागतिक मान्यता आणि कालातीत महत्त्वाचा पुरावा आहे. 'युनेस्को'च्या आंतरराष्ट्रीय सल्लागार समिती आणि कार्यकारी मंडळाने निवडलेल्या नोंदी केवळ संबंधित देशांच्या वारशाचीच ओळख करीत नाहीत, तर संशोधन, शिक्षण आणि सांस्कृतिक संवादाला प्रोत्साहन देतात. 'मेमरी ऑफ द वल्र्ड'मध्ये भारताच्या १४ नोंदी आहेत. २०२५ मध्ये 'युनेस्को'च्या माहितीपट हेरिटेजच्या नवीन यादीमध्ये एकूण ७४ नवीन संग्रह समाविष्ट केले गेले आहेत. ७२ देश आणि चार आंतरराष्ट्रीय संस्थांच्या नोंदणीमध्ये समाविष्ट केलेल्या नोंदींची संख्या ५७० झाली आहे. या वर्षीच्या नोंदींमध्ये वैज्ञानिक क्रांती, इतिहासात महिलांचे योगदान आणि बहुपक्षीयता यांसारख्या थीम समाविष्ट आहेत. 'युनेस्को'चे उद्दिष्ट केवळ कागदपत्रांचे जतन करणे नाही, तर मानवतेच्या समान मूल्यांचे आणि इतिहासाचे रक्षण करणे हेदेखील आहे. गीता आणि नाट्यशास्त्राच्या समावेशासह, भारताच्या आता 'मेमरी ऑफ द वल्र्ड' रजिस्टरमध्ये एकूण १४ नोंदी आहेत, ज्यावरून हे सिद्ध होते, की भारत आपला कागदोपत्री वारसा जपण्यासाठी आणि जागतिक मंचावर सादर करण्यासाठी कटिबद्ध आहे. याआधी ताम्रपट, ऋग्वेद, तुलसीदासांचे रामचरितमानस, पंचतंत्र, अष्टाध्यायी या महत्त्वाच्या ग्रंथांनाही त्यात स्थान मिळाले आहे. भारतासाठी, हा केवळ सांस्कृतिक प्रतिष्ठेचा विषय नाही, तर भावी पिढ्यांसाठी चेतना वाढविण्याचे एक माध्यम आहे. भारताचा शाश्वत आध्यात्मिक संदेश म्हणजे 'गीता.' भगवद्गीता हा भारतीय तत्त्वज्ञान, धर्म आणि जीवनाच्या दृष्टिकोनाचा सर्वात आदरणीय आणि कालातीत ग्रंथ आहे. हा ७०० श्लोकांचा संवाद आहे. त्यात श्रीकृष्णाने अर्जुनाला धर्म, कर्म, योग, भक्ती आणि आत्मज्ञानाची अशी एकत्रित शिकवण दिली होती, जी आजही अतिशय समर्पक आहे. महात्मा गांधींनी गीतेचे वर्णन त्यांच्या 'आध्यात्मिक शब्दसंग्रहाची जननी' म्हणून केले आहे, तर टॉल्स्टॉय, आइन्स्टाईन आणि अल्डॉस हक्सले यांसारख्या पाश्चात्य विद्वानांनीही तिच्या विचारांच्या गहनतेची प्रशंसा केली आहे. भारताच्या नाट्यशास्त्राचाही 'युनेस्को'ने च्या यादीत समावेश झाला आहे. कला सादरीकरणाचे शाश्वत विज्ञान भरत मुनींनी लिहिलेल्या 'नाट्यशास्त्र'या ग्रंथात आहे. हा नाट्यशास्त्रावरील जगातील पहिला ज्ञात ग्रंथ मानला जातो. नाट्यशास्त्र हा भारतीय रंगभूमी, नृत्य, संगीत आणि नाट्यशास्त्रावरील सर्वात प्राचीन आणि वैज्ञानिक ग्रंथ आहे, जो सुमारे २००० वर्षांपूर्वी ऋषी भरत मुनींनी लिहिलेला आहे. हे पुस्तक केवळ अभिनय आणि सादरीकरणाच्या तंत्राचा संग्रह नाही, तर त्यात मानवी भावना, मुद्रा आणि संवाद यांचे इतके खोल विश्लेषणात्मक विवेचन आहे, की ते आजही जगभरातील नाट्य कलाकारांसाठी मार्गदर्शकाचे काम करते. यात केवळ नाटक आणि नृत्याच्या तंत्रांवर प्रकाश टाकला जात नाही, तर रस, भाव-भावाचा सिद्धांतही आहे. शैली, रंगमंच व्यवस्था, संगीत, वेशभूषा आणि अगदी प्रेक्षकांच्या भूमिकेचे तपशीलवार विश्लेषण केले आहे.

## पाणीबाणी





लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017


अद्याप मे महिना आहे बाकी
मान्सून कधी राज्यात येणार
पाण्याच्या नियोजनासाठी
यंत्रणा काम कधी करणार?

विदर्भ मराठवाड्यातील
धरणांचा साठा आटला
एप्रिल मध्येच राज्यातील
पाण्याने तळ हा गाठला

डोईवर भार खांद्यावर ओझे
पाणीबाणी चित्र आहे दिसते
करावे जलद उपाय सरकारने
जनता साकडे शासना घालते

## ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



पी एच डी न मिळे कधी कोठे देण्या।
आणिक हो घेण्या समाधान ।।

आंतरिक सुख समाधान आहे ।
समाधान आहे संजीवन ।।

गरजूंना जेव्हा मदत करतो ।
आतून जाणतो समाधान ।।

नि:स्वार्थ सेवेने जो करी मदत ।
कर्म ना जगात दुजे ऐसे ।।

मिळे समाधान निस्वार्थ कर्माने ।
विकत पैशाने तो ना मिळे ।।

# मैत्र... अनुबंधाचा गाभारा...



सप्तरंग

डॉ. विनय व. दांदळे
९८२२२ ३१७६९

**दोन ओळखींतून उमलतं नातं,**
**ना जन्माचं, ना धर्माचं गाठणं,**
**शब्द नसताना कळते भावना,**
**हेच खरं मैत्र, आत्म्याचं निखळ जडणं!**

आपल्या जीवनात काही नाती रक्ताच्या नात्यांनी जुळतात, काही समाजस्वीकृतीने जोडली जातात. पण काही नाती ही हृदयाच्या अनाहत छंदाने आकार घेतात... त्या नात्यांना नाव नसलं, तरी ओळख असते. बंधन नसलं, तरी बांधिलकी असते. नियम नसले तरी निखळ शिस्त असते. आणि अपेक्षा नसली तरी अफाट समर्पण असतं... मैत्र अनुबंध म्हणजे असाच एक सहवास आहे. जो मनाच्या गाभाऱ्यात उगम पावतो, आणि आयुष्याच्या प्रत्येक वळणावर साथ देतो. हा अनुबंध शब्दांच्या आधाराने नव्हे, तर नजरेतल्या नजरेतून वाचल्या जाणाऱ्या भावना, मौनातल्या मौनात उमटणाऱ्या प्रतिक्रिया, आणि हृदयाला भिडणाऱ्या अस्तित्वाच्या जाणिवेवर उभा असतो.

मैत्रीचा रंग म्हणजे चिरंतन अनोळखीपणातून साकारलेली आपुलकी असते. खरी मैत्री कधी नियोजनाने घडत नाही. ती कधी ' मित्र बनवू या ' असं म्हणत निर्माण होत नाही.

ती घडते .... एका सहज हास्याने,
एखाद्या अनपेक्षित मदतीने, किंवा कधी कधी एखाद्या उदास संध्याकाळी ओळखीच्या पलीकडच्या शब्दांनी.

या मैत्र अनुबंधात "मी", "माझं", "तुझं", "तू" हे भेद विरघळतात. उरतो तो फक्त "आपण"...

जिथे दोन माणसं स्वतंत्र असूनही, एकमेकांमध्ये पूर्ण गुंफलेली असतात.

मैत्र मध्ये शब्दांवर नव्हे, तर मौनावर विश्वास असतो.

मैत्र अनुबंधाचं सौंदर्य हे शब्दांपेक्षा मौनाच्या ताकदीत असतं.

जेव्हा एखादा मित्र ' कसा आहेस ....?' असं विचारतो, तेव्हा उत्तर न दिलं गेलं तरी त्याच्या डोळ्यातून काळजी वाहते.

जेव्हा एकाला दु:ख असतं, तेव्हा दुसरा न बोलता पाठीवर हात ठेवतो.

कधीही बोलून ठरवलेली साथ नसते, तरीही ती 'असते' .... आणि कायम असते.

मैत्र हेच असं एक नातं आहे की , ते जन्माला येतं पण मृत होत नाही .

शरीर सोबत राहत नाही, वेळ सगळ्या क्षणांना पुसून टाकतो, संपर्क हरवतात, संवाद थांबतात . पण मैत्र अनुबंध हा संपत नाही.

तो आपल्या अंत:करणात खोलवर रुतलेला असतो, जसा खोल पाण्यात पडलेला दगड...

वर पाणी स्तब्ध दिसतं, पण खोल कुठेतरी एक अढळ आधार दाटलेला असतो.

या अनुबंधाचा चमत्कार असतो की, कधी एखादा जुना मित्र अचानक भेटतो ... नाही म्हणायला पंधरा वर्षे झाले बोलायला.

पण पुन्हा सुरुवात होते तिथून, जिथे थांबलं होतं.

ना औपचारिकता, ना संकोच ....
फक्त जुनी चव, जुने किस्से, आणि नवे हसू. या नात्याचं एक वैशिष्ट्य म्हणजे ....

ते तुम्हाला "जैसे आहे तसे" स्वीकारतं.

तुमचं यश, अपयश, मूर्खपणा, गर्व, कमजोरी सगळं सगळं ....

ते तुम्हाला समजावत नाही, पण समजून घेतं.

ते तुम्हाला सांभाळत नाही, पण तुमच्यासोबत चालतं.

हा अनुबंध केवळ जगण्यासाठी नसतो,
तर जगण्याला अर्थ देण्यासाठी असतो.

खऱ्या मैत्रीचं स्वरूप म्हणजे एक प्रकारचं अध्यात्म असतं.

जसं भक्ताला देवाबद्दल शंका नसते,
तसं खऱ्या मैत्राला मैत्रीतलं प्रेम सिद्ध करावं लागत नाही.

हे नातं म्हणजे एक संवेदनशील व्रत,
जे काळाच्या कसोटीवर टिकूनही नवीन फुलं फुलवत राहतं ....

मैत्र अनुबंध हा एका सुरेल कवितेसारखा असतो ,

ज्याचा आरंभ ज्ञात असतो, पण शेवट नसतो ....

कधी तो क्षणभराचा असतो, पण आयुष्यभर पुरणारा ,

कधी तो जन्मभराचा असतो, आणि पुनर्जन्मातही मागे लागणारा .....

काही नाती आपल्याला दिली जातात,
पण काही नाती आपण ओळखतो ....

तेव्हा जेव्हा हृदय अनाहूत ओळख शोधतं आणि एकदा सापडली की ती मैत्री नसते, ती जीवनाची खोल साद असते.

"मैत्र अनुबंध" हे नुसतं एक नातं नाही, ती एक अनुभूती आहे ,

ज्याला शब्द पुरत नाहीत, पण मन ओसंडून जातं...

ती तुमच्या अस्तित्वात असेपर्यंत, ती तुमच्या श्वासात असते अनुभवली की समजते, समजली की अमर होते ...!"

**मैत्री नाही केवळ सोबत चालणं,**
**ती असते शांतपणे मनात राहणं ....**
**जिथे नसतो गोंधळ, ना दिखावा,**
**तिथेच मैत्र अनुबंधाचं खरं ठिकाण**
**असतं भावनांमधलं थांबणं...!!**



# हवेतील प्रदूषण एक नवा चेन स्मोकिंग ट्रॅप



प्रासंगिक

तुळशिदास खिरोडकार
मो. 9970276582

"स्मोकिंग इज इंज्युरियस टू हेल्थ" हे वाक्य सिगारेट आणि बिडीच्या पाकिटावर मोठ्या अक्षरांत छापलेले असते, तरीही अनेक जण सिगारेट ओढणे ही प्रतिष्ठेची बाब मानतात. परंतु आजची स्थिती अशी आहे की, केवळ सिगारेट ओढणारेच नव्हे, तर प्रत्येकजण नकळत धुराचा सामना करत आहे आणि सारेच जण चेन स्मोकर बनले आहेत. कारण सिगारेट किंवा बिडीमधील निकोटीन पेक्षा भयंकर हवा प्रदूषित करणाऱ्या अनेक घटकांमुळे आपण सर्वच श्वासोच्छ्वासाद्वारे विषारी वायूंचे सेवन करत आहोत.

मागील काही दशकांत औद्योगिकीकरण, वाहनांची वाढती संख्या, जंगलतोड, बांधकाम क्षेत्रातील धूळ, जाळलेला कचरा, रासायनिक फवारण्या अशा अनेक कारणांमुळे हवेतील प्रदूषण प्रचंड वाढले आहे. परिणामतः एक नवा धोका आपल्या आरोग्याला सतत घेरून आहे. शहरांमध्ये आणि ग्रामीण भागांतही हवा आता शुद्ध राहिलेली नाही. सिगारेटमधून फक्त निकोटीनयुक्त धूर बाहेर पडतो, पण बाह्य वातावरणातील प्रदूषण अनेक प्रकारच्या



विषारी वायूंनी भरलेले आहे. हे वायू शरीरात प्रवेश करून अनेक आजारांना आमंत्रण देतात.

सिगारेटमुळे फुफ्फुसे निकामी होतात, रक्तदाब वाढतो, हृदयरोग होतो. मात्र, हवेच्या प्रदूषणामुळे यापेक्षाही भयावह परिणाम होत आहेत. श्वसन संस्थेवर परिणाम होतो. प्रदूषित हवेमुळे दमा, ब्रॉन्कायटिस, न्यूमोनिया यांसारखे आजार होत आहेत. सतत धुरात वावरणाऱ्यांना फुफ्फुसाचा कर्करोग होण्याची शक्यता वाढते. लहान मुलांमध्ये श्वसनाच्या तक्रारी वाढत आहेत.रक्तवाहिन्या आकुंचित होतात आणि हृदयाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

प्रदूषित हवेत सतत राहिल्याने मेंदूवरही परिणाम होतो आणि स्मरणशक्ती कमजोर होते. मानसिक तणाव आणि डोकेदुखीचे प्रमाण वाढते.हवेत असलेली घाण त्वचेवर बसते आणि त्वचा उजळपणा गमावते. ॲलर्जी, पुरळ, काळे डाग यांसारख्या समस्या निर्माण होतात.

अकोल्यातील प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. राजेंद्र ढवळे यांच्यासोबत या विषयावर चर्चा केली असता त्यांनी गंभीर चिंता व्यक्त केली. त्यांच्या मते, "प्रत्येकाने आता घराबाहेर पडताना नाक आणि तोंडाला रुमाल किंवा मास्क बांधूनच बाहेर पडावे. हवेतील वाढते विषारी घटक हे केवळ सिगारेटच्या धुराइतकेच घातक आहेत. लोकांनी स्वतःच प्रदूषण टाळण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा." समाजातील प्रत्येक घटकांनी फक्त सरकारच्या धोरणांवर अवलंबून न राहता जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे.

अधिकाधिक वृक्षारोपण केल्यास हवेतील प्रदूषणाचे प्रमाण कमी होईल. शक्य असल्यास खासगी वाहने वापरण्याऐवजी सार्वजनिक वाहने, सायकल किंवा इतर पर्यायी साधने वापरावीत. प्लास्टिक, कचरा रस्त्यावर न जाळता कचऱ्याचे वर्गीकरण करून ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करावे. रासायनिक फवारण्या टाळून शेतकऱ्यांनी जैविक शेतीवर भर द्यावा, त्यामुळे जमिनीतील आणि हवेमधील विषारी घटक कमी होतील.

हवा प्रदूषणाचा फटका केवळ मानवांना बसत नाही, तर पशुपक्ष्यांनाही गंभीर परिणाम भोगावे लागतात. विषारी वायूंचा थर आणि धूलिकण हवेत मिसळल्याने पक्ष्यांच्या श्वासोच्छ्वासावर परिणाम होतो, त्यामुळे त्यांची संख्या घटत आहे. विशेषतः कबूतर, चिमण्या आणि ससाणे यांसारखे पक्षी मोठ्या प्रमाणावर दूषित हवेच्या विळख्यात अडकत आहेत. शहरांमधील भट्टी, कारखाने आणि वाहनांच्या धुरामुळे गुरेढोरे आणि रानटी प्राणी श्वसनाच्या विकारांना बळी पडतात. तसेच, शेतातील फवारणीमुळे आणि रासायनिक प्रदूषणामुळे त्यांचे अन्न व पाणीही विषारी बनते. जंगलतोड आणि औद्योगिकीकरणामुळे त्यांच्या नैसर्गिक अधिवासावरही परिणाम होत आहे, परिणामी अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर आहेत. जगभर २२एप्रिल ला पृथ्वी दिन साजरा होतो. मानवाने पृथ्वीवरील प्रदूषण रोखण्यासाठी प्रभावी उपाय केले नाहीत, तर पशुपक्ष्यांची संख्याही झपाट्याने कमी होईल आणि निसर्गाचा समतोल बिघडेल. त्यामुळे हवा प्रदूषण रोखणे ही फक्त मानवी गरज नाही, तर संपूर्ण पर्यावरणाच्या व पृथ्वीच्या अस्तित्वासाठी अत्यावश्यक बाब आहे.

प्रदूषण थांबवा, स्मोकिंग थांबवा!

आज प्रत्येक जण नकळत चेन स्मोकर झाला आहे. आपण फक्त सिगारेटचे व्यसन असलेल्या लोकांना दोष देऊ शकत नाही. जर आपण स्वतः प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न केले नाहीत, तर उद्या आपल्या घरातच ऑक्सिजन सिलेंडर लावण्याची वेळ येईल. हवेतील घातक घटकांपासून स्वतःचे आणि पुढच्या पिढ्यांचे संरक्षण करण्यासाठी त्वरित पावले उचलली पाहिजेत. आपण सिगारेट ओढत नसाल तरीही आपला प्रत्येक श्वास विषारी बनत चालला आहे. म्हणूनच आजपासूनच सावध व्हा आणि प्रदूषणविरहित जीवनशैली अंगीकारा, नाहीतर संपूर्ण मानवजातीला या नकळत चेन स्मोकिंगच्या विळख्यातून कोणीही वाचवू शकणार नाही!

# नाटकाचे पितामह विल्यम शेक्सपिअर!



दिन विशेष

निशा डांगे/नायगांवकर
मो. 8421875487

शतानुशतके रसिक वाचकांच्या हृदयावर आपल्या जादुई लेखणीने अधिराज्य गाजवणारा शब्दांचा किमयागार, नाटकांचा पितामह अर्थात विल्यम शेक्सपिअर! विल्यम शेक्सपिअरचा जन्म २३ एप्रिल १५६४ रोजी युरोमध्ये स्टेटफोर्ड अपॉन अव्हान (इंग्लंड) झाला होता. आज संपूर्ण जगात कोरोना महामारीने आकांडतांडव माजवले आहे. अशाच प्रकारचे मृत्यूचे भयाण थैमान "ब्युबॅनिक प्लेग" ने विल्यमच्या जन्मकाळात युरोपमध्ये माजवले होते. आजच्या सारखेच प्लेगच्या काळात युरोमध्ये सर्वत्र लॉकडाऊन होते. या लॉकडाऊनच्या काळातील जगाला ईश्वराने दिलेली सुंदर भेट म्हणजे विल्यम शेक्सपिअर!

स्टेटफोर्डचे सधन व्यापारी रॉबर्ट आर्डेन व मेरी आर्डेन यांच्या घरी विल्यामचा जन्म झाला. जन्मजात सुबत्ता लाभलेल्या विल्यमने आयुष्यात अनेक चढ उतार पाहिले. बालवयातच नशिबाच्या अनेक झळा सोसल्याने मनुष्याचे आयुष्य हे नशिबाच्या हातातील कळसूत्री बाहुली आणि आहे असे समजत होते. मनुष्याच्या आयुष्याचे सर्व सूत्रधार नशीब आहे हे त्यांनी आपल्या अनेक नाटकांतून दाखविले आहे. विल्यमच्या अँथेल्लो या नाटकातील या वाक्यांतून विल्यामची विचारसरणी स्पष्ट होते. घरच्या हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे विल्यम आपले शिक्षण अर्धवट सोडून कामधंदा करण्यास सुरुवात केली. याच दरम्यान वयापेक्षा ८ वर्षाने मोठ्या असलेल्या अँन हॅथवे यांच्याशी झाला. त्यांना दोन मुली व एक मुलगा होता. त्यांचे संयुक्त कुटुंब होते. छोट्या, मोठ्या कामातून त्याच्या कुटुंबाचे भागत नसे. त्यामुळे ते लंडनला एका मित्राच्या छापखन्यात काम करू लागले. याचबरोबर ते अनेक जोडधंदे करत असत. परंतु त्यांचे मन कुठेही स्थिर नव्हते. आपल्याला ह्याहून काहीतरी वेगळे करायचे आहे असे त्यांना नेहमी जाणवायचे. बल्यावयापासून नाटकाची आवड असलेले विल्यम नाट्यगृहाबाहेर सतत रेंगाळत राहायचे. नाटकं पाहायला येणाऱ्या प्रेक्षकांचे घोडे सांभाळण्याचे काम करायचे. त्याचबरोबर नाट्यगृहात डोकावून बघून रंगमंचावरील कलाकारांची सर्व गुण कौशल्ये आत्मसात करायचे. कधीकाळी एखादा नट उपस्थित नसेल तर अशावेळी त्याची भूमिका विल्यम साकारू लागले. अल्पावधीतच ते एक उत्तम नट म्हणून प्रेक्षकांसमोर आले. अभिनयासोबत ते नाटक बांधणीचे काम करू लागले. त्यांच्यातील नाटककार त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. मग त्यांनीच स्वतः नाटकं लिहिण्यास सुरुवात केली. विश्वाला ३९ महानाटकांचं दान त्यांनी दिलं आहे. त्यापैकी १० ऐतिहासिक, १७ सुखात्मिका तर १२ शोक नाटकं आहेत. त्यांच्या नाटकांचे वर्गीकरण कल्पनारम्य नाटके, गंभीर नाटके, शोकांतिका, सुखात्मिका, प्रणयरम्य नाटके, ऐतिहासिक नाटके जाणकारांनी असे केलेले आहे. दुसरा रिचर्ड, तिसरा रिचर्ड या ऐतिहासिक नाटकांतून विल्यमने अतिच्युतम प्रतिभेचे प्रदर्शन घडवले आहे. अँथेल्लो, किंग लियर, मॅकबेथ, रोमियो अँड ज्युलियट, हॅम्लेट विल्यमच्या या शोकांतिका जगप्रसिद्ध आहेत. विल्यम शेक्सपिअर



महान नाटककार तसेच "बार्ड ऑफ अव्हान" म्हणून ओळखले जाणारे महाकवी होते. गावाकडे गेल्यावर आपल्या शेतात काम करतांना देखील ते गाऊन कविता म्हणायचे. त्यांनी आपल्या साहित्य प्रवासात अनेक प्रदीर्घ काव्य लिहिले आहेत.

"सुनिते" ही वैशिष्ट्यपूर्ण काव्यनिर्मिती त्यांनी साहित्य विश्वाला अर्पण केलेली आहे. ( = १२+२= १४ ओळींची कविता) हे त्यांच्या काव्यलेखनाचे वैशिष्ट्य आहे. अंदाजे १५४ सुनिते त्यांनी रचली आहेत. त्यांची अ लहर्स कंप्लेंट, द पशनेट, पिल्ग्रिम, द रेप ऑफ ल्युक्रेसी, व्हिनस अँड ॲडानिस हे दिर्घकाव्य सुप्रसिद्ध तसेच प्रसंशनिय आहेत. सन १९९२ साली युरोपमध्ये प्लेगच्या साथीला थांबवण्यासाठी पुन्हा टाळेबंदी झाली. १४ महिन्याच्या टाळेबंदीच्या काळात विल्यमने रोमियो अँड ज्युलियट हे अतिशय रोमांचकारी व शोकांतिक नाटक लिहिले. टाळेबंदीच्या काळातही विल्यमची लेखणीने अनलॉकचा उच्चांक गाठला. सर्व जगात प्रसिद्ध असलेल्या विल्यम शेक्सपिअर यांचे साहित्याचे अनुवाद जगातील लॅटिन, इंग्रजी , फ्रेंच, मराठी, हिंदी नव्हे तर अनेक भाषांतून झाले आहेत. त्यांच्या लिखाणातील एकही ओळ अशी नाही की ती पुन्हा वाचावी वाटणार नाही. त्यांच्या जीवनाची खरी ओळख ही रोमियो आणि ज्युलियट या शोकांतिके पासून झाली. या नाटकाने त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन पोहचवले. तशी प्रत्येक साहित्य कृती ही वाचकांसाठी एक पर्वणीच ठरवायची. इंग्लडची राणी एलिझाबेथ तर विल्यम व त्यांच्या साथीदारांनी काढलेल्या या नाटक कंपनी ची विशेष चाहती होती. अनेक महत्वाचे प्रसंगी या नाटक कंपनी ला विशेष आमंत्रण देऊन नाटक सादर करण्यास बोलावले जायचे.

विल्यम शेक्सपिअर यांना फादर ऑफ द ड्रामा असे संबोधले जाते. गेली चार शतके त्यांची नाटके वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. त्यावेळी नाटकांच्या छापील प्रती सहजपणे बाजारात उपलब्ध होत नसत त्यामुळे विल्यम शेक्सपिअर यांनी स्वतः एक कंपनी काढून नाटकांच्या प्रती प्रकाशित करणे सुरू केले. नाटक लेखनाला सोबतच ते नाटकात कामही करीत असत. विल्यम हे एक चांगले अभिनेते होते. नाटकांमुळे खूप लवकर ते प्रसिद्ध व्यक्ति म्हणून ख्यातनाम झाले. त्यांनी ग्लोब थिएटरमध्ये भागीदारी केली व लकवरच ते स्टेटफोर्ड मधील सर्वात श्रीमंत उद्योगपती म्हणून प्रसिध्द झाले. मराठीतील अनेक प्रसिद्ध लेखकांनी विल्यम शेक्सपिअर यांच्या जीवन व साहित्य लेखनावर माहितीपर लिखाण केले आहे त्यात प्रामुख्याने प्रभाकर देशपांडे साखळीकर (परभणी) यांनी कादंबरी लिखाण तसेच विल्यम शेक्सपिअर यांच्या काही नाटकांचे मराठीत अनुवाद केले आहे. तसेच परशुराम देशपांडे हे सुद्धा विल्यम शेक्सपिअर यांच्या साहित्याचे गाढे अभ्यासक आहेत त्यांनी " राजहंस एव्हनचा शेक्सपिअर " भाग १ व भाग २ यात विल्यम यांचे संपूर्ण जीवन चरित्र व साहित्यिक योगदान याबद्दल सविस्तर लिखाण केले आहे.

सर विल्यम शेक्सपिअर यांचे साहित्य वाचन करतांना मी काही लिहून ठेवलेल्या नोंदी "काळाची हिमगार चार दशके, मित्रा तुला वेढूनी जेव्हा खंदक खोदतील गहिरे भालप्रदेशावरी गर्वे यौवनवेष जो मिरवीशी तू आज साऱ्या जनी त्याच्या केवळ जीर्ण शीर्ण उरती चिंध्याच देहावरी...." "संपली आता आपली गंमत. हे आपले रंगकर्मी, मी आधीच सांगितल्याप्रमाणे, होते सगळे सुक्ष्मात्मे, विरून गेले आहेत हवेत, अगदी सूक्ष्म हवेत आणि पायाविना उभारलेल्या या दृश्यासारखे मेघमुकुटमंडित मिनार, रम्यसुंदर राजप्रासाद, दिव्योदत्त देवलंय आणि साक्षात प्रचंड पृथ्वीगोल, होय, त्यावरचा चरचरासाहित विरून होईल लुप्त. आणि या विरून गेलेल्या अभासमय देखाव्याप्रमाणे, आपल्यामागे ठेवणार नाही एक साधा ढगदेखील. आपण आहोत त्याच द्रव्याचे, स्वप्न घडतात ज्यापासून आणि आपलं अल्पसं आयुष्य एका निद्रेत जातं आटोपून." रंगभूमीचा निरोप घेतांना विल्यम शेक्सपिअर यांनी काढलेले उदगार, "आता माझी मंत्रशक्ती मी दिली फेकूनी सगळी उरले केवळ माझे स्वतःचे दुबळेपण हे जवळी." वाचकांच्या मनाचा वेध घेऊन लिहिणारे विल्यम शेक्सपिअर वाचकांच्या मनात कायम अजरामर राहिले आहेत. समकालीन साहित्यिक बेन जॉन्सन म्हणतात, "He was not of an age, but for all time. अशा या महान साहित्यिकाला मानाचा मुजरा देण्यासाठी ही छोटीशी लेखात्मक आदरांजली.

## लोकारोग्य

# कंबरदुखी आणि गुडघेदुखीवर विनाशस्त्रक्रिया उपचार

बदलत्या जीवनशैलीमुळे ऐन तारुण्यात अनेक प्रकारचे आजार उदभवतात. आहाराची चुकीची पद्धत,प्रचंड धावपळ,दगदग आणि मुख्य म्हणजे शारीरिक श्रम अर्थात व्यायामाचा अभाव या कारणामुळे हल्ली अनेक तरुणांमध्ये देखील ऐन तिशीत कंबरदुखीचा आणि गुढगेदुखीचा आजार सुरु होताना दिसतोय. हाडांचे हे विकार सुरु होण्याचं मुख्य कारण म्हणजे मणक्याची चकती सरकणे आणि त्यामुळे मग कंबरेत प्रचंड वेदना सुरु होतात. गुडघ्याची वाटी देखील सरकते त्यातील वंगण कमी झाल्यामुळे देखील गुढगेदुखीचा आजार उदभवतो. परंतु हाडाचे विकार म्हंटल कि ते बरे करण्यासाठी फक्त शस्त्रक्रियाच असा एक गैरसमज जनमानसात रूढ असतो. पण खरं तर हाडाचे ९९ टक्के आजार हे शस्त्रक्रियेविना बरे होऊ शकतात हे सत्य आहे ते कसे?हेच जाणून घेण्यासाठी सुप्रसिद्ध अस्थिव्यंगविकार तज्ज्ञ डॉ श्रीकृष्ण ढोणे यांच्याशी साधलेला संवाद.

**हॅलो डॉक्टर**

**गुढगेदुखी किंवा कंबरदुखी म्हटलं कि शस्त्रक्रियाच असा एक समज जनमानसात दिसतो परंतु हे दुखणे विना शत्रक्रिया बरे होऊ शकते या अंगची पार्शवभूमी नेमंकी काय सांगाल?**

शत्रक्रिया किंवा सर्जरी हे वैद्यकशास्त्राने आपल्याला दान दिलेले आहे. भाजीमध्ये आपण मीठ किंवा साखर अगदी चिमूटभर टाकतो अगदी तेवढाच शस्त्रक्रियेचा वापर करायचा असतो. हाडांचे जे आजार असतात त्यावर उपचारांचे सर्व मार्ग हाताळून पाहिल्यानंतर अगदी शेवटचा मार्ग म्हणजे शस्त्रक्रिया आहे. कंबर दुखी किंवा गुढगेदुखी का होते?तर शारीरिक व्यायामाचा अभाव,अरबट चरबट खाणे,मद्यपान,धूम्रपान अशी विविध व्यसन यामुळे पोटाचा घेर वाढतो.वजन प्रचंड वाढते आणि कम्बर दुखी किंवा गुढगेदुखी सुरु होते.म्हणूनच जर आहार पद्धती बदलली दररोज व्यायाम नियमित केला बैठका काढल्या,आणि औषधांच्या मात्रा घेऊन या सर्व उपायांनी वजन नियंत्रित केले कि, आपोआप कम्बर दुखी चा किंवा गुढगेदुखीचा त्रास संपवता येतो. आपल्या मणक्यांमध्ये ५ चकत्या आहेत. दुखणे वाढले कि एक काढून टाकतो परंतु बाकीच्या चार चकत्या सुरळीत राहण्यासाठी वजन नियन्त्रित कारण गरजेच असत.

**कंबरदुखीचा ज्यांना त्रास असतो त्यांच्या मणक्याची चकती सरकते ती पुन्हा व्यवस्थित करता येते का?**

होय, सरकलेली मणक्याची चकती पूर्ववत करण्यासाठी रुग्णाला ट्रॅक्शन चा उपचार अतिशय योग्य असतो. यामध्ये रुग्णाच्या कमरेला पेल्वीस



पासून अर्ध्या बाजूला वर आणि खाली सुमारे २५ ते ३० किलो वजन बांधतात .आणि यादरम्यान रुंगांचे जेवण कमी केलं जात. हा उपचार दोन तीन दिवस केला कि, रुग्णाचे वजन कमी होते आणि त्याचे दुखणे देखील कमी होते. हा आपल्याकडचा खूप प्रभावी उपचार आहे.

**इंडियन मेथड ऑफ म्यानिप्युलेशन ऑफ स्पाईन म्हणजे काय?**

हि उपचार पद्धती म्हणजे रुग्णांकरिता एक सिक्रेट आहे. जेंव्हा रुग्ण पाठदुखीचा किंवा कंबर दुखीचा आजार घेऊन रुग्णलयात येतात, तेंव्हा आम्ही त्याची त्याचे दोन्ही पाय पोटाजवळ घेऊन पाठ मोडतो त्यामुळे कट्कन आवाज येतो.जी सरकलेली डिस्क असते ती यामुळे पूर्ववत होते आणि ती आत जाते. या उपचारामुळे रुग्णाला देखील आनंद होतो तो टायचे दुखणे अचानक बंद झाल्यामुळे.

**अनेक वयोवृद्धाना गुढगेदुखी आणि कंबरदुखीचा आजार असतो तो बरा करण्यासाठी उपाय काय?आणि पाठीचे स्नायू मजबूत केले तर हाडांची दुखणी कमी करता येतात का ?**

ज्यांचं वय ७० च्या पुढे आहे अशा वयोवृद्ध रुग्णांना कंबरदुखी आणि गुढगेदुखीचा आजार हा कॉमन असतो. अशा रुग्णांना गुढग्यामध्ये किंवा कंबरेत स्टिरॉइड चे इंजेक्शन देऊन हे दुखणे थांबवता येते. मात्र त्याच बरोबर अशा वयोवृद्धांनी आणि खरं तर सर्वच वयोगटातील रुग्णांनाही नियमित जलतरण करायला हवे.योगासन त्यातही सर्वांगासन नियमित करायला हवे. शारीरिक व्यायाम जोर बैठका काढायला हव्यात. भरपूर चालायला हवं आणि दररोज झोपताना पायांच्या मध्ये लोड घेऊन झोपायचे यामुळे कंबरदुखी आणि गुढगेदुखीचा त्रास थांबवता येतो. आपल्या शरीराची रचना पहिली तर ३० टक्के हाड आणि ७० टक्के स्नायू असतात. शरीराचा संपूर्ण भार आपले स्नायूंचं पेलत असतात. जस स्कुटर किंवा गाडीला मेन्टेन्स महत्वाचा असतो तद्वतच आपल्या शरीरातील स्नायूंची काळजी घेणं महत्वाचं असत.त्यासाठीच दररोज व्यायाम करावा.केवळ कॅल्शिअमच्या गोळ्या घेऊन उपयोग नाही. शरीराचे वजन नियंत्रित करणे अत्यंत महत्वाचे असते.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 19

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | य | त्या | बि | ळा | व | र | ना | गो | बा | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | प | | |
| | | | | | | | | | | | ट | | |
| | | | | | | | | | | | को | | |
| | | | | | | | | | | | ड | | |
| | | | | | | | | | | | गा | | |
| | | | | | | | | | | | | | |
| म | हा | नु | भा | व | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | व | | | | |
| | | | | | | | | | ज | | | | |
| | | | | | | | | | न | | | | |

### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो
संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या बौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

**संकेतशब्द:—**

**दोन अक्षरी**
कुटी
खुंटी
गज
घार
टाटा
टाप
डफ
तार
त्याग
थाक
थाट
धाव
धुनी
नट
नख
नात
पान
पार
पावा
मासा
मुठ
रंभा
वग
वन
वज
सार
स्वर्ग
सुन
क्षय

**तीन अक्षरी**
कीर्तन
कीचक
कुजका
खुंटणे
गहन
गारवा
चर्मट
चापट
जकात
तस्कर
तक्षक
तकाकी
थकणे
नीरज
नुपुर
पसंत
पताका
बाजार
रकाना
वजन
वातड
वाचक
वेतन
सावज
सुरस

**चार अक्षरी**
अवनती
इमारत
कुटाळकी
तलवार
धावपळ
धुमाकुळ
बिजवर
वर्गमुळ
रचयिता
वाटघाट
सरहद
संकोचित

**पाच अक्षरी**
थट्टामस्करी
नवसागर
पटकोडगा
महानुभाव
रीतरवेस

**इतर**
आग पाखडणे
आयत्या
बिळावर नागोबा
(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | श | | वि | त | र | क | | स | मु | द्र | मं | थ | न |
| | र | म | जा | न | | र | क्ष | क | | वि | | क | ल |
| कुं | भ | | र | स | द | | मा | ळी | | भ | ग | वा | |
| भ | | अ | | डी | | भं | | क | ला | व | ती | | शी |
| मे | ज | वा | नी | | रा | ज | स्व | | जा | न | | पा | व |
| ळा | | स्त | | आ | | क | ल्प | | हो | | चि | त्र | |
| | प | व | न | च | क्की | | वि | रा | म | चि | न्ह | | भा |
| का | डी | | स | म | | आ | रा | स | | ता | | ए | क |
| पू | त | ना | | न | | घा | म | | गौ | री | शं | क | र |
| र | | द | मा | | पा | त | | पा | र | | का | ल | |
| | व | | न | का | र | | हि | र | व | ळ | | कों | डी |
| त | क्त | पो | स | | स | ज्जा | | द | | | कि | डा | |
| | शी | | | द | म | | द | र्श | क | | म | | दे |
| वा | र | क | री | | णी | | शा | क | | भ | या | व | ह |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 399

| | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | | 5 | | 6 | 7 | | | 8 | | 9 | | 10 | | 11 |
| 12 | | | 13 | | | | | 14 | | | 15 | | | | | 16 | | |
| | | 17 | | | 18 | | | | | 19 | | | 20 | | 21 | | | |
| 22 | 23 | | | 24 | | | | 25 | | | | 26 | | 27 | | | 28 | |
| 29 | | | 30 | | | | 31 | | | | | 32 | | | | | 33 | |
| | | | 34 | | | 35 | | | 36 | | 37 | | | | | 38 | | |
| 39 | | 40 | | 41 | 42 | | | | | | 43 | | | | | | | |
| 44 | | | 45 | | 46 | | | | 47 | 48 | | | 49 | | 50 | | 51 | |
| | | 52 | | | | | | 53 | | | | 54 | | 55 | | 56 | | |
| 57 | 58 | | | 59 | | | | 60 | | | 61 | | | | | | 62 | 63 |
| 64 | | | 65 | | | | 66 | | | 67 | | | | | | 68 | | |
| | | | | | 69 | | | | 70 | | | | 71 | 72 | 73 | | | |
| 74 | | | | 75 | | | 76 | | | | | | 77 | | | 78 | | |
| | | | 79 | | | | | | | | 80 | 81 | | | 82 | | | 83 |
| | | 84 | | | | | 85 | | | 86 | | | | 87 | | | 88 | |
| 89 | | | | | | 90 | | | | 91 | | | | | | | 92 | |

**—: आडवी विधाने :—**

1) गणितात दिलेल्या सर्व संख्यांना नि:शेष भाग जाईल अशी मोठ्यात मोठी संख्या
8) अन्नात असलेली निरोगी आणि सशक्त प्रकृतीसाठी अत्यावश्यक संयुगे
12) दुर्दशा, कष्ट
13) रुची, स्वाद 14) चोप, ताडन
15) भूमितीत काटकोन त्रिकोणाच्या काटकोनासमोरची बाजू
16) अमेरिकेच्या एका माजी राष्ट्राध्यक्षाचे आडनाव
17) वेणू, बांसरी
18) निराश, खिन्न
20) परमुलूखात एकजूट करुन राहिलेले लोक
22) धृतराष्ट्राची पत्नी व कौरवांची आई
24) उपकरण, साहित्य, वस्तू इ.
25) काहीच उपाय नसणे
27) राक्षसी, डाकीण
28) इंग्रजीतील एक वर्णाक्षर
29) धैर्य, सोशिकपणा
30) श्यामवर्णीय
31) शक्ति, ताकद
32) पाणी पिणे, फराळ करणे
33) संकटसमयी मदतीस येण्याविषयी केलेली देवाची प्रार्थना
34) श्रीकृष्णाची सखी
35) ओढा, झोंक, प्रवृत्ती
36) मोठी घडामोड
38) म्हशीचे स्त्रीलिंगी वासरु
41) नुकतेच विवाहित झालेले
43) टांचणी
44) मुलाचा जन्म झाल्यानंतर नक्षत्र, ग्रहांच्या स्थितीनुसार त्याला देण्यात येणारे नाव
46) पुत्र, संतती 47) प्रजा, जनता
50) श्रीकृष्णाचे एक नाव
52) कुबेराचा सेवक, एक देवयोनी
53) आत शिरणे, शिरकाव, नाटकातील एक अंक
54) शिकार, श्वापद 56) क्रोध, संताप
57) घात करणारे, हानीकारक
59) नैराश्य, खिन्न 60) कपाळ
61) ग्रंथ किंवा भाषणातील उतारा
62) एक श्वास रोग
64) तंबूचे आच्छादन
65) रोजचा अभ्यास
66) शिजविलेले तांदूळ
68) दंगा, कुस्त्यांचा आखाडा
69) श्रीकृष्णाची जन्मदात्री आई
70) भारतीय क्रिकेट संघातील एक आघाडीचा भूतपूर्व गोलंदाज
74) प्रतिशब्द, एकाच अर्थाचे अनेक शब्द
75) ताब्यातील, अधीन
76) पाण्यावर राहणे, पोहणे
77) घराचा अगदी वरचा मजला
79) वरवर दिसण्यापुरते
80) पुजेतील तांब्या
82) पुढे घडणाऱ्या घटनेचे आधीच लागलेले व्यवधान
85) अनसूयेच्या पोटी झालेला ब्रह्मा, विष्णु आणि शंकराचा अवतार
87) प्रख्यात साहित्यिक कृष्णाजी केशव दामले यांचे टोपण नांव
89) हिंदुंचा सर्वात मोठा सण
90) साप 91) मृत्यु,
92) सालासहित असलेले तांदूळ

**—: उभी विधाने :—**

1) आपले राष्ट्रपिता
2) हिंदीत नांगर
3) होडी, नाव
4) प्रामाणिक व सच्चा मनुष्य
5) रोगी व अपघातग्रस्तांकरीता आपले रक्त निस्वार्थीपणे देणे
6) विमानाने झेप घेण्याचे आणि उतरण्याचे स्थानक
7) वजन, ओझे
8) जुने पुराने, जिरलेले वस्त्र
9) केलेला नवस पूर्ण होणे, मनोरथ सफल होणे
10) ताबडतोब, अति जलद
11) व्यंकटेश माडगुळकर द्वारा लिखित एक प्रसिद्ध कादंबरी
17) मोदकाचे आच्छादन, धान्यावर पडणारी कीड
18) उकळी, लोट, तरंग
19) दोन पदार्थात एक पदार्थ दुसऱ्याच्या कितपट आहे हे दाखविणारी संख्या
21) यज्ञातील अग्नित आहुती घालणे
23) धारण करणारा
24) दक्ष, सावध, जागृत
26) यज्ञकर्म करणारा, समारोहाचा आयोजक
28) आश्रय, टेका
30) शेत जमिनीवरील कर
31) शक्तिमान, बलिष्ठ
35) मनातील तरंग काव्यरुपात सादर करणे
36) संध्याकाळची भयावह वेळ
37) न्हावी, हजामत करणारा
38) पाठीमागून दिसणारा
39) माजी पंतप्रधान लालबहाद्दुर शास्त्री यांच्या समाधीचे नाव
40) श्रीगणेशाचे एक नाव
42) या सुप्रसिद्ध नाट्यगीत गायकाचे नावे नागपुरात एक सभागृह बांधण्यात आले आहे.
45) छाती
48) सफलता, जय
49) आराध्य देवता
51) फार परिश्रमाने होणारे कष्ट
53) पहाट, सुर्योदयाची वेळ
54) आरामात, संथपणे
55) तरचा सोबती
58) तपस्या
59) ताडाच्या झाडापासून निघालेला ताजा रस
63) स्वामी, धनी
65) सलोखा, मैत्री
66) भविष्यात होणाऱ्या गोष्टींचे कथन
67) कुत्र्याचे ओरडणे
70) नेमक्या रेषांनी मूळ व्यक्तिचे विनोदी वैशिष्ट्य दाखविणारे चित्र
71) उजेड 72) एक संख्या
73) फिरस्ता भिक्षेकरी
74) क्षणोक्षणी, वारंवार
75) नवरदेव, देवाचा आशीर्वाद
78) श्रीकृष्णाचे एक नाव
81) मीठ
83) काळजीपूर्वक संगोपन
84) दौड, गति 85) उग्र वास
86) मृत्यु देवता
87) मोराचे ओरडणे
88) अमृत, गोड
(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सू | र्य | मु | खी | | वि | धे | य | क | | वै | मा | नि | क | | आ | ग |
| त्र | | | मा | | द्यु | | | लं | | भ | | र्व्य | | अ | ग्र | ज |
| धा | क | टा | | दा | त | | ए | क | मे | व | | स | त्या | ग्र | ह | |
| र | व | | लो | ह | चुं | ब | क | | ष | | मा | नी | | ले | | सु |
| | ड | | ह | | ब | हु | म | त | | व | धु | | सु | ख | | रे |
| क | सा | | पु | र | क | | त | प | न | | क | स | र | | का | ख |
| रा | | व | रु | ण | | य | | की | | प | री | | दा | य | क | |
| म | न | | ष | | र | त्न | पा | र | खी | | | | स | म | र | स |
| त | वा | ना | | अ | जा | | य | | र | क्त | ग | ट | | रा | व | ण |
| | ग | | ना | भि | | चौ | घ | डा | | | र्भ | | मा | ज | | वा |
| चिं | त | न | | शा | खा | | डी | | झी | | श्री | मा | न | | का | र |
| च | | व | र्धा | प | न | | | मी | | श्री | मं | त | | का | ना | |
| व | ळ | सा | | | दा | ख | ला | | स्व | ग | त | | अ | | डो | ह |
| णी | | ग | जा | न | न | | क्ष | मा | | णे | | अ | व | क | ळा | |
| | धो | र | ण | | | ग | णि | त | | शा | प | | कृ | पा | | सा |
| खो | का | | ता | ई | | वा | क | | गो | | | क | पा | ळ | मो | क्ष |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** तुम्ही करत असलेले काम तुमच्या कामात पुढे जाण्यास मोकळेपणाने मदत करेल. तुम्हाला काही महागड्या वस्तू मिळू शकतात.

**वृषभ:** आज तुम्ही भावनिकदृष्ट्या अस्वस्थ आहात. कुटुंबात भांडणे वाढू शकतात. कुटुंबात वाद होऊ शकतात. तुम्ही या बाबतीत चांगले पाऊल उचलले पाहिजे.

**मिथून :** आज तुमच्या आयुष्यात काहीतरी घडू शकते. जर तुम्ही कठोर परिश्रमाच्या जोरावर नोकरी शोधत असाल तर तुम्हाला जास्त वेळ वाट पाहण्याची गरज नाही.

**कर्क :** आज तुम्हाला तुमच्या खर्चाची चिंता असेल. तुमची चुकीची माहिती तुमचे नाते बिघडू शकते. कामाच्या ठिकाणी शिस्त पाळण्याची खूप गरज आहे.

**सिंह :** आज तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. चालू असलेल्या समस्या संपतील. तुम्हाला सामाजिक कार्यात किंवा राजकीय कार्यातही यश मिळू शकते.

**कन्या :** आजचा काळ मिश्रित परिणाम देणारा आहे. प्रगती आणि सन्मान मिळविण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. आज तुम्ही धार्मिक आणि आदर्शवादी व्हाल.

**तुळ :** तुम्ही सावधगिरी बाळगली पाहिजे आणि कोणत्याही भावनांमध्ये वाहून जाऊ नये. कर्ज देणे किंवा घेणे टाळावे. तुम्ही सट्टेबाजीवर आधारित गुंतवणूक करणे टाळावे.

**वृश्चिक :** कुटुंबातील सदस्यांमध्ये परस्पर मतभेद होऊ शकतात. अशांतता तुमच्यासाठी चिंतेचे कारण बनू शकते. अशा परिस्थितीत, निरुपयोगी गोष्टींवर जास्त वेळ वाया घालवू नका.

**धनु :** तुमच्या कामात महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. आज तुम्हाला सर्व क्षेत्रात यश मिळेल. एखादी जुनी ओळखीची व्यक्ती भेटू शकते.

**मकर :** तुम्ही तुमच्या भावना तुमच्या कुटुंबातील सदस्याला सांगू शकता. यावेळी तुम्ही तुमच्या बुद्धीने यश मिळवू शकाल. कोणत्याही कारणाशिवाय गोष्टींमध्ये जास्त ढवळाढवळ करू नका.

**कुंभ :** तुम्ही तुमच्या कामात पुढे जात राहाल. हे करण्यापासून तुम्हाला कोणीही रोखू शकत नाही. तुमच्या कष्टाचे फळ मिळेल; आज तुम्हाला तुमच्या मेहनतीचे पूर्ण फळ मिळेल.

**मीन :** नोकरी करणाऱ्यांना आज कामाचा ताण जास्त जाणवू शकतो. तुमचे काम पुढे नेत राहा. कौटुंबिक वादांसाठी स्वतःला दोष देऊ नका. स्वतःला मोकळे ठेवा.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### पाकिस्तानात हिंदू मंत्रीदेखील असुरक्षित



**कराची :** पाकिस्तानात सर्वसामान्य हिंदूंचा छळ नेहमीच होत असतो. परंतु यावेळी सिंधमध्ये एका हिंदूधर्मीय मंत्र्यावर हल्ला करण्यात आला आहे. सिंध प्रांतातील निदर्शक पाकिस्तान सरकारच्या वादग्रस्त सिंचन प्रकल्पाला विरोध करत होते. या प्रकल्पामुळे सिंध प्रांतात सिंचनासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या नद्यांचा प्रवाह कमी होणार असल्याचा निदर्शकांचा आरोप आहे. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये धार्मिक विषयक प्रकरणांचे राज्यमंत्री खेलदास कोहिस्तानी यांच्यावर या निदर्शकांनी हल्ला केला आहे. या हल्ल्यात कोहिस्तानी यांना कुठलीच ईजा झालेली नाही असा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी कोहिस्तानी यांच्यावरील हल्ल्याची निंदा करत याप्रकरणी सखोल चौकशी केली जाणार असल्याचे आश्वासन दिले आहे. लोकप्रतिनिधींवर हल्ला सहन केला जाणार नाही. या घटनेत सामील लोकांना कठोर शिक्षा केली जाणार असल्याचे शाहबाज यांनी म्हटले आहे. कोहिस्तानी सत्तारुढ पाकिस्तान मुस्लीम लीग-नवाज पक्षाचे सदस्य आहेत. सिंध पोलीस महानिरीक्षक गुलाम नबी मेमन यांच्याकडून पाकिस्तान सरकारने या हल्ल्याचा तपशील आणि केंद्रीय सचिवांकडून अहवाल मागविला आहे. सिंधचे मुख्यमंत्री सैयद मुराद अली शाह यांनी या हल्ल्याची कठोर शब्दांमध्ये निंदा केली आहे. कुणालाही कायदा स्वत:च्या हातात घेण्याचा अधिकार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### जाम्बिया विमानतळावर भारतीयाकडून १७ कोटी हस्तगत

**लुसाका :** आफ्रिकेतील देश जाम्बियाच्या कस्टम अधिकाऱ्यांनी एका भारतीय नागरिकाला अटक केली आहे. तस्करीच्या आरोपात ही कारवाई झाली आहे. अटक करण्यात आलेल्या भारतीय नागरिकाकडून अधिकाऱ्यांनी २३ लाख डॉलर्सपेक्षा (१७ कोटी रुपये) अधिक रोख रक्कम आणि ५ लाख डॉलर्सच्या मूल्याचे सोने हस्तगत केले आहे. सोन्याची तस्करी करत दुबईला जात असलेल्या या भारतीयाला अटक करण्यात आली आहे. या आरोपीचे नाव जाहीर करण्यात आलेले नाही. केनेथ कौंडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर ही कारवाई झाली आहे.२७ वर्षीय भारतीय नागरिकाला अटक करण्यात आली आहे. दुबईला जाण्यासाठी केनेथ कौंडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर हा इसम पोहोचला होता. त्याच्या तपासणीत २३,२०,०० डॉलर्स अन् सोन्याची बिस्किट्स आढळून आली. या सोन्याचे मूल्य सुमारे ५ लाख डॉलर्स असल्याचे ड्रग एन्फोर्समेंट कमिशनने सांगितले.नोटांचे बंडल रबर बँडने बांधून एका काळ्या बॅगेत ठेवण्यात आले होते. यानंतर ही बॅग एका मोठ्या सुटकेसमध्ये टाकण्यात आली होती. याप्रकरणी तपास सुरु आहे. आंतरराष्ट्रीय संघटित गुन्ह्यात सामील लोकांच्या विरोधात मोहीम राबवून त्यांना ताब्यात घेतले जाणार असल्याचे ड्रग एन्फोर्समेंट कमिशनने सांगितले आहे.जाम्बियामध्ये तांबे आणि सोन्यासारख्या खनिजांचे भांडार आहेत. अशा स्थितीत तेथे सोन्याच्या तस्करीचे प्रमाण तुलनेत अधिक आहे. २०२३ मध्ये जाम्बियामध्ये इजिप्तच्या ५ जणांना अटक करण्यात आली होती.

### खलिस्तान समर्थकांकडून गुरुद्वारा लक्ष्य



**व्हँकूवर :** भारताला विरोध करण्याच्या नादात खलिस्तान समर्थकांनी आता गुरुद्वाराला देखील लक्ष्य केले आहे. कॅनडाच्या व्हँकूवरमध्ये खलिस्तान समर्थकांनी एका ऐतिहासिक गुरुद्वाराला भारतविरोधी घोषणांनी रंगवून टाकले आहे. गुरुद्वारा व्यवस्थापनाने या तोडफोडीचा आरोप खलिस्तानी संघटनांवर केला आहे. व्हँकूवरमधील खालसा दीवान सोसायटी (केडीएस) गुरुद्वाराच्या भिंतीवर खलिस्तान समर्थक आणि भारतविरोधी मजकूर लिहिण्यात आला आहे. या गुरुद्वाराला रॉस स्ट्रीट गुरुद्वारा या नावाने ओळखले जाते. खलिस्तानचे समर्थन करणाऱ्या शीख फुटिरवाद्यांच्या एका छोट्या समुहाने खलिस्तान जिंदाबाद यासारख्या विभाजनकारी घोषणांसह आमच्या पवित्र भिंतींना खराब केले आहे असे केडीएसने वक्तव्य जारी करत म्हटले आहे. खलिस्तान समर्थकांनी ही आगळीक शनिवारी मध्यरात्री केली आहे. अज्ञात गुंड ट्रकमधून तेथे पोहोचले आणि गुरुद्वाराच्या गेट आणि बाहेरील भिंतींवर त्यांनी आक्षेपार्ह घोषणा लिहिल्या आहेत.


# पुतिन यांच्यासमोर झेलेन्स्कींचे नमते!

## विचारले-काय ३० दिवसांपर्यंत लोकांवरचे हल्ले थांबवू शकता

मॉस्को, दि.२१ वृत्तसंस्था

दोन्ही देशांचे एकमेकांवर युद्धबंदीच्या उल्लंघणाचा आरोप युक्रेनचे अध्यक्ष व्लादिमिर झेलेन्स्की यांनी रशियाला युक्रेनी नागरिकांवरील हवाई हल्ले ३० दिवसांसाठी थांबवण्याचा प्रस्ताव दिला आहे. त्यांनी रशियावर युद्धबंदीचे उल्लंघन केल्याचा आरोपही केला आहे. झेलेन्स्की यांनी एक्सवरील पोस्टद्वारे रशियाला हा प्रस्ताव दिला आहे. त्यांनी यापूर्वी रशियाकडून २००० वेळा युद्धबंदी उल्लंघन झाल्याची तक्रार केली होती. यानंतर, हवाई हल्ला थांबवण्याचा प्रस्तावही मांडला आहे.

झेलेन्स्की यांनी रविवारी नागरी पायाभूत सुविधांवर लांब पल्ल्याच्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांवर ३० दिवसांचा विराम देण्याचा प्रस्ताव मांडला. त्यांनी सांगितले की, ईस्टर युद्धबंदी दरम्यान रशियन सैन्याने २००० हून अधिक वेळा युद्धबंदीचे उल्लंघन केले, परंतु या काळात कोणतेही हवाई हल्ले झाले नाहीत. ते म्हणाले की, रशियाने जमिनीवरून हल्ले सुरू ठेवले असले तरी हवाई हल्ले झालेले नाहीत.



झेलेन्स्की यांनी एक्सवर लिहिले की, ईस्टरच्या दिवशी रात्री ८ वाजेपर्यंत कमांडर-इन-चीफ सिर्स्की चा अहवाल. या वेळेपर्यंत दिवसाच्या सुरूवातीपासून रशियन सैन्याने पुतिन यांच्या युद्ध विरामाचे दोन हजार वेळा उल्लंघन केले. विविध दिशांनी आमच्या स्थळांवर हल्ले करण्यात आले. ज्यात सर्वात जास्त हल्ले हे पोक्रोवस्क दिशेत झाले आहेत. रशियाकडून गोळीबाराच्या एकूण १,३५५ घटना घडल्या, त्यापैकी ७१३ घटनांमध्ये जड शस्त्रांचा वापर करण्यात आला.

सर्व प्रमुख आघाडीच्या दिशानिर्देशांमध्ये, रशियाने युद्धबंदीचे आश्वासन पूर्ण केलेले नाही आणि रशियाला संपूर्ण युद्धबंदीच्या आमच्या युक्रेनियन प्रस्तावाला प्रतिसाद देण्यासाठी जवळजवळ एक संपूर्ण दिवस पुरेसा नव्हता जो आतापासून, ईस्टरपासून सुरू होऊन, ३० दिवस चालेल.

मात्र, आज कोणत्याही हवाई हल्ल्याची चितावणी देण्यात आली नाही. युद्धबंदीचे हे स्वरूप साध्य झाले आहे आणि ते पुढे नेणे सर्वात सोपे आहे. युक्रेनने नागरी पायाभूत सुविधांवर लांब पल्ल्याच्या ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून होणारे कोणतेही हल्ले किमान ३० दिवसांसाठी थांबवण्याचा प्रस्ताव दिला आहे, जो आणखी वाढवता येऊ शकतो. जर रशिया अशा पावलाला सहमत नसेल, तर तो केवळ मानवी जीवन नष्ट करणाऱ्या आणि युद्ध लांबवणाऱ्या गोष्टी करत राहण्याचा प्रयत्न करत राहण्याचा पुरावा असेल.''

## म्यानमारमधील भूकंपाबद्दल धक्कादायक खुलासा; जमीन २० फूट सरकली

नायपीडॉ (म्यानमार) , दि.२१ वृत्तसंस्था

म्यानमारमधील मंडाले परिसरात २८ मार्च रोजी आलेल्या भीषण भूकंपानंतर आता शास्त्रज्ञांनी दिलेल्या एका धक्कादायक माहितीने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. ७.७ रिश्टर स्केल तीव्रतेच्या या भूकंपामुळे सागाईंग फॉल्टजवळील जमीन जवळपास २० फूट (सुमारे ६ मीटर) सरकली आहे, असा निष्कर्ष संशोधनातून समोर आला आहे. या नैसर्गिक आपत्तीत सुमारे ३,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून, हजारो लोक जखमी झाले आहेत.युरोपियन स्पेस एजन्सीचे सेंटिनेल-१ए आणि सेंटिनेल-२बी/सी उपग्रह, नासाची जेट प्रोपल्शन लॅबोरेटरी, तसेच क्लोटेक सिस्मोलॉजिकल लॅबोरेटरी यांनी मिळून दिलेल्या उपग्रह प्रतिमांवरून हे स्पष्ट झाले आहे की, हा इतिहासातील सर्वात मोठ्या स्ट्राइक-स्लिप भूकंपांपैकी एक होता.ॲडव्हान्स्ड रॅपिड इमेजिंग अँड ॲनालिसिस टीमने भूकंपाआधी आणि नंतरचे उपग्रह चित्रांचे विश्लेषण केले. त्यात काही ठिकाणी जमीन सुमारे ९ फूट (३ मीटर) तर काही भागांत २० फूटांपर्यंत सरकल्याचे स्पष्ट झाले. हा भूकंप भारतीय आणि युरेशियन प्लेट्सच्या संयोगस्थळी घडला, जो एक प्रमुख भूकंपीय फॉल्ट झोन मानला जातो.मंडालेमध्ये झालेल्या या भूकंपामुळे हजारो इमारती जमीनदोस्त झाल्या. यामुळे सुमारे ३,००० पेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू, ४,००० हून अधिक लोक जखमी, तर अनेक लोक बेपत्ता झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

## भिकाऱ्यांमुळे पाकची पुन्हा नाचक्की

इस्लामाबाद, दि.२१ वृत्तसंस्था

### सौदी अरेबियाने कारवाई करत ४,७०० जणांना पाठविले परत

पाकिस्तानला पुन्हा एकदा अपमानाचा सामना करावा लागत आहे. या अपमानाला जबाबदार पाकिस्तानचेच नागरिक आहेत. पाकिस्तानने अनेक वेळा आणि अरब देशांकडे मदत मागितली आहे. पण केवळ पाकिस्तान सरकारत नव्हे तर पाकिस्तानच्या नागरिकांनी देखील हातात वाठी परदेशात भीक मागण्याचा व्यवसाय केला आहे. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मोहम्मद आसिफ यांनी दिलेल्या माहितीनुसार, सौदी अरेबियाने पाकिस्तानच्या नागरिकांवर कारवाई केली असून त्यांना घरी पाठवण्यात आले आहे.

पाकिस्तानमध्ये सुमारे २.२ कोटी भिकारी आहेत. ते दरवर्षी भिक मागून दरवर्षी सुमारे ४२ अब्ज रुपये गोळा करतात. तथापि, हे भिकारी पाकिस्तानपुरते मर्यादित नाहीत तर वेगवेगळ्या माध्यमातून विदेशात जाऊन सुद्धा भीक मागत आहेत.



त्यामुळे पाकिस्तानची चांगलीच नाचक्की होत असून अलिकडेच सौदी अरेबियाने ४,७०० हून अधिक पाकिस्तान भिकाऱ्यांना पकडले आणि त्यांना परत पाठवले आहे, ही माहिती पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मोहम्मद आसिफ यांनी दिली. ते सियालकोट येथे रेडिमेड गार्मेंट्स मॅन्युफॅक्चरर्स अँड एक्सपोर्टर्स असोसिएशनच्या एका कार्यक्रमात बोलत होते.

पाकिस्तानातील भिकारीही हे वेगवेगळ्या व्हिसावर सौदीला गेले होते आणि तिथे बेकायदेशीरपणे भीक मागत होते. सौदी पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आणि हद्दपार केले. तथापि, हा आकडा कोणत्या कालावधीशी संबंधित आहे हे त्यांनी सांगितले नाही. ख्वाजा आसिफ म्हणाले की, परदेशात पाकिस्तानी भिकाऱ्यांची वाढती संख्या देशाची प्रतिमा खराब करत आहे.

फेडरल इन्व्हेस्टिगेशन एजन्सीने गेल्या वर्षी संसदीय समितीला सांगितले की, सौदी अरेबियाने २०२४ पर्यंत गेल्या तीन वर्षांत ४,००० भिकाऱ्यांना पाकिस्तानात पाठवले आहे.सौदी अरेबियामध्ये भिक्षा मागण्याविरुद्ध कडक कायदे आहेत. या कायद्यांनुसार, भिकाऱ्यांना दंड आणि तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.परदेशी भिकाऱ्यांना त्यांची शिक्षा पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या देशात परत पाठवले जाते. परदेशात असलेले बहुतेक पाकिस्तानी भिकारी दक्षिण पंजाब, कराची आणि सिंधच्या अंतर्गत भागातील आहेत.

## एक मंदिर, एक विहीर आणि एक स्मशानभूमी सूत्राचा स्वीकार करावा-मोहन भागवत

नवी दिल्ली, दि.२१ वृत्तसंस्था

एक मंदिर, एक विहीर आणि एक स्मशानभूमी या सूत्राचा स्वीकार करून स्वयंसेवकांनी सामाजिक सौहार्द निर्माण करावे, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी रविवारी (दि.२०) केले. त्यांनी एचबी इंटर कॉलेज आणि पंचन नगरी पार्क येथे आयोजित दोन वेगवेगळ्या शाखांमध्ये स्वयंसेवकांना संबोधित केले.संघ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहन भागवत हे सध्या पाच दिवसांच्या अलिगढ दौऱ्यावर आहेत. यावेळी स्वयंसेवकांना संबोधित करताना ते म्हणाले की, भारत हा जगाचा शांतीदूत आहे. जागतिक जबाबदारी पार पाडण्यासाठी खरी सामाजिक एकता आवश्यक आहे.

## इस्रोचा दुसरा प्रयत्नही यशस्वी, अवकाशात दुसरे डॉकिंगही विनाअडथळा पूर्ण

नवी दिल्ली : दि.२१ वृत्तसंस्था

इस्रोने पुन्हा एकदा अंतराळात एक मोठी कामगिरी केली आहे. इस्रोने त्यांच्या स्पाडेएक्स मोहिमेअंतर्गत दोन उपग्रहांना एकमेकांशी जोडण्यात यश मिळवले आहे. विज्ञान तंत्रज्ञान, अणुऊर्जा आणि अंतराळ विभागाचे राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी एक्स पोस्टवरून ही माहिती दिली आहे.

मंत्री जितेंद्र सिंग यांनी वर पोस्ट केली आणि लिहिले, उपग्रहांचे दुसरे डॉकिंग यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे हे कळवताना आनंद होत आहे. आधी सांगितल्याप्रमाणे, -६० / मोहीम ३० डिसेंबर २०२४ रोजी यशस्वीरित्या प्रक्षेपित करण्यात आली. त्यानंतर १६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ०६:२० वाजता उपग्रहांना प्रथमच यशस्वीरित्या डॉक करण्यात आले आणि १३ मार्च २०२५ रोजी सकाळी ०९:२० वाजता यशस्वीरित्या अनडॉक करण्यात आले. त्यानंतर सलग दुसऱ्यांदा अवकाशात यशस्वी विनाअडथळा दुसरे डॉकिंग



करण्यात आले''. पुढील दोन आठवड्यात पुढील प्रयोग करण्याचे नियोजन आहे.

भारताची महत्त्वाकांक्षी स्पाडेक्स मोहिम श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून ३० डिसेंबर रोजी प्रक्षेपित करण्यात आली होती. या मोहिमेत पीएसएलव्ही रॉकेट वापरून सुमारे २२० किलो वजनाचे दोन खास डिझाइन केलेले उपग्रह प्रक्षेपित करण्याचे उद्दिष्ट्ये होते. चेसर (०१) आणि टार्गेट (०२) असे हे उपग्रह पृथ्वीपासून ४७० किलोमीटर उंचीवर इस्रोच्या माध्यमातून यशस्वीपणे डॉक करण्यात आले. भारताच्या अवकाश तंत्रज्ञातील ही कामगिरी उल्लेखनिय आहे. कारण रशिया, अमेरिका आणि चीन या तीन देशांनी यापूर्वी अशा गुंतागुंतीच्या स्पेस डॉकिंग तंत्रांमध्ये प्रभुत्व मिळवले आहे. त्यानंतर भारताने देखील डॉकिंग प्रात्यक्षिक यशस्वीरित्या पूर्ण करून जागतिक स्तरावर अवकाश क्षेत्रात मैलाचा दगड पार केला आहे.

भारताच्या डॉकिंग प्रात्यक्षिकांच्या यशस्वी प्रयोगामुळे इथून पुढील अनेक अवकाश मोहिमांमधील उद्दिष्ट्य पार करण्यास मदत होणार असल्याचे इस्रोने म्हटले आहे. चंद्रावर भारतीयांचे स्थलांतर, चंद्रावरून नमुने परत करणे, भारतीय स्पेस स्टेशनची (बीएएस) उभारणी आणि ऑपरेशन इत्यादी भारताच्या महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहिमांसाठी हे तंत्रज्ञान भारतासाठी फायद्याचे ठरणार आहे. सामान्य मोहिमेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अनेक रॉकेट प्रक्षेपण आवश्यक असताना अंतराळात डॉकिंग तंत्रज्ञान आवश्यक आहे. या मोहिमेतील यशस्वी कामगिरीमुळे भारत अंतराळात डॉकिंग तंत्रज्ञान असलेला जगातील चौथा देश बनला आहे.

## भारतीय तोफगोळ्यांना जगभरातून मागणी

नवी दिल्ली, दि.२१ वृत्तसंस्था

भारताने अलीकडेच फिलीपिन्ससोबत ब्राह्मोस क्षेपणास्त्राचा करार केला आहे आणि व्हिएतनामसोबत ब्राह्मोस करारासाठी चर्चा सुरू आहे. याशिवाय, भारत आफ्रिका, दक्षिण अमेरिका आणि आग्नेय आशियातील देशांसोबत शस्त्रास्त्रे विकण्यासाठी चर्चा करत आहे. भारतात बनवलेल्या तोफगोळ्यांना युरोपमध्ये मोठी मागणी आहे.

भारतात बनवलेल्या तोफगोळ्यांना संपूर्ण जगातून मागणी येत आहे. अमेरिकेपासून युरोपीय देशांमध्ये भारतात बनणाऱ्या तोफगोळ्यांना चांगली मागणी येत आहे. जागतिक पुरवठा साखळीमुळे पश्चिमी देशांमध्ये दारूगोळ्याच्या



उत्पादन कमी झाले आहे. अशा परिस्थितीत भारताने स्वत:च्या सुरक्षा उपकरणातील तोफखाना दारूगोळ्याचा मोठ्या प्रमाणात पुरवठा केला आहे.

यातून भारताने एक पुरवठादार देश म्हणून आपले स्थान पक्के केले आहे. भारत सरकारच्या सूत्रांच्या माहितीनुसार, रॉयटर्सच्या एका अहवालात म्हटले आहे की, नवी दिल्ली १५५ मिमी च्या तोफगोळे फक्त ३०० ते ४०० डॉलरमध्ये बनवत आहे. जे पश्चिमी देश बनवत असलेल्या तोफगोळ्यांच्या तुलनेत दहाव्या भागापेक्षाही कमी आहे.

## तामिळनाडूत पहिली छोटी अणुभट्टी; अणुकचऱ्यापासून ५०० मेगावॉट वीजनिर्मिती

चेन्नई , दि.२१ वृत्तसंस्था

भारताने प्रदूषणावर नियंत्रण मिळविणासाठी देशात औष्णिक वीज निर्मितीपेक्षा आता आण्विक वीज निर्मितीवर भर दिला आहे. त्याअंतर्गत तामिळनाडूतील कल्पक्कम येथे भारतातील पहिले प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिॲक्टर पुढील वर्षी कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. या अणुभट्टीमुळे देशाच्या तीन टप्प्यांच्या अणुप्रकल्पाचा दुसरा टप्पा सुरू होईल, ज्याचा उद्देश अणुकचऱ्याचा पुनर्वापर करून वीज निर्मिती करणे आहे. या अणुभट्टीची रचना आयजीसीएआर अर्थात इंदिरा गांधी अणु संशोधन केंद्राने केली आहे. भारत सरकारने २००३ मध्ये भारतीय न्यूक्लियर पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड (भविनी) ला अणुभट्टी-प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिॲक्टर बांधण्यासाठी आणि चालवण्यासाठी मान्यता दिली. ही भारतातील पहिली छोटी अणुभट्टी आहे जी प्लुटोनियम-आधारित इंधन (मिश्रित ऑक्साईड) वापरेल आणि थंड करण्यासाठी द्रव सोडियम वापरेल. यामध्ये, सध्या वापरात असलेल्या प्रेशराइज्ड हेवी वॉटर रिॲक्टर्स मधून मिळणारे इंधन देखील पुन्हा वापरले जाईल.आणि ती अंतिम टप्प्यात असून त्यातून २०२६पर्यंत वीजनिर्मिती सुरू होण्याची अपेक्षा आहे. मार्च २०२४ मध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या रिॲक्टर व्हॉल्टला आणि रिॲक्टरच्या नियंत्रण कक्षाला भेट दिली.

## पोप फ्रान्सिस यांचे निधन, वयाच्या ८८ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

दिल्ली , दि.२१ वृत्तसंस्था

कॅथलिक चर्चचे प्रमुख आणि ख्रिश्चन धर्मीयांचे सर्वोच्च धर्मगुरू पोप फ्रान्सिस ( ) यांचे निधन झाले आहे. ते ८८ वर्षांचे होते. पोप फ्रान्सिस यांचे सोमवारी सकाळी ७:३५ वाजता निधन झाले, अशी माहिती व्हॅटिकनने () दिली. पोप यांच्या कार्यकाळात चर्चच्या कारभाराचे निरीक्षण करणारे व्हॅटिकन कॅमरलेंगो कार्डिनल केविन फॅरेल यांनी या वृत्ताला दुजोरा दिला. ''आज सकाळी ७:३५ वाजता, रोमचे बिशप, फ्रान्सिस यांचे देहावसान झाले,'' असे कार्डिनल फॅरेल यांनी जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे. ''त्यांचे संपूर्ण आयुष्य देवाच्या आणि चर्चच्या सेवेसाठी समर्पित राहिले.'' असेही त्यांनी नमूद केले आहे.



पोप फ्रान्सिस यांना फेब्रुवारी महिन्यात न्यूमोनिया आणि फुफ्फुसाच्या संसर्गामुळे रोमच्या जेमेली रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पोप फ्रान्सिस हे २६६वे पोप होते. ते अमेरिका खंडातून निवड झालेले सर्वप्रथम तर पोप ग्रेगरी तिसऱ्यानंतर (इ.स. ७३१-७३४) पोपपदी येणारा पहिले युरोपाबाहेरचे पुरुष होते. २०२२ मध्ये त्यांनी कॅनडाला भेट दिली. त्यांनी स्थानिक लोकांची चर्चने केलेल्या अत्याचारांबद्दल माफी मागितली होती. पोप फ्रान्सिस यांनी २०१३ मध्ये पोपपद स्वीकारले होते. पोप हे कॅथलिक ख्रिश्चन धर्मीयांचे सर्वोच्च धर्मगुरू असतात. ते व्हॅटिकन सिटीमधून जगभरातील भाविकांना संबोधित करतात.पोप फ्रान्सिस यांचा जन्म अर्जेंटिनामध्ये जॉर्ज मारियो बर्गोग्लिओ म्हणून झाला. त्यांच्या दशकभराच्या पोपपदाच्या कार्यकाळात दया, समावेशकता, नम्रता आणि पर्यावरण आणि उपेक्षित लोकांची विशेष काळजी घेण्यावर भर दिला.पोप फ्रान्सिस यांचा जन्म १७ डिसेंबर १९३६ रोजी अर्जेंटिनाच्या ब्यूनस आयर्स शहरात झाला. त्यांचे वडील इटालियन स्थलांतरित होते. त्यांनी १९५८ मध्ये गंभीर आजारातून बरे झाल्यावर सोसायटी ऑफ जीसस मध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. २८ फेब्रुवारी २०१३ रोजी पॉप बेनेडिक्ट यांनी राजीनामा दिल्यानंतर, १३ मार्च २०१३ रोजी झालेल्या पॉपल कॉन्क्लेव्हमध्ये बर्गोग्लियो यांची पोप फ्रान्सिस म्हणून निवड झाली.

## 'जिना हाऊस' बनणार डिप्लोमॅटिक एन्क्लेव्ह; परराष्ट्र मंत्रालयाने दिली मंजुरी

मुंबई: दि.२१ वृत्तसंस्था

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क : फाळणीचे गुन्हेगार मोहम्मद अली जिना यांनी मुंबईतील मलबार हिल्सवर बांधलेला भव्य बंगला म्हणजेच जिना हाऊस आता एका नवीन रूपात दिसणार आहे. परराष्ट्र मंत्रालयाने त्याचा वापर डिप्लोमॅटिक एन्क्लेव्ह (परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांचे निवासस्थान आणि कामाचे ठिकाण) म्हणून करण्यास मान्यता दिली आहे. त्याच्या दुरुस्तीचे काम लवकरच सुरू होईल. दिल्लीतील हैदराबाद हाऊसच्या धर्तीवर 'जिना हाऊस' वापरला जाईल. या घराची सध्याची किंमत सुमारे १५०० कोटी रुपये आहे. 'जिना हाऊस'चे खरे नाव साउथ कोर्ट आहे. फाळणीनंतर तो जिना हाऊस म्हणून ओळखला जाऊ लागला. तो पूर्वी भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद कडे होता. नंतर ५ ऑक्टोबर २०१७ रोजी मलबार हिलचे आमदार मंगल प्रभात लोढा यांनी परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांना पत्र लिहून 'जिना हाऊस'ला सांस्कृतिक केंद्र बनवण्याची विनंती केली.

जागतिक घडामोडी संबंधित बातम्या वाचण्यासाठी येथे क्लिक करा



: भगवान बुद्धांच्या पवित्र दाताचा फोटो व्हायरल; श्रीलंकेत सुरक्षेचा भंग, पोलिस तपासात गुंतले.बंगल्याच्या खास गोष्टी बंगल्याची आजची किंमत १५०० कोटी रुपये. त्यावेळी तो २ लाख रुपयांना बांधण्यात आला होता. बंगला इटालियन शैलीत बांधला गेला आणि संगमरवरही तेथून आणण्यात आले होते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्सचे प्रमुख क्लॉड बॅटली यांनी त्याची रचना केली होती. अडीच एकरातील बंगला समुद्राभिमुख आहे. बंगल्याच्या तळमजल्यावर व्हरांडा, सहा खोल्या, एक स्वयंपाकघर, स्टोअर रूम, गॅरेज आहे. त्यात नोकरांसाठी पाच खोल्या देखील आहेत.मुहम्मद अली जिना यांची एकुलती एक मुलगी दीना वाडिया यांनी २००७ साली मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेचा उद्देश होता जिना यांच्या मालमत्तेवर आपला कायदेशीर हक्क प्रस्थापित करणे. दीना यांना विशेषत: ''जिना हाऊस'' या ऐतिहासिक वास्तूवर हक्क मिळवायचा होता. ही मालमत्ता ब्रिटिश काळात उभारलेली असून ती एकेकाळी जिना यांचे खासगी निवासस्थान होते. मात्र भारत-पाक फाळणीच्या काळात जिना पाकिस्तानात गेले आणि ही मालमत्ता 'इव्हॅक्यूई प्रॉपर्टी' म्हणून घोषित करण्यात आली, म्हणजेच ज्या व्यक्ती भारत सोडून गेले, त्यांच्या मालमत्ता सरकारच्या ताब्यात गेल्या.

दीना वाडिया यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलगा नसली वाडिया याला या याचिकेमध्ये सहभागी होण्याची परवानगी देण्यात आली. त्यांनीही पुढे हा कायदेशीर लढा चालू ठेवला. ही मालमत्ता वादात सापडलेली असून तिच्या ऐतिहासिक व भावनिक मूल्यामुळे ती खास ओळखली जाते. वाडिया कुटुंब या घरावर हक्क मिळवण्याचा प्रयत्न करत आहे,

## आयपीएल गुणतालिका

| Teams | M | W | L | T | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुजरात | 7 | 5 | 2 | 0 | 0 | 10 | +0.984 |
| दिल्ली | 7 | 5 | 2 | 0 | 0 | 10 | +0.589 |
| बेंगलुरु | 8 | 5 | 3 | 0 | 0 | 10 | +0.472 |
| पंजाब | 8 | 5 | 3 | 0 | 0 | 10 | +0.177 |
| लखनौ | 8 | 5 | 3 | 0 | 0 | 10 | +0.088 |
| मुंबई | 8 | 4 | 4 | 0 | 0 | 8 | +0.483 |
| कोलकाता | 7 | 3 | 4 | 0 | 0 | 6 | +0.547 |
| राजस्थान | 8 | 2 | 6 | 0 | 0 | 4 | -0.633 |
| हैदराबाद | 7 | 2 | 5 | 0 | 0 | 4 | -1.217 |
| चेन्नई | 8 | 2 | 6 | 0 | 0 | 4 | -1.392 |

# रोहित, विराट ए+ ग्रेडमध्ये, श्रेयस, इशान किशनचे कमबॅक

## बीसीसीआयकडून वार्षिक कराराची घोषणा



**नवी दिल्ली : दि. २१ प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने २०२४-२५ हंगामासाठी टीम इंडियाच्या वरिष्ठ पुरुष खेळाडूंसाठी वार्षिक करार जाहीर केले आहेत. हे केंद्रीय करार १ ऑक्टोबर २०२४ ते ३० सप्टेंबर २०२५ दरम्यानच्या कालावधीसाठी असतील. रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा यांचे ए प्लस ग्रेड खेळाडूंच्या यादीत स्थान कायम राहिले आहे. तर मोहम्मद सिराज, केएल राहुल, शुभमन गिल, हार्दिक पंड्या, मोहम्मद शमी आणि ऋषभ पंत यांना ए ग्रेडमध्ये स्थान दिले आहे. सूर्यकुमार यादव, कुलदीप यादव, अक्षर पटेल, यशस्वी जैस्वाल आणि श्रेयस अय्यर यांचा बी ग्रेड खेळाडूंच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.बीसीसीआयने सोमवारी २०२४-२५ हंगामासाठी खेळाडूंचे केंद्रीय करार जाहीर केले. ज्यात कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी टी-२० आंतरराष्ट्रीय फॉरमॅटमधून निवृत्ती घेतल्यानंतरही वार्षिक कराराच्या यादीत अव्वल स्थान कायम ठेवले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, गेल्या वर्षी यादीतून वगळलेले श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांना यंदाच्या वार्षिक करारांमध्ये स्थान मिळाले.श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांना अनुक्रमे ग्रेड बी आणि ग्रेड सी खेळाडूंमध्ये स्थान देण्यात आले आहे. गेल्या वर्षी त्यांना करारातून वगळण्यात आले होते. कारण त्यांनी रणजी ट्रॉफीमध्ये न खेळण्याचा निर्णय घेतला होता. यावर बीसीसीआयने नाराजी व्यक्ती केली होती.

ए + ग्रेडमधील खेळाडूंच्या यादीत कोणताही बदल केलेला नाही. रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा यांचे या यादीत स्थान कायम आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर आर. अश्विनला करारात स्थान दिलेले नाही.सरफराज खान, नितीश कुमार रेड्डी, अभिषेक शर्मा, आकाश दीप, वरुण चक्रवर्ती आणि हर्षित राणा यांचाही कराराच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.

# रोहित-सूर्यासमोर चेन्नईने पत्करली शरणागती

**नवी दिल्ली : दि. २१ प्रतिनिधी**



रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव यांच्या स्फोटक अर्धशतकांच्या जोरावर मुंबई इंडियन्सने चेन्नई सुपर किंग्जचा ९ विकेट्सने पराभव केला. वानखेडे क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात, सीएसके संघाने प्रथम फलंदाजी करत निर्धारित २० षटकांत १७६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल, मुंबई संघाने केवळ १५.४ षटकांत १७७ धावा करून सामना जिंकला. या हंगामात मुंबईचा ८ सामन्यांमधील हा चौथा विजय आहे. तर सीएसकेला या हंगामात सहावा पराभव पत्करावा लागला आहे.

सीएसके विरुद्धच्या या सामन्यात, रोहित शर्मा मुंबई इंडियन्ससाठी इम्पॅक्ट सब म्हणून मैदानावर आला होता. रायन रिकल्टनसोबत डावाची सुरुवात करणाऱ्या रोहित शर्माने पहिल्याच चेंडूपासून आक्रमक वृत्ती दाखवायला सुरुवात केली. शानदार फलंदाजी करत रोहित शर्माने फक्त ३३ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. रोहित शर्माचे हे या हंगामातील पहिले अर्धशतक होते. मुंबईकडून रोहितने ४५ चेंडूत ४ चौकार आणि ६ षटकारांसह ७६ धावा करत नाबाद राहिला.मुंबई इंडियन्सचा रोहित शर्माच नाही तर सूर्यकुमार यादवही वानखेडेवर वादळ निर्माण करताना दिसला. सूर्यकुमारने रोहित शर्मासोबत मिळून फक्त २६ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. अशाप्रकारे, सूर्यकुमार यादवने मुंबईकडून शेवटी फलंदाजी करताना सामना संपवला. मुंबई इंडियन्सकडून सूर्यकुमार यादवने ३० चेंडूत ६८ धावा केल्या. सूर्यकुमारने त्याच्या डावात ६ चौकार आणि ४ षटकारही मारले. मुंबईकडून सूर्यकुमार यादव व्यतिरिक्त रायन रिकेल्टनने १९ चेंडूत २४ धावांचे योगदान दिले.मुंबई इंडियन्स विरुद्धच्या या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जची गोलंदाजी अगदी सामान्य होती. रवींद्र जडेजा वगळता सीएसकेचा दुसरा कोणताही गोलंदाज विकेट घेण्यात यशस्वी झाला नाही. याशिवाय, या सामन्यात एमएस धोनीच्या कर्णधारपदाची जादूही चालली नाही.

# हरभजन सिंग आणि सुरेश रैना त्यांच्या माजी संघावर संतापले !

**नवी दिल्ली : दि. २१ प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ च्या पॉईंट टेबलवर नजर टाकली तर गुजरात टायटन्स, दिल्ली कॅपिटल्स, पंजाब किंग्स, लखनौच्या संघ या स्पर्धेमध्ये कमालीची कामगिरी करताना दिसत आहेत.

तर दुसरीकडे नजर टाकली आयपीएलमध्ये सर्वात यशस्वी संघ मुंबई इंडियन्स हैदराबाद, कोलकाता आणि चेन्नई सुपर किंग्स हे संघ सध्या तळाला आहेत. आतापर्यत झालेल्या स्पर्धेमध्ये हे संघ चांगली कामगिरी करण्यात अपयशी ठरले आहेत. आयपीएलच्या या सीझनमध्ये ५ वेळा चॅम्पियन असलेल्या महेंद्रसिंहचा संघ चेन्नई सुपर किंग्जची अवस्था खूपच वाईट आहे. आतापर्यंत त्याला ८ सामन्यांत फक्त २ विजय मिळाले आहेत. सीएसके आयपीएल पॉइंट टेबलमध्ये तळाशी आहे आणि प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडण्याच्या उंबरठ्यावर आहे. हरभजन सिंग आणि सुरेश रैना सीएसकेची अशी दुर्दशा सहन करू शकत नाहीत. हे दोघेही पूर्वी चेन्नईकडून खेळले आहेत आणि आता त्यांना समालोचक म्हणून आयपीएलमध्ये काम करत आहेत. कॉमेंट्री दरम्यान, दोघांनीही सीएसकेवर आपला राग व्यक्त केला आणि त्यांच्या लिलावाच्या धोरणावर प्रश्न उपस्थित केले.रविवारी २० एप्रिल रोजी चेन्नई सुपर किंग्जला त्यांच्या कट्टर प्रतिस्पर्धी मुंबई इंडियन्सविरुद्ध ९ विकेट्सने निराशाजनक कामगिरीमुळे पराभव पत्करावा लागला. त्याच सामन्याच्या समालोचनाच्या वेळी, हरभजन सिंग आणि सुरेश रैना यांनी सीएसकेच्या लिलावाच्या रणनीतीचा पर्दाफाश केला.

## विराट कोहलीने मोडला आयपीएलचा सर्वात मोठा विक्रम



आयपीएल २०२५ मध्ये, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने पंजाब किंग्ज विरुद्धचा सामना ७ विकेट्सने जिंकला. या विजयासह या हंगामातील त्यांचा ५ वा विजय होता. या सामन्यात, आरसीबीसाठी विराट कोहलीच्या फलंदाजीतून एक शानदार अर्धशतकी खेळी दिसून आली, ज्याच्या आधारे त्याने आयपीएलमध्ये एक मोठा पराक्रमही केला आहे. यासह त्याने डेव्हिड वॉर्नरचा एका मोठा विक्रम मोडला आहे.कोहली आता आयपीएलमध्ये सर्वाधिक वेळा ५० हून अधिक धावा करणारा फलंदाज बनला आहे

विराट कोहलीच्या नावावर आयपीएलमध्ये सर्वाधिक ६६ वेळा ५० हून अधिक धावा करण्याचा विक्रम आहे आता विराटने त्याला मागे टाकत सर्वाधिक ६७ वेळा ५० हून अधिक धावा करण्याचा विक्रम नोंदवला आहे. कोहलीच्या नावावर आयपीएलमध्ये ८ शतके आणि ५९ अर्धशतके आहेत.

# आयपीएल :आयुष म्हात्रेचे धमाकेदार पदार्पण



**नवी दिल्ली : दि. २१ प्रतिनिधी**

१४ वर्षीय वैभव सूर्यवंशीचे आयपीएल पदार्पण इतिहासाच्या पानांमध्ये नोंदले गेले आहे. त्याने पहिल्याच चेंडूवर षटकार मारला इतिहास रचला. आता त्याच्यासोबतच खेळाडू आयुष म्हात्रेची आयपीएल कारकीर्दही सुरू झाली आहे. हे दोन्ही खेळाडू १९ वर्षांखालील क्रिकेट संघात एकत्र खेळले आहेत. आयुष म्हात्रेनेही आपल्या आयपीएल कारकिर्दीची सुरुवात एका वादळी खेळीने केली. यासह त्याने चेन्नई सुपर किंग्जसाठी इतिहास रचला.आयुष म्हात्रेने मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांविरुद्ध आक्रमक फलंदाजी केली. १७ वर्षीय आयुष म्हात्रेने त्याच्या आयपीएल कारकिर्दीची सुरुवात अतिशय दमदार पद्धतीने केली. त्याने पहिल्याच चेंडूवर एक धाव घेऊन आपले खाते उघडले. यासह त्याने चेन्नई सुप किंग्जसाठी एक खास पराक्रम केला आहे. तो आयपीएलमध्ये सीएसकेचे प्रतिनिधित्व करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. या बाबतीत त्याने अभिनव मुकुंदला मागे टाकले आहे.

याआधी हा विक्रम त्याच्या नावावर होतायानंतर आयुष म्हात्रेने दुसऱ्या चेंडूवर चौकार आणि तिसऱ्या चेंडूवर षटकार मारून आपला दृष्टिकोन दाखवला. या सामन्यात आयुष म्हात्रेने १५ चेंडूत ३२ धावांची खेळी केली. या काळात त्याच्या बॅटमधून ४ चौकार आणि २ षटकार पाहायला मिळाले. विशेष म्हणजे आयुष म्हात्रेने २१३.३३ च्या स्ट्राईक रेटने या धावा केल्या, ज्याची सीएसकेला खूप गरज होती.आयुष म्हात्रे फलंदाजीसाठी आला तेव्हा चेन्नई सुपर किंग्जने ३.१ षटकांत १ गडी गमावून फक्त १६ धावा केल्या होत्या. अशा परिस्थितीत आयुष म्हात्रेने येताच जलद गतीने धावा काढल्या आणि संघाला चांगली सुरुवात करून दिली. आयुष म्हात्रेने पॉवरप्लेमध्ये दोन्ही षटकार मारले.

## इन्फोसिसने २४० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना दिला नारळ



**नवी दिल्ली :** भारतातील आघाडीची आयटी कंपनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इन्फोसिसने २४० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकल्याची माहिती समोर आली आहे. यामागचं कारण म्हणजे या २४० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींना अंतर्गत मूल्यांकन चाचणी परीक्षा उत्तीर्ण करता आली नाही. त्यामुळे त्यांना कामावरून काढून टाकण्यात आलं असल्याची माहिती सांगितली जात आहे.गेल्या वर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या दरम्यान हे प्रशिक्षणार्थी कंपनीत सामील झाले होते. यानंतर या सर्व प्रशिक्षणार्थींची अंतर्गत मूल्यांकन चाचणी परीक्षा घेण्यात आली. मात्र, या परीक्षेत हे प्रशिक्षणार्थी उत्तीर्ण होऊ न शकल्यामुळे ही कारवाई करण्यात आली. खरं तर हे प्रशिक्षणार्थी नोकरीची वाट पाहत होते. मात्र, त्यांचं इन्फोसिसमध्ये नोकरी करण्याचं स्वप्न भंगलं आहे. १८ एप्रिल रोजी पाठवलेल्या कंपनीच्या ईमेलनुसार, इन्फोसिसने अंतर्गत मूल्यांकन चाचण्या उत्तीर्ण न झालेल्या २४० एंट्री-लेव्हल कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढून टाकलं आहे. तसेच याआधीही फेब्रुवारीमध्ये कंपनीने अशाच प्रकारे ३०० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींना कामावरून काढून टाकलं होतं.सिस्टीम इंजिनिअर्स आणि डिजिटल स्पेशालिस्ट इंजिनिअर्स म्हणून नियुक्त केलेले प्रशिक्षणार्थी 'जेनेरिक फाउंडेशन ट्रेनिंग प्रोग्राम'मध्ये अतिरिक्त तयारीसाठी वेळ, शंका निरसन चर्चा सत्रे, मॉक असेसमेंट्स आणि तीन चाचण्या घेऊन देखील हे प्रशिक्षणार्थी पात्रता निकष पूर्ण करू शकले नाहीत. त्यामुळे त्यांना कामावरून काढून टाकल्याचं वृत्तात म्हटलं आहे.इन्फोसिसने नोकरीवरून काढून टाकलेल्या प्रशिक्षणार्थींना कंपनी प्रायोजित बाह्य प्रशिक्षण कार्यक्रमांचा पर्याय दिला आहे.

# युपीआय व्यवहार : २००० रुपयांहून अधिक रकमेवर जीएसटी नाही!

**नवी दिल्ली : दि. २१ प्रतिनिधी**

डिजिटल व्यवहारात क्रांती घडवणाऱ्या युपीआय () प्रणालीविषयी सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर अफवा पसरवल्या जात आहेत की, आता २००० रुपयांहून अधिक रकमेच्या व्यवहारांवर सरकारकडून जीएसटी () आकारला जाणार आहे. त्यामुळे लोकांमध्ये संभ्रम व संताप निर्माण झाला. मात्र अर्थ मंत्रालयाने या प्रकरणावर अधिकृत स्पष्टीकरण देत या सर्व अफवांना पूर्णविराम दिला आहे.अर्थ मंत्रालयाने शुक्रवारी जारी केलेल्या निवेदनात स्पष्ट केले की, युपीआय व्यवहारांवर कोणताही जीएसटी आकारला जाणार नाही. सोशल मीडियावर फिरणारी बातमी चुकीची, भ्रामक आणि तथ्यहीन असल्याचे सांगत मंत्रालयाने जनतेला विश्वासात घेतले. मंत्रालयाने स्पष्ट केले की, व्यवहार हे जीएसटीच्या कक्षेत येत नाहीत आणि सध्या सरकारचा असा कोणताही विचारही नाही.सरकारने अधिक स्पष्ट करताना सांगितले की, जीएसटी केवळ मर्चंट डिस्काउंट रेट () वर लागू होतो. क्रेडिट कार्डसारख्या विशिष्ट डिजिटल पेमेंट्स साधनांद्वारे जेव्हा व्यवहार होतो, तेव्हा व्यापाऱ्याकडून आकारले जाते, आणि त्यावर जीएसटी लागतो. मात्र, जानेवारी २०२० पासून, व्यक्ती ते व्यापारी (२) स्वरूपातील व्यवहारांवरील रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे व्यवहारांवर जीएसटी



लागू होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.अर्थ मंत्रालयाने असेही सांगितले की, सरकार डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रोत्साहन योजनाही राबवत आहे. वित्तीय वर्ष २०२१-२२ पासून ही योजना लागू करण्यात आली असून, त्यामध्ये लहान रकमेचे व्यवहार (२) प्रोत्साहित केले जात आहेत. त्यामुळे लहान व्यापाऱ्यांना व्यवहार शुल्क न लागता डिजिटल पेमेंट स्वीकारणे सोपे झाले आहे.

भारतातील व्यवहार वेगाने वाढत आहेत. वित्तीय वर्ष २०१९-२० मध्ये व्यवहारांचे एकूण मूल्य ₹२१.३ लाख कोटी होते, जे २०२३-२४ या आर्थिक वर्षात वाढून ₹२६०.५६ लाख कोटींवर गेले आहे. यामध्ये व्यक्ती ते व्यापारी (२) व्यवहारांचा वाटा ₹५९.३ लाख कोटींचा आहे.सरकारने युपीआय व्यवहारांवर कर लावण्याऐवजी, उलट या व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी हजारो कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे. २०२३-२४ मध्ये प्रोत्साहन योजनेंतर्गत ₹३,६३१ कोटींची रक्कम वितरित करण्यात आली. यापूर्वीच्या आर्थिक वर्षात ₹२,२१० कोटींचे अनुदान देण्यात आले होते. हे स्पष्ट दाखवते की सरकारचा उद्देश डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्याचा आहे, आणि वापरात वाढ व्हावी यासाठी आर्थिक पाठबळ दिले जात आहे. व्यवहारांवर २००० रुपयांहून अधिक रकमेवर लावण्याचा कोणताही निर्णय किंवा विचार सरकारकडे नाही.

सध्याच्या प्रणालीप्रमाणे, युपीआय व्यवहारांवर लागत नसल्यामुळे त्यावर लागू होत नाही. सरकार व्यवहारांना चालना देण्यासाठी प्रोत्साहन योजना आणि अनुदानाच्या माध्यमातून मदत करत आहे.

## कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण


**नवी दिल्ली : दि. २१ प्रतिनिधी**

रशिया-युक्रेन आणि अमेरिका-इराण चर्चेच्या यशाचा परिणाम कच्च्या तेलाच्या किमतींवर दिसून येत आहे. अमेरिका आणि इराणमधील आण्विक चर्चा प्रगतीपथावर असल्याने पुरवठ्याच्या समस्या कमी झाल्या आहेत. त्यामुळे सोमवारी आशियामध्ये कच्च्या तेलाच्या किमती एक टक्क्यांहून अधिक घसरल्या.ब्रेंट क्रूड फ्युचर्स १.५०% घसरून ६६.९४ प्रति बॅरलवर पोहोचले. याशिवाय, यूएस वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट क्रूडमध्येही १.५२% ची घट झाली. त्यानंतर किंमत प्रति बॅरल ६३.७० पर्यंत खाली आली. आज ईस्टरनिमित्त अनेक देशांमध्ये सुट्टी आहे, त्यामुळे सोमवारच्या सत्रात कच्च्या तेलाच्या वायदा व्यवहाराचे प्रमाण नेहमीपेक्षा कमी असू शकते. या महिन्यात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. एक वेळ अशी आली जेव्हा किमती चार वर्षातील नीचांकी पातळीवर पोहोचल्या होत्या. यामागील कारण म्हणजे अमेरिकेचा टॅरिफ.अमेरिका आणि चीनमधील वाढत्या व्यापार युद्धामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या मागणीत घट होऊ शकते, अशी चिंता गुंतवणूकदारांना आहे. याशिवाय, ओपेकने उत्पादन अधिक वेगाने वाढवण्याच्या निर्णयामुळे मंदी आणखी वाढली आहे. बाजारात अतिरिक्त पुरवठ्याची भीतीही वाढत आहे.अमेरिका आणि इराण यांनी शनिवारी अणु करारासाठी एक चौकट तयार करण्यावर सहमती दर्शवली. ज्याचे वर्णन अमेरिका आणि इराणच्या अधिकाऱ्यांकडून चांगली प्रगती म्हणून केले जात आहे. आता लग्नाच्या कार्यक्रमांबाबत दोन्ही देशांमधील ही चर्चा ३ तासांपेक्षा जास्त काळ चालली. बुधवारी ओमानमध्ये ही चर्चा पुन्हा सुरू होईल.

## शेअर बाजारात तेजी, सेन्सेक्स ८०० अंकांनी वधारला

**नवी दिल्ली : दि. २१ प्रतिनिधी**

आज सोमवारी (२१ एप्रिल) आठवड्याच्या पहिल्या दिवशी भारतीय शेअर बाजारात जोरदार तेजी पाहायला मिळाली आहे. आज सकाळी बाजार सुरु झाला तेव्हा शेअर बाजाराने जोरदार उसळी घेतल्याचं पाहायला मिळालं आहे. निफ्टीने २४,००० अंकांचा टप्पा ओलांडला आहे. तसेच सेन्सेक्सने ७९,००० चा टप्पा पार केला आहे. ६ जानेवारी २०२५ नंतर निफ्टीने पहिल्यांदाच २४,००० अंकांचा ओलांडला आहे. त्यामुळे शेअर बाजारात आठवड्याची सुरुवात तेजीत पाहायला मिळाली आहे.सुरुवातीच्या व्यवहारात बीएसईच्या ३० शेअर्सचा सेन्सेक्स ५९९.६६ अंकांनी वाढून ७९,१५२.८६ वर पोहोचला, तर एनएसईचा निफ्टी १५२.५५ अंकांनी वाढून २४,००४.२० वर पोहोचला. सेन्सेक्समधील कंपन्यांपैकी टेक महिंद्रा,



ॲक्सिस बँक, एचडीएफसी बँक, इन्फोसिस, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इंडसइंड बँक हे सर्वात जास्त वधारल्याचं पाहायला मिळालं. तसेच अदानी पोर्ट्स, आयटीसी, भारती एअरटेल, टायटन, हिंदुस्तान युनिलिव्हर आणि सन फार्मा हे घसरणीच्या यादीत होते.एचडीएफसी बँकेच्या एकत्रित निव्वळ नफ्यात मार्चच्या तिमाहीत ७ टक्के वाढ होऊन १८,८३५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. एचडीएफसीच्या शेअर्समध्ये १ टक्क्यांहून अधिक वाढ झाली, तर आयसीआयसीआय बँकेच्या शेअर्समध्ये जवळपास १ टक्क्यांची वाढ झाली. तसेच इन्फोसिसने मार्च तिमाहीत एकत्रित निव्वळ नफ्यात ११.७ टक्क्यांनी घट होऊन ७,०३३ कोटी रुपये झाल्याचे वृत्तानंतरही कंपनीच्या शेअर्समध्ये फक्त १ टक्क्यांहून अधिक वाढ झाली. दरम्यान, जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे व्हीके विजयकुमार यांनी म्हटलं की, ''एचडीएफसी बँक आणि आयसीआयसीआय बँकेच्या चौथ्या तिमाहीतील बँक निफ्टीला आतापर्यंतच्या उच्चांकावर नेण्याची क्षमता आहे.'' तर एक्सचेंज डेटानुसार, परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (एफआयआय) गुरुवारी ४,६६७.९४ कोटी रुपयांच्या इक्विटी खरेदी केल्या.






अजिंक्य भारत

# आपला विदर्भ

अकोला, मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५









## थोडक्यात

### पात्र विमाधारकांना भरपाई अदा करण्याची कारवाई सुरु

**अकोला :** प्रधानमंत्री पिक विमा योजनेत खरीप हंगामात अतिवृष्टी व इतर कारणामुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना एकूण सुमारे ७८ कोटी रुपये भरपाई अदा करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिका-यांनी कळविले आहे. दरम्यान, तेल्हारा तालुक्यातील तळेगाव बाजार येथील शेतकरी गोवर्धन चोपडे यांच्या खात्यात २३१ रु. ४२ पैसे जमा झाले असल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले. तथापि, शेतकरी श्री. चोपडे यांना दि. १६ एप्रिल २०२५ रोजी ४ हजार ४२७ रू. विमा रक्कम अदा केल्याचे झाल्याचा अहवाल विमा कंपनीने दिला आहे.

केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचना दि. ०६ एप्रिल २०२४ मधील तरतुदीनुसार अधिसूचित गटातील पूर्वसूचना दिलेल्या शेतकऱ्यांचे बाधित क्षेत्र हे विमा संरक्षित क्षेत्राच्या २५ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास प्राप्त नुकसानीच्या पूर्वसूचनांपैकी १० पूर्वसूचनांचे नमुना सर्वेक्षण करून २ लक्ष ६८ हजार २६७ शेतक-यांना ७८ कोटी रुपये नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात येत आहे, असे जिल्हा अधिक्षक कृषी अधिका-यांनी कळविले आहे.

### शाखा डाकपालाचा गैरव्यवहार; टपाल खातेदारांना माहिती सादर करण्याचे आवाहन

**अकोला:** टपाल खात्याच्या वाई परगणे येथील शाखा डाकपालाने बचत योजनांतील शासकीय रकमेचा खासगी कामांसाठी वापर केला. त्याबाबत कारवाई सुरू आहे. दरम्यान, या शाखेच्या खातेदारांनी आपल्या बचत ठेव योजना, रकमा आदी माहिती कागदपत्रांसह दि. २५ एप्रिलपूर्वी सादर करण्याचे आवाहन खात्याच्या प्रवर अधिक्षकांनी केले आहे. कारंजा उपडाकघरअंतर्गत वाई परगणे शाखा आहे. तेथील शाखा डाकपाल संजय शाळिग्राम भुयटे यांनी खातेदारांच्या बचत खाते, आवर्ती जमा, सुकन्या समृद्धी योजना अशा विविध खात्यांतील शासकीय रकमेचा गैरव्यवहार करून ती खासगी कामासाठी वापरल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास आला. त्याबाबत कारवाई सुरू आहे. दरम्यान, या शाखेच्या खातेदारांनी आपले संबंधित बचत योजनेचे खातेपुस्तक किंवा तत्सम कागदपत्रे दि. २५ एप्रिलपूर्वी सहाय्यक अधीक्षक, वाशिम पश्चिम उपविभाग, मूर्तिजापूर यांच्याकडे तपासणीसाठी सादर करावीत. जे खातेदार मुदतीत आपले पुस्तक तपासणीला सादर करणार नाहीत, त्यांचा कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही, असे आवाहन प्रवर अधिक्षकांनी केले आहे.

### प्रा. मधू जाधवांसारख्या व्यक्तिमत्त्वाची समाजाला गरज – नि. न्यायमूर्ती पुखराज बोरा




**अकोला :** प्रा. मधू जाधवांसारखा स्पष्टक्ता आणि निर्भिड व्यक्तिमत्वाची आज समाजाला खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश पुखराज बोरा यांनी केले. प्रा. मधू जाधव अमृत महोत्सवी सोहळ्याच्या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी सभा मंचावर लोकमत नागपूर आवृत्तीचे संपादक श्रीमंत माने, नागपूर येथील रंगकर्मी सौ. रुपाली मोरे (कोंडेवार) आणि महिला आयोगाच्या माजी सदस्या डॉ. आशा मिरगे, सन्मानमूर्ती प्रा. मधू जाधव व सौ. मिना जाधव यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरवात कु. लावण्या भोसले हिने सादर केलेल्या नांदीने करण्यात आली. अकोल्यातील ज्येष्ठ पत्रकार, रंगकर्मी प्रा. मधु जाधव यांचा ७५ व्या वाढदिवसानिमित्य अमृत महोत्सवी सोहळा प्रभात किड्स स्कूलच्या सभागृहात १९ एप्रिल रोजी मोठ्या थाटात संपन्न झाला. या कार्यक्रमाला अकोल्यातील ज्येष्ठ कलावंत मित्रमंडळी तसेच प्रा. मधु जाधव यांचे शिष्य यांनी आपली आवर्जून उपस्थिती दर्शविली. प्रभातच्या संचालिका सौ. वंदना नारे, स्नेहल गावंडे, इंदुताई देशमुख, सौ. भूमिका भोसले, वृषाली जाधव, अनिता जाधव, सुषमा जाधव, रोशनी जाधव, रंजना जाधव किरण जाधव, दिपाली जाधव, उमा जाधव यांच्या हस्ते प्रा. मधु जाधव यांचे औक्षवण व ७५ दिव्यांनी ओवाळणी करून त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर कु. अदिती अभिनय जाधव हिने मधुर गीत गायन केले. याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी प्रा. मधु जाधव यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलुंवर प्रकाश टाकला. प्रा. मधु जाधव यांच्यासोबत काम केलेल्या नाट्यकलावंतांमध्ये खटोड गुरुजी, ओंकारमल धुत, गणेश घुगे, शालिनी सुळे, ॲड.मंगला पांडे, ॲड. विनोद साकरकर, अशोक ढेरे, शशिकांत जोशी, विश्वास बोराळे, राजकुमार उखळकर, डॉ. सुमेधा हर्षे यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. मधु जाधव यांच्या विद्यार्थ्यांनी देखील याप्रसंगी उपस्थित राहून आपले मनोगत व्यक्त केले.

# उन्हाळ्याच्या सुट्टीत 'मामाचे गाव' झाले परके

## बदलत्या जीवनशैलीचा परिणाम, 'अगीनगाडी'च्या गाण्याची जागा समर कॅम्प, क्लासेसनी घेतली

। उमेश इंगोले ।

**नेर (परसोपंत), दि. २१ :** उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागताच 'मामाच्या गावाला जाऊया' ची ओढ आता कमी झाली आहे. आधुनिक जीवनशैली, विभक्त कुटुंबे आणि स्पर्धेच्या युगात 'बच्चे कंपनी'साठी मामाचा गाव परका झाला आहे. आकाशवाणीवरील ते गीत केवळ आठवण उरली असून, त्याची जागा आता समर कॅम्प आणि विविध क्लासेसनी घेतली आहे.

शाळांचे शैक्षणिक सत्र नुकतेच संपले असून मुलांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत, सुट्टी लागताच 'झुक झुक अगीनगाडी... मामाच्या गावाला जाऊया' हे गाणे आणि त्यासोबत मामाच्या गावी जाण्याची लागलेली ओढ, हे एक समीकरणच होते.



मामाच्या घरी मिळणारे प्रेम, आजी-आजोबांचे लाड, शेता-शिवारात मनसोक्त बागडणे, आंब्याच्या झाडावर चढणे, विहिरीत पोहणे आणि कसल्याही अभ्यासाच्या किंवा वेळेच्या बंधनाशिवाय मिळणारी सुट्टी, हा अनुभव अविस्मरणीय असायचा. मात्र, आज चित्र बदलले आहे. आधुनिक आणि वेगवान जीवनशैली, 'आम्ही दोघे, आमचे दोघे' या संकल्पनेमुळे लहान झालेली कुटुंबे, यामुळे मामा-मामी, आजी-आजोबा यांच्यासोबतचे भावनिक नाते पूर्वीसारखे घट्ट राहिलेले नाही. घरात आलेली दूरचित्रवाणी आणि प्रत्येकाच्या हातात आलेला भ्रमणध्वनी यामुळे एकत्र येऊन गप्पा मारण्यासाठी किंवा एकमेकांना वेळ देण्यासाठी कोणाकडे उसंतच नाही. परिणामी, बच्चे कंपनीसाठी हक्काचा वाटणारा मामाचा गाव आता हळूहळू परका होत चालला आहे. याची जागा आता शहरी आणि काही प्रमाणात ग्रामीण भागातही समर कॅम्प, विविध कला-गुण विकसित करणाऱ्या क्लासेसनी घेतली आहे.

> स्पर्धेच्या युगात आपला पाल्य मागे राहू नये, या काळजीपोटी पालक मुलांना उन्हाळी शिबिरे, पेंटिंग क्लास, कराटे क्लास, कॉम्प्युटर कोर्सेस अशा ठिकाणी पाठवण्यास प्राधान्य देत आहेत. यामुळे मुले काहीतरी नवीन शिकत असली, तरी मामाच्या गावी अनुभवता येणा?्या निखळ आनंदाला, मायेच्या ओलाव्याला आणि नातेसंबंधांच्या वीणेला ती मुकत आहेत, हे वास्तव आहे. विभक्त कुटुंब पद्धती, बदलती जीवनशैली आणि स्पर्धेचे युग यांचा एकत्रित परिणाम म्हणून आजच्या पिढीसाठी 'मामाचा गाव' एक केवळ आठवण किंवा ऐकीव गोष्ट बनू पाहत आहे.

## कोरम्या नावाने झाडीपट्टीत प्रणयची नवीन ओळख

### बाजारी विकलेली नार नाटकातून पाडली अभिनयाची छाप

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**चंद्रपूर, दि. २१ :**झाडीपट्टीत दिवाळी पासून ते होळी पर्यंत चालणारी झाडीपट्टी रंगभूमीची नाटकं हा झाडीपट्टीतील लोकांच्या केवळ मनोरंजनाचा नव्हे तर जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. झाडीपट्टी रंगभूमीच्या नाटकाला झाडीपट्टीतील लोकं भरभरून प्रेम देतात. झाडीपट्टी रंगभूमीचं एखादी नाटक प्रेक्षकांना आवडलं तर त्या नाटकाला आणि त्या नाटकात अभिनय करणाऱ्या कलावंतांना झाडीपट्टीतील रसिकमायबाप अक्षरशः डोक्यावर घेतात. मग ते नाटक आणि त्या नाटकात अभिनय करणारे कलावंत नकळत अजरामर होऊन जातात. २०२४ - २५ च्या झाडीपट्टी नाट्य हंगामात शिवम् थिएटर्स नागभीड - वडसाचं बाजारी विकलेली नार अर्थात भाड्याची बायको हे नाटक प्रेक्षकांच्या भेटीस आलं. मा. युवराज गोंगले यांच्या लेखणी आणि दिग्दर्शनातून साकारलेल्या या नाटकाला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिलं. या नाटकाच्या सादरीकरणाला प्रेक्षकांनी तितकाच प्रतिसादही दिला. या नाटकात अभिनय करणाऱ्या कलावंतांच्या भूमिकेला प्रेक्षकांनी दाद देत त्या कलावंतांना अक्षरशः डोक्यावर घेतलं. या वर्षी या नाटकाचे जवळपास सत्तरच्या वर प्रयोग शिवम् थिएटर्सने एका हंगामात संपूर्ण झाडीपट्टीत सादर केले.

## उत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार...



मुंबई: सत्यशोधक चित्रपटाचे दिग्दर्शक नीलेश जळमकर यांना अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचा उत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार आणि सन्मान देऊन मुंबई येथे गौरविण्यात आले.

## भारतीय ज्ञान पद्धतीतील समृद्ध ज्ञान विद्यार्थ्यांना द्यावे

### कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते : यवतमाळमध्ये आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. २१ :** भारतीय ज्ञान प्रणालीतील समृद्ध वारसा नवीन शिक्षण पद्धतीतून (एनईपी) विद्यार्थ्यांना द्यावा, असे आवाहन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले. ते शनिवारी (दि. १९) यवतमाळात 'भारतीय ज्ञान प्रणाली: क्षितिजाच्या पलिकडे' या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटक म्हणून बोलत होते. सीए प्रकाश चोपडा यांच्या अध्यक्षतेखाली परिषद झाली.

भारताच्या प्राचीन ज्ञान परंपरेतील विविध पैलूंचा वेध घेण्यासाठी यवतमाळ येथे या आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सरदार पटेल महाविद्यालय (मोहदा), लोकमान्य टिळक महाविद्यालय (वणी), गिलाणी महाविद्यालय (घाटंजी), महात्मा फुले महाविद्यालय (अमरावती), बापूजी अणे महाविद्यालय (यवतमाळ) व बाबाजी दाते महाविद्यालय (यवतमाळ) यांनी संयुक्तपणे ही परिषद आयोजित केली. उद्घाटन सत्रात कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले की, खगोलशास्त्र, आयुर्वेद, स्थापत्य, नाट्यशास्त्र, अभियांत्रिकी, अर्थशास्त्र आदी क्षेत्रांतील प्राचीन भारतीय ज्ञान ब्रिटिशांनी मिटवण्याचा प्रयत्न केला, तरी 'एनईपी'च्या माध्यमातून हे ज्ञान शिक्षकांनी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावे. अध्यक्षीय भाषणात सीए प्रकाश चोपडा यांनी जीवनातील तीन गुरू (आई, शिक्षक, अध्यात्मिक गुरू) आणि जैन धर्मातील अस्तेय, अपरिग्रह, अहिंसा या तत्त्वांचे महत्त्व सांगितले. बीजभाषक डॉ. सुरेंद्र गोळे यांनी मूल्याधिष्ठित जीवनासाठी भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती व विचार उपयुक्त असून, ते शिक्षकांनी रुजवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. व्यासपीठावर निवृत्त प्रा. कमल भोंडे, प्राचार्य डॉ. एम. ए. शहजाद, प्राचार्य डॉ. नितीन सिंघवी, प्राचार्य डॉ. प्रसाद खानझोडे, प्राचार्य डॉ. मीनल भोंडे व प्रा. डॉ. राधेश्याम चौधरी उपस्थित होते. प्रारंभी दीपप्रज्वलनानंतर सरस्वतीगान व नवकार मंत्र पठण (वर्षा तातेड) झाले. प्रास्ताविक डॉ. नितीन सिंघवी यांनी केले. यावेळी विविध विद्याशाखांतील २६२ शोधनिबंधांच्या 'रिसर्च नेब्युला' या संग्रहग्रंथाचे विमोचन करण्यात आले. बौद्धिक सत्रांमध्ये विद्यावाचस्पती डॉ. स्वानंद पुंड, डॉ. हरिओम पुन्यानी, डॉ. विवेक विश्वरुपे, डॉ. जयंत गुप्ता व पत्रकार संजय तिवारी यांनी भारतीय ज्ञान प्रणालीवर भाष्य केले. डॉ. कोटक यांनी सत्रांचे समन्वय केले. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन डॉ. अभिजित अणे यांनी केले. समारोप सत्रानंतर परिषदेची सांगता झाली.

## विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेवर काँग्रेसचा झेंडा

### शेतकरी संघटना–भाजप युतीला केवळ एक जागा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**कोरपना, दि. २१ :**१९५९ मध्ये स्थापन झालेल्या कोरपना विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या व्यवस्थापन समितीसाठी मतदान व मतमोजणी रविवारी पार पडली. यात १३ पैकी १२ जागांवर काँग्रेस, तर केवळ एका जागेवर शेतकरी संघटना भाजप युतीच्या उमेदवाराला समाधान मानावे लागले.

सर्वसाधारण खातेदार गटातून रमेश मुरलीधर धारणकर, विनोद लटारी कोल्हे, मारोती राघू रासेकर, निखिल धनंजय गिरटकर, दादाजी लक्ष्मण गोवरदिपे, संदीप रामदास पारखी, वामन नागोबा पिंगे, बापूराव लक्ष्मण जोगी, सुभाष बापूजी तुरणकर, महिला राखीव गटातून सुनंदा दिलीप मालेकर, संगीता चरणदास इटणकर, विमुक्त जाती-भटक्या जमाती विमाप्र गटातून रामचंद्र बापूजी इखारे, अनुसूचित जातिजमाती गटातून रामदास खुशालराव पंधरे विजयी झाले. यांतील रमेश मुरलीधर धारणकर यांची यापूर्वीच अविरोध निवड झाली. बापूराव लक्ष्मण जोगी व सद्दाम लियाकत अली यांना समसमान मते पडल्याने ईश्वर चिठ्ठीमध्ये बापूराव लक्ष्मण जोगी विजयी झाले. यात शेतकरी संघटना-भाजप युतीतील सुभाष बापूराव तुराणकर एकमेव उमेदवार विजयी झाले. निवडणूक अधिकारी म्हणून एम. पी. दोनाडकर यांनी काम पाहिले. निकालानंतरविजयी मिरवणूक काढण्यात आली. ही निवडणूक माजी आमदार व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुभाष धोटे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बँकेचे संचालक विजय बावणे यांच्या नेतृत्वात लढण्यात आली होती.

# लग्नसोहळ्यात होतेय अन्नाची नासाडी

## अन्न वाचवा जीवन वाचवा, अभियानाद्वारे अन्न बचतीचे राजरत्न संस्थेचे आवाहन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मालेगाव, दि. २१ :** लग्नसोहळ्यातील जेवणावळीचे स्वरुप बदलत चाललेले आहे. आता पंगतीची पारंपरिक पद्धत कमी झाली असून त्याची जागा बुफेने घेतली आहे. ही पद्धतही काही वाईट नाही मात्र यातून गैरसमजामुळे निर्माण होत असलेल्या प्रकारामुळे अन्नाची नासाडी होत आहे.

अन्न बचतीसाठी वाशिम जिल्ह्यातील लोकप्रिय राजरत्न अल्पसंख्यांक शिक्षण प्रसारक व बहु. संस्था वाशिम मागील १३ वर्षापासून कार्य करत असुन अन्न वाचवा जिवन वाचवा उपक्रमाव्दारे संस्था कायम अन्न बचतीचे आवाहन करत आहे. पोटाला लागेल तेव्हढेच अन्न ताटात घ्या, लग्न समारंभात धान्याची होणारी नासाडी थांबवा असे आवाहन संस्थेकडून करण्यात आले आहे. प्रगत समाजाची ओळख बनू पाहत असलेल्या या पद्धतीमुळे अन्न पूर्णब्रह्म चा विसर पडत आहे. कार्यक्रम आटोपल्यावर कार्यक्रम स्थळाच्या मागे वा जागा असेल तिथे अन्नाचे ढीग लावले जात असल्याचे चित्र दिसत आहे. हे अन्न फेकून याची विल्हेवाट लावली जाते. फेकलेले अन्न सडल्यामुळे त्यातून मिथेन या घातक वायूची निर्मिती होते.



ग्लोबल वार्मिंग तसेच वातावरणातील बदलास ही नासाडी एका प्रकारे कारणीभूत ठरत असल्याचे दिसून येते. अन्न हे पूर्णब्रह्म आहे, असे म्हणणाऱ्या भारत देशातच अनेकांना रात्री उपाशीपोटी झोपावे लागत आहे.एका विवाह सोहळ्यात किमान २०० व्यक्ती जेवतील एवढे अन्न वाया जाते. अशातही होणारी अन्नाची नासाडी ही त्याचा विपर्यास दर्शविणारी आहे. ताटातील उष्टे अन्न टाकून दिल्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होतो. अन्न उष्टे न टाकता योग्य वापर केल्यास अन्नपूर्णादेवीचा सन्मान होतो, हे समजणे गरजेचे आहे. एका जेवणात १ हजार २३९ कॅलरीज असतात, जी कुपोषित बालकांच्या दिवसभराच्या ऊर्जेची गरज भागवू शकतात. मात्र लग्नातील प्रत्येक ताटातील २० टक्के जेवण म्हणजे २४६ कॅलरीज अन्न फेकून दिल्या जात आहे.

अन्नाला देव म्हणविणाऱ्या भारतातच हा प्रकार सुरू असणे ही एक शोकांतीकाच ठरत आहे.एका लग्न प्रसंगात सरासरी एक ते दोन हजार लोक हजर असतात. बुफे पद्धतीमुळे रांग लावून ताट वाढून घेण्याचा त्रास वाचविण्यासाठी अनेक जण ताटात गरजेपेक्षा जास्त वाढून घेतात. लहान मुलांच्या ताटातही सर्व पदार्थ वाढून घेतले जातात. प्रत्यक्षात ताटातील बरेचसे अन्न वाया जाते.

> सर्व पदार्थांच्या अट्टाहासाने अन्नाची नासाडी लग्न समारंभ म्हणले की, त्यात जेवणावळी आल्याच. प्रतिष्ठेचा प्रश्न उपस्थित करीत अनेक पदार्थांची रेलचेल असते, हे सर्व पदार्थ प्रत्येक जण इच्छा नसतानासुद्धा स्वत:च्या ताटात घेतो समारंभात गर्दी असल्याने नागरिक पुन्हा रांगेत लागण्याच्या भानगडीत न पडता एकाच वेळी पूर्ण प्लेट भरून घेतात. बुफेमध्ये आवश्यकतेपेक्षा अधिक अन्न घेतले गेल्याने ते त्यांच्या खाण्यात जात नाही. पर्यायी ते अन्न प्लेटमध्ये तसेच टाकण्यात येते. येथूनच अन्नाची नासाडी सुरू होते. जर आवश्यकतेनुसार अन्न घेतले तर ते वाया जाणार नाही, याची काळजी सर्वसामान्य नागरिकांनी घेण्याचे आवाहन राजरत्न संस्थे कडुन करण्यात आले आहे.


हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271




अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५




# पाणी टंचाईचे सावट: पुन्हा येणार 'टँकर राज' ?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २१ : अकोला महापालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पात जेमतेम (२५ टक्के) जलसाठा शिल्लक राहिला आहे. एप्रिल महिन्यात कडाक्याचे उन्ह तापत असून, पुढील मे महिना आणखी यापेक्षा अधिक तापणारा आहे. त्यामुळे बाष्पीभवन होऊन जलसाठा झपाट्याने कमी होणार आहे. अशा परिस्थितीत शहरात पाणीबाणी येण्याची दाट शक्यता दिसू लागली आहे. त्यामुळे टँकर राज पुन्हा येणार का? यामधून महापालिकेच्या तिजोरीला गळती लागणार का?**

## शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलसाठ्यात घट



अकोला शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पात २४ दलघमीचे पाणी आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. मागील वर्षी पावसाळा पुरेसा झाल्याने काटेपूर्णा प्रकल्प १००% भरला होता. या प्रकल्पातून जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांना तसेच सिंचनासाठी पाण्याचे आरक्षण देण्यात आले असून, अकोला महापालिकेच्या पाणीपुरवठा योजनेसाठी २४ दशलक्ष घनमीटर पाणी आरक्षित करण्यात आले आहे. आता जेमतेम जलसाठा काटेपूर्णा प्रकल्पात शिल्लक आहे. एप्रिल महिन्यात जलसाठ्यात घट झाल्याने महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने पाणी देण्याचे नियोजन एक दिवसाने वाढविले आहे. शहराच्या हद्दवाढ भागात दहा दिवसातून एकदा पाणी पुरवठा केला जात असून, काही भागात आठवड्यातून एकदा पाणी पुरवठा होत असल्याचे चित्र आहे.

यावरून महापालिकेत ठाकरे शिवसेनेने पाणी पुरवठा विभागात खुर्च्यांची तोडफोड करून प्रशासनाचा निषेध व्यक्त केला होता. त्यापूर्वी शिंदे गट शिवसेनेच्यावतीने शहरातील दूषित पाणीपुरवठा व अवाजवी पाणिपट्टी देयकाच्या विरोधात आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर काँग्रेस पक्षाच्यावतीने उपायुक्त यांना निवेदन देण्यात आले होते. एप्रिल महिन्यात ही परिस्थिती असून, मे महिन्यात शहरवासीयांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार आहे. काटेपूर्णा प्रकल्पातील जलसाठा झपाट्याने कमी होत असून, अकोला शहरावर पाणी टंचाईचे संकट उंबरठ्यावर असल्याचे दिसून येत आहे. हद्दवाढ भागात पाणी विकत घेण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

पुढील दिवस आणखी कठीण असून, पावसाळा लांबल्यास पाणीबाणी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुन्हा टँकर राज येणार असल्याचे दिसू लागले आहे. या टँकर राजमधून कुणाचे भले होते, याचा अनुभव यापूर्वी अकोलेकरांनी घेतला असून, ती वेळ पुन्हा येऊ नये, असे नियोजन महापालिकेने करावे, अशी मागणी होत आहे.

टँकरने पाणीपुरवठा करण्याच्या नावावर महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी महापालिकेची तिजोरी कशी रिकामी करतात अन् किती खोटी बिले काढतात, याचा अंदाज येऊ लागला आहे. त्यामुळे पुन्हा टँकर राज नको, अशी मागणी केली जात आहे. काही माजी नगरसेवकांनी पाणीपुरवठा करण्याच्या नावावर चमकोगिरी सुरू केली आहे. टँकरवर आपले छायाचित्र लावून समाजसेवेचा आव आणणे सुरू केले आहे. हे चित्र शहराच्या हद्दवाढ भागात दिसू लागले आहे.

# बाजार वसुलीसाठी महापालिका काढणार टेंडर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

## दैनंदिन बाजार वसुली केवळ ३० हजार रुपये





**अकोला, दि. २१ :** अकोला शहरात महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणानुसार ४०३६ हॉकर्स असून २०२२ मध्ये एनयुएलएमने सर्वेक्षण करून नोंदणीकृत हॉकर्सचा अहवाल बाजार परवाना विभागाकडे सोपविला आहे. ही नोंद अधिकृत असली तरी गेल्या तीन वर्षात नोंद नसलेल्या हॉकर्सची संख्या वाढली असून, दैनंदिन बाजार वसुलीच्या नावावर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून दररोज केवळ ३० ते ३५ हजार रुपयांची वसुली केली जात आहे. ही अतिशय तोकडी असलेली वसुली पाहता महापालिका दैनंदिन बाजार वसुलीसाठी निविदा काढणार आहे.

सन २०२२ मध्ये महापालिका क्षेत्रात एनयुएलएमने केलेल्या सर्वेक्षणानुसार ४ हजार ३६ हॉकर्स असल्याची नोंद करण्यात आली आहे. या नोंदीचा अहवाल महापालिकेच्या बाजार परवाना विभागाला सादर करण्यात आला आहे. या सर्वेक्षणाला तीन वर्ष पूर्ण झाली असून, दर चार वर्षानंतर हॉकर्सचे सर्वेक्षण करून नोंद करण्यात येत असते. आता ही संख्या दुपटीने वाढली आहे. शहरात मुख्य बाजारासह ठिकठिकाणी व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांची जिओ टॅगिंग करून त्यांना ओळखपत्र देण्यात आले होते. महापालिकेच्या बाजार-परवाना विभागाकडून नोंदणीकृत व्यावसायिकांसह नोंद नसलेल्या पथाविक्रेत्यांकडून दैनंदिन बाजार शुल्क घेतले जाते. या कामासाठी महापालिकेचे ८ कर्मचारी कार्यरत असून, दैनंदिन बाजार वसुलीच्या नावावर केवळ ३० ते ३५ हजार रुपये जमा केले जात आहे. ही वसुली अतिशय तोकडी असून, नोंदणीकृत व्यावसायिकांच्या संख्येनुसार ५० ते ६० हजारांची दैनंदिन बाजार वसुली होणे अपेक्षित आहे. तसेच नोंदणीकृत नसलेल्या व्यावसायिकांची संख्या पाहता ही वसुली ७० ते ८० हजार रुपये इतकी व्हायला पाहिजे; मात्र केवळ ३० हजार रुपयांची बाजार वसुली केली जात आहे. यामधून प्रशासनाला नुकसान होत असून, मनपा दैनंदिन बाजार वसुलीचे टेंडर काढणार असल्याची माहिती आहे.

# नराधम चुलत मामास १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा

## अल्पवयीन पीडितेवर बलात्कार केल्याप्रकरणी न्यायालयाचा दणका

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २१ :**स्वतःच्या अल्पवयीन भाचीवर बलात्कार करून तिला गर्भवती करणाऱ्या नराधम चुलत मामावर अकोल्याच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने कठोर शिक्षा ठोठावली आहे. न्यायमूर्ती शिवाजी कचरे यांनी आरोपीला भादंवि कलम ३७६ (२)(फ) अंतर्गत दोषी ठरवत १० वर्षे सश्रम कारावास व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त सश्रम कारावास ठोठावण्यात आला आहे.

पीडिता ही तिच्या आई-वडिलांतील कौटुंबिक वादामुळे आई, आजी, आजोबा आणि चुलत मामासोबत वेगळ्या गावी राहत होती. या काळात तिच्या चुलत मामाने तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला. पीडितेला धमकी देण्यात आली की, जर ती कुणाला काही सांगितले तर आरोपी विहिरीत उडी मारून आत्महत्या करेल आणि तिच्या कुटुंबावर खोटे आरोप करेल. या भीतीने पीडितेने काही काळ ही गोष्ट लपवून ठेवली.

नंतर पीडितेला गर्भवती असल्याचे निदर्शनास आले. डॉक्टरांकडून ही माहिती मिळाल्यावर, पीडितेने आपल्यावर झालेला अत्याचार आईला सांगितला. त्यानंतर चान्नी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल झाली. तपासात पीडितेने एका मुलीला जन्म दिला आणि तिच्या व नवजात मुलीच्या डीएनए नमुन्यांमधून आरोपीच नवजात मुलीचा जैविक पिता असल्याचे स्पष्ट झाले.

न्यायालयाने सर्व पुरावे, साक्षी आणि न्यायवैद्यकीय अहवाल ग्राह्य धरून आरोपीस दोषी ठरवले. या निकालामुळे अशा प्रकारच्या अत्याचार करणाऱ्यांना कडक शिक्षा देऊन न्यायालयाने स्पष्ट संदेश दिला आहे की, बाल लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना पाठीशी घातले जाणार नाही.

### सरकार पक्षाचा युक्तिवाद:

सदर प्रकरणात एकूण १० साक्षीदार तपासण्यात आले. अतिरिक्त सरकारी वकील ॲड. श्याम खोटरे यांनी सरकार पक्षातर्फे युक्तिवाद केला. तसेच पैरवी अधिकारी पातोंड व उकंडा जाधव यांनी महत्त्वाचे सहकार्य केले.

# जिल्ह्यात ९५ विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

## सिंचन सुविधेत होणार वाढ



**अकोला, दि. २१ : जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत जिल्ह्यात ९५ नवीन विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.**

जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांच्या मार्गदर्शनात जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांच्या नेतृत्वात कृषी विभागाची संपूर्ण टीम कामाला लागली आहे. या योजनेंतर्गत नवीन विहीर, जुनी विहिरी दुरुस्ती, सूक्ष्म सिंचन संच, ठिबक सिंचन, पंप संच, वीज जोडणी आकार, शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण, तुषार सिंचन संच, सोलर पंप, पीव्हीसी, एचडीपीई पाइप, यंत्रसामग्री, परसबाग या योजना राबविण्यात येणार आहेत. या योजनेंतर्गत नवीन विहिरींचे ४३६ प्राप्त अर्जांपैकी २५४ लाभार्थी शेतकरी पात्र ठरले आहेत. या लाभार्थ्यांच्या अर्जांची पडताळणी करण्यात आली असून, पहिल्या टप्प्यात ९५ विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. नवीन विहिरींसाठी प्रती लाभार्थी ४ लाख अनुदान मिळणार आहे.

### कार्यारंभ देणे सुरू - डॉ. तुषार जाधव

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांनी ९५ विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यानंतर तालुका कृषी अधिकाऱ्यांकडून लाभार्थी शेतकऱ्यांना कार्यारंभ आदेश देणे सुरु असल्याचे जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी सांगितले. उर्वरित लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची छाननी सुरु असून, लवकरच १०० ते ११० विहिरींना मान्यता देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### तालुकानिहाय विहिरी

या योजनेंतर्गत अकोला १३, बाळापूर २९, बार्शीटाकळी २६, मूर्तिजापूर १०, पातूर १७ अशा ९५ नवीन विहिरींच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे.

# आमदाराच्या कार्यकर्त्याला शिवीगाळ प्रकरण: बार्शीटाकळी पोलीस निरीक्षकाची तत्काळ बदली

## प्राथमिक चौकशीचे आदेश; कार्यभार एपीआय दीपक वारे यांच्याकडे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २१ :**मूर्तिजापूर विधानसभा क्षेत्राचे आमदार हरीश पिंपळे यांच्या कार्यकर्त्याला शिवीगाळ केल्याच्या प्रकरणामुळे बार्शीटाकळी पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रकाश तुनकलवार यांची बदली करण्यात आली आहे. या घटनेने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, यासंबंधीची बातमी आज सकाळपासूनच विविध माध्यमांतून प्रसारित झाली होती.

सदर प्रकरणाची गंभीर दखल घेत अकोला पोलीस अधीक्षक कार्यालयाने निरीक्षक तुनकलवार यांची तत्काळ पोलीस नियंत्रण कक्ष, अकोला येथे बदली केली आहे. तसेच या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्याचे आदेश अकोट उपविभागाचे सहायक पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांना देण्यात आले आहेत.

दरम्यान, बार्शीटाकळी पोलीस स्टेशनचा तात्पुरता कार्यभार दीपक वारे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

या प्रकारामुळे प्रशासनात हालचालींना गती मिळाली असून, पुढील तपास अहवालानंतर अधिक कारवाई होण्याची शक्यता आहे.

### थेट मुख्यमंत्र्याकडे तक्रार

उपलब्ध प्रकरणात भाजप कार्यकर्ता व आमदाराला बार्शीटाकीचे ठाणेदार यांनी भ्रमणध्वनीवरून खूप खालच्या शब्दात शिवीगाळ केली. या संदर्भात आमदार हरीश पिंपळे यांनी थेट मुख्यमंत्र्याकडे तक्रार केली. लोकप्रतिनिधीसोबत पोलीस अधिकारी असे वागत असतील तर त्यांची काय इज्जत राहील, असा प्रश्न त्यांनी यावेळी केला. त्यामुळे तातडीने चक्रे फिरले आणि संबंधित पोलीस अधिकाऱ्याची पोलीस मुख्यालयात तडकाफडकी बदली करण्यात आली आहे.

# जातीवाचक शिवीगाळ व खंडणी प्रकरणात अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २१ :**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्याला जातीवाचक शिवीगाळ करत ५ लाख रुपयांची खंडणी मागितल्याच्या गंभीर आरोपाखाली दाखल गुन्ह्यातील आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज अकोट येथील सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. अकोट शहर पोलीस स्टेशनच्या गुन्हा क्रमांक १०८/२०२५ नुसार, आरोपी गोपाल ऊर्फ आशिष रामरावजी दातकर (५०), रा. हिंगणी, जि. अकोला याने फिर्यादी राजेंद्र इंगळे (उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अकोट) यांच्याकडून त्यांच्या सर्कलमध्ये होणाऱ्या ५० लाख रुपयांच्या कामाच्या बदल्यात ५ लाख रुपयांची मागणी केली होती. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर, आरोपीने त्यांना जातीवाचक शिवीगाळ करत धमकी दिली की, जोपर्यंत रक्कम देत नाहीत तोपर्यंत सर्कलमध्ये कोणतेही काम होऊ दिले जाणार नाही.

या प्रकरणी अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत कलम ३(१)(एम), ३(१)(आर), ३(१)(एस), ३(२)(व्हीए) तसेच भारतीय दंड संहितेच्या विविध गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला आहे.सरकारी वकील ॲड. अजित देशमुख यांनी न्यायालयात जोरदार युक्तीवाद सादर करत सांगितले की, फिर्यादी व आरोपी यांच्यातील संभाषणाचे रेकॉर्डिंग एका पेनड्राईव्हमध्ये साठवलेले असून, आरोपीच्या आवाजाचे नमुने घेणे अत्यावश्यक आहे. तसेच आरोपीची पोलीस कोठडीत चौकशी होणे गरजेचे असून, तो साक्षीदारांवर दबाव आणू शकतो. आरोपीवर यापूर्वीदेखील विविध गंभीर गुन्ह्यांची नोंद असून, न्यायालयाने याची दखल घेतली आहे. सरकार पक्षातर्फे ॲड. दिलदार खान व ॲड. दीपक कुटे यांनीही सहाय्य केले. आरोपीतर्फे ॲड. मोतीसिंग मोहता यांनी बाजू मांडली; परंतु सर्व युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर, अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी.एम. पाटील यांनी आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला. तसेच १५ दिवसांच्या अंतरिम संरक्षणाचा अर्जही नामंजूर करण्यात आला.

या निर्णयामुळे सरकारी अधिकाऱ्यांवरील दबावाचे प्रकार रोखण्यासाठी न्यायालयाने कठोर पाऊल उचलल्याचे स्पष्ट झाले आहे. गुन्ह्याच्या तपासामध्ये अजूनही काही साक्षीदारांचे जबाब नोंदवणे बाकी असून, पोलीस तपास अधिकारी अनमोल मित्तल यांच्या देखरेखीखाली तपास सुरू आहे.

# जिल्ह्यात पर्यावरण रक्षणासाठी ठोस उपक्रमांची गरज

। शरद शेगोकार ।

## आज 'जागतिक वसुंधरा दिवस'



**अकोला, दि. २१:** २२ एप्रिल हा दिवस 'जागतिक वसुंधरा दिवस' म्हणून जगभरात साजरा केला जातो. पर्यावरण संवर्धन आणि जनजागृतीचा संकल्प करत अनेक ठिकाणी विविध उपक्रम राबविले जातात. वाढते तापमान, जंगलतोड, जलप्रदूषण आणि हवामान बदल या जागतिक समस्यांचा प्रत्यक्ष परिणाम अकोला जिल्ह्यावरही होत आहे. त्यामुळे जिल्ह्यात पर्यावरण रक्षणासाठी अधिक ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

अकोला जिल्हा शेतीप्रधान असून, येथील अर्थव्यवस्था प्रामुख्याने कपाशी, सोयाबीन आणि तुरीच्या उत्पादनावर आधारित आहे; मात्र गेल्या काही वर्षांत हवामानातील अस्थिरतेमुळे अतिवृष्टी, दुष्काळ आणि अनियमित पावसाळा यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. हवामान बदल यामागचे एक मोठे कारण असल्याने पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज बनली आहे. शहरात प्लास्टिकचा अतिवापर, वाहनांची वाढती संख्या, वृक्षतोड आणि औद्योगिक प्रदूषण यामुळे अकोला शहरातील हवामानात लक्षणीय बदल झाले आहेत. उन्हाळ्यात तापमान ४४ ते ४५ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचत असून, नागरिकांच्या आरोग्यावरही याचा विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे शहरात हरितपट्टा वाढविणे, सौरऊर्जेचा जास्तीत जास्त वापर करणे, जलसंवर्धनाचे उपाय राबवणे आणि प्लास्टिकविरहित मोहीम प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. आपली पृथ्वी आपली जबाबदारी या संकल्पनेवर आधारित पावले उचलल्यास अकोला जिल्हा पर्यावरणपूरक बनवता येऊ शकतो. भविष्यातील पिढ्यांसाठी निसर्गाचा समतोल राखणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. २२ एप्रिलच्या निमित्ताने हे भान ठेवून कृतीशील होणे हाच या दिवसाचा खरा अर्थ ठरेल.

### पृथ्वी दिनानिमित्त जनजागृतीची आवश्यकता

या दिवशी शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि पर्यावरणप्रेमींनी वृक्षारोपण, रॅली, निबंध स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन आदी उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये पर्यावरणविषयक संवेदनशीलता निर्माण करावी. युवकांनी पुढाकार घेतल्यास पर्यावरण विषयक सकारात्मक बदल घडवता येतील. शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांनीदेखील सक्रिय सहभाग घेणे गरजेचे आहे.

केंद्र शासनाच्या अमृत योजना आणि राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमाच्या माध्यमातून अकोला महापालिकेने शहराच्या पर्यावरण रक्षणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी केली आहे. शुद्ध जलपुरवठा, मलजल शुद्धीकरण प्रकल्प, हरितपट्टा वाढवणे, सिग्नल यंत्रणा सुधारणा, इलेक्ट्रिक वाहनांची खरेदी, कचरा घंटागाड्या तसेच मोर्णा नदी स्वच्छतेसाठी विशेष उपक्रम राबवले जात आहेत. याशिवाय, प्लास्टिक व पॉलिथिनविरोधातही कठोर कारवाई करण्यात येत आहे. या सर्व उपाययोजनांमुळे अकोला शहराचा पर्यावरणीय दर्जा सुधारत आहे,

**- अनिल बिडवे,**
पर्यावरण विभाग प्रमुख मनपा.

अजिंक्य भारत
आपलं बुलडाणा

बुलडाणा, मंगळवार दि.२२ एप्रिल २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### भरधाव टिप्परने घेतला दुचाकीस्वाराचा बळी

**खामगाव :** टिप्पर आणि मोटारसायकलची समोरा समोर धडक होऊन झालेल्या अपघातात मोटारसायकल स्वार प्रदीप रामभाऊ खिल्लारे (६५) हे जागेवर ठारा झाल्याची घटना १९ एप्रिलच्या सायंकाळी ७ वाजता दरम्यान मेहकरपासून जवळच असलेल्या परतापूर नजीक घडली. मेहकर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या परतापूर येथील प्रदीप रामभाऊ खिल्लारे हे १९ एप्रिलच्या संध्याकाळी ७वाजता दरम्यान मोटारसायकलने परतापूर गावाकडे जात असतांना समोरून येणाऱ्या एमएच-२८-सीबी-५९७९ टिप्परने त्याांच्या मोटारसायकलना जोरदार धडक मारली. या घडकेत ते गंभीर जखमी होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने जागेवरचा गतप्राण झाले.

### भावसार देवी मंदिर शताब्दी महोत्सवाची महाप्रसादाने सांगता

**नांदुरा :** भावसार देवी मंदिर शताब्दी महोत्सवाचा पाच दिवसीय कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या पाच दिवसीय कार्यक्रमाची सांगता शनिवार तारीख १९ रोजी भव्य दिव्य महाप्रसादाने झाली. महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांनी घेतला. या शताब्दी महोत्सवाला तारीख १५ पासून प्रारंभ झाला होता. शताब्दी सोहळ्याच्या आयोजन भावसार समाजाच्या वतीने करण्यात आले होते. पाच दिवसीय कार्यक्रमांमध्ये पुण्याहवाचन, मातृका पूजन, १०८ जोडप्यांचा नवचंडी यज्ञ, तसेच सायंकाळी भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. मूर्ती प्राणप्रतिष्ठा मंदिराचे कलशारोहन व पूर्ण होवतीचा कार्यक्रम सुद्धा यावेळी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रम ाला भावसार समाज बांधवांसह नांदूर खुर्द खुरासरातील नागरिक कसे दोन्ही गावांमधील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी महाप्रसादाला नऊ हजार भावी भक्तांनी घेतला.

### महसूल कोतवाल संघटनेकडून सत्कार समारंभाचे आयोजन




**मेहकर** - महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य भारतीय जनता पार्टी चेतन चव्हाण यांचा बुलढाणा जिल्हा दौऱ्या दरम्यान म हाराष्ट्र महसूल कोतवाल संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी मुळे सचिव विशाल भाऊ बंडूभाऊ आणि संघटनेचे इतर पदाधिकारी यांच्याकडून मेहकर येथे हॉटेल मँगो रेसिडेन्सी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चेतन चव्हाण यांनी म हसूल कोतवाल संघटनेला आश्वासित केले भारतीय जनता पार्टी ठामपणे कर्मचाऱ्याशी पाठीशी आहे आणि जनहिताचे कार्यक्रम भारतीय जनता पार्टीने हाती घेतले आहे. त्यामुळे लोकांचे काम प्राधान्य करावे आणि सरकार तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे अशी आश्वासन देखील यादे यावेळी चेतन चव्हाण यांनी दिले.

# शिक्षकांचे प्रश्न व समस्या सोडवा

## राज्य शिक्षक संघाची शिक्षणाधिकारी तसेच अधीक्षक वेतन पथक बुलडाणा यांच्याकडे मागणी

**अजिंक्य भारत / प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.२१**



राज्य शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष मा. दिलीप कडू यांनी बुलडाणा जिल्हा संपर्क दौऱ्यादरम्यान शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अनिल अकाळ व वेतन पथक अधिक्षक श्री नेवालकर यांच्या सोबत दिनांक १५ एप्रील रोजी सविस्तर चर्चा करून शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याची मागणी केली.

जिल्ह्यातील विनाअनुदानित शिक्षकांच्या समस्या, अंशतः अनुदानित हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतनासंदर्भात या विषयावर सविस्तर चर्चा करून तसेच शिक्षक बांधवांची वैद्यकीय देयके, वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी संदर्भात प्रश्न, वैयक्तिक मान्यता, सेवासातत्य, अतिरिक्त शिक्षकांचे प्रश्न, संचमान्यता दुरूस्ती संदर्भात असलेल्या अडचणी संदर्भात चर्चा करून ,२००५ पुर्वी व नंतर च्या शिक्षकांचे जिपीएफ व एनपीएस संदर्भातील प्रश्न, सातव्या वेतन आयोगाचे थकित हफ्ते संदर्भातील प्रश्न, ज्या शिक्षकांचे एनपीएस व जिपीएफ खाते नसतील त्यांच्या सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम त्यांच्या खात्यात जमा करण्या संदर्भात चर्चा करून २००५ पुर्वीच्या शिक्षकांच्या जुन्या पेन्शन संदर्भातील प्रलंबित असलेल्या प्रश्नासंदर्भात शिक्षणाधिकारी यांचेसोबत चर्चा केली. थकित देयकांसदर्भात ज्यांना डायरेक्टर कार्यालयाची मान्यता मिळाली, परंतु ३१ मार्च पर्यंत बिल करू शकले नाही, अशी देयके आहेत. त्यावर चर्चा करून फेज २ मध्ये जुलै महिन्या पर्यंत बाकी देयके आहे. त्या मान्यतेवरच काढावेत , तसेच आपले इतर प्रश्न व समस्या सोडवण्याकरिता चर्चा करून मार्च २०२५ चे वेतन वेळेवर केल्याबद्दल शिक्षणाधिकारी व अधिक्षक यांचे अभिनंदन केले. यावेळ राज्य शिक्षक संघाचे अमरावती जिल्हा अध्यक्ष, अनिल भारसाकळे, अरावती जिल्हा सचिव श्रीकांत लाजूरकर, बुलडाणा जिल्हा अध्यक्ष प्रविण टेंभरे, बुलडाणा जिल्हा सचिव सिद्धेश्वर सोळंकी जिल्हा कार्यकारीनी सदस्य प्रमोद ठोकरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मुलीसमोरच केला पित्याचा खून

**अजिंक्य भारत / प्रतिनिधी**
**खामगाव दि.२१**

एकीकडे समाजात कायदा आणि सुव्यवस्थेच्या गप्पा सुरू असताना दुसरीकडे तालुक्यातील पळशी खुर्द शिवारात घडलेल्या हृदयदावक आणि क्रूर घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. एका निष्पाप पित्याची त्याच्या मुलीसमोर निघृण हत्या झाल्याच्या घटना मुलीच्या काळजाच्या ठोका वाढविणारी ठरली आहे.

या घटनेबाबत प्राप्त माहिती अशी की तालुक्यातील लासुरा जहागीर येथील ईश्वर बाबाराव तायडे (३९) हे मोटरसायकल क्रमांक एमएच २८ एसएफ ७२९ ने १९ एप्रिल रोजी रात्री वडिलांचा जेवणाचा डबा शेतात पोहोचून ते व त्यांची मुलगी जानवी हे दोघेजण आपल्या मोटरसायकलने घरी परत जात असताना मार्गातील पळशी खुर्द शिवारातील शिवाजी अंभोरे यांच्या शेताजवळ रात्री ८.३० वाजताच्या सुमारास भारत झामू यादव रा. लासुरा जहागीर याने अडविले व जुन्या वादाचे कारणावरून ईश्वरवर चाकूने सपासप वार केले. एवढ्यावरच त्याचा राग शांत झाला नाही तर त्याने काठीने मारहाण केली. हा सर्व प्रकार मृतक ईश्वरची मुलगी जानवी देखत झाला. या घटनेनंतर ईश्वर तायडे रक्ताच्या थारोळ्यात पडला होता आणि काही वेळाने त्याने प्राण सोडले. या घटनेची माहिती नागरिकांना मिळताच त्यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली आणि खामगाव ग्रामीण पोलिसांना याबाबतची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून घटनास्थळाची पाहणी केली आणि आरोपीचा शोध घेण्याचा प्रयत केला परंतु आरोपी त्यांच्या हाती लागला नाही. याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी बाबाराव भिकाजी तायडे यांच्या तक्रारीवरून आरोपी भारत यादव (४५) रा.लासुरा जहागीर ता. खामगाव यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# जिजाऊ रथ यात्रेचे कुमार सानंदा यांच्यातर्फे जल्लोषात स्वागत !

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.२१**



मराठा सेवा संघ द्वारा संचालित राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज , शाहू , फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जोपासून समता, समानता आणि बंधुतेचा प्रेरणादायी संदेश देणाऱ्या '' जिजाऊ रथ यात्रेचे रविवार दिनांक २० एप्रिल २०२५ रोजी दुपारच्या सुमारास खामगाव शहरात आगमन झाले. शहरातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करीत ही जिजाऊ रथयात्रा महावीर चौक भागात पोहोचली असता याठिकाणी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्यावतीने फटाक्यांची भव्य आतिषबाजी करून रथयात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी राजमाता जिजाऊ यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी श्रीमती सरस्वतीताई खासणे, मनोज वानखडे , संतोषदादा देशमुख , किशोरआप्पा भोसले, सौ. सुरजीतकौर सलुजा, बबलू पठाण, राणा राम सुरडकर, जीवन जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती. जिजाऊ रथ यात्रेचे माध्यमातून महाराष्ट्रातील विविध भागात ४५ दिवसांचा प्रवास करून राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतींना उजाळा देण्याचे व मराठा समाजाला जोडण्याचे उल्लेखनीय कार्य या रथयात्र्याच्या माध्यमातून होत आहे, असे सांगून म ाजी आमदार राणा दिलीकुमार सानंदा यांनी रथयात्रेला शुभेच्छा दिल्या.

# डॉ.गणेश गायकवाड 'रफीक-ए-सुखन' पुरस्काराने सन्मानित

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**सिंदखेड राजा दि.२१**



येथील सुप्रसिध्द शल्य चिकित्सक,शायर गझलकार डॉ. गणश गायकवाड यांना अकोला येथे झालेल्या शानदार गझल मुशायरा कार्यक्रमात प्रतिष्ठेचा समजल्या जाणाऱ्या''रफीक-ए-सुखन'' पुरस्काराने सुप्रसिध्द शायर, उस्ताद-ए-मोहतरम डॉ. महेबूब राही यांच्या हस्ते दि.१७ एप्रिल रोजी सन्मानित करण्यात आले.

डॉ. गणश गायकवाड यांची सादरीकरणाची शैली, शेर आणि भावना व्यक्त करण्याचा अंदाज प्रसिद्ध झाला आहे. शायरी व शेरांनी गझल रसिकांच्या मनात वेगळेच स्थान त्यांनी मिळविले आहे. ''इक रस्में अहतराम से आगे नहीं गये वो भी दुआ सलाम से आगे नहीं गये।।'' ''जो इश्क के मरीज थे जन्नत मिली उन्हें हम सर्दी औ ज़ुकाम से आगे नहीं गये।।'' असे दर्जेदार लिखाण त्यांनी केले आहे. याप्रसंगी बोलतांना डॉ. गायकवाड म्हणाले की उर्दू साहित्या सेवेसाठी अकोला येथील बज़्म-ए-अदब ओ सफाकत या साहित्या संस्थेतर्फे ''रफिक-ए-सुखन'' (कविमित्र) या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या संस्थेचे संस्थापक, कतरमध्ये वास्तव करणारे आणि उर्दू साहित्याचे कतरमधील प्रवर्तक, मौलाना रफिक शाद यांच्यावतीने माझा गौरव करण्यात आला.विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे, हा सन्मान मला माझे गुरू आणि जागतिक कीर्तीचे कवी, समालोचक, उर्दू साहित्या अकादमीतर्फे सन्मानित डॉ. महेबूब राही साहेब यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

या बद्दल त्यांनी धन्यवाद देत आयोजकांचे आभार मानले.पुरस्कार सोहळ्या नंतर अकोला शहरातील प्रसिद्ध शायर, गझलका रफसीउल्लाह नकीब, निवृत्त सेशन न्यायाधीश आणि नामवंत कवी मंजूर नदीम साहेब, रफिक शाद साहेब, तारीक फैज़, सलीम चौहान, अनिस शौक, साजिद महशर, नाजिम अल्तमस शम्स, ज़मीर अहमद ज़मीर आणि अकोला व परिसरातील प्रतिष्ठित कवी आणि श्रोते उपस्थित होते.

# कोलते महाविद्यालयात संकाय विकास कार्यक्रम संपन्न

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मलकापूर , दि २१**




पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी म हाविद्यालय, मलकापूर येथे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) प्रायोजित युनिव्हर्सल ह्यूमन व्हॅल्यूज-(युएचव्ही-) वर आधारित तीन दिवसीय संकाय विकास कार्यक्रम १८ ते २० एप्रिल २०२५ दरम्यान यशस्वीरीत्या संपन्न झाला.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश प्राध्यापकांमध्ये नैतिकता, मूल्याधारित शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे हा होता. या उपक्रमाने प्राध्यापकांना विद्यार्थ्यांना मूल्यनिष्ठ शिक्षण देण्यासाठी आणि त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी सक्षम बनवले. हा कार्यक्रम प्रा. पी. बी. भिसे आणि प्रा. एस. आर. मुंडाले यांनी काळजीपूर्वक आणि नियोजनबद्ध पद्धतीने आयोजित केला होता. प्राचार्य डॉ. अनिल खर्चे आणि प्रशासकीय डीन डॉ. वाय. ए. खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. आयक्यूएसी समन्वयक प्रा. आर. एम. चौधरी यांनी तांत्रिक आणि प्रशासकीय बाजू सांभाळून कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीत मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे खजिनदार सुधीरभाऊ पाचपांडे उपस्थित होते.। कार्यक्रमामुळे प्राध्यापकांना मूल्याधारित शिक्षणाची नवीन दृष्टी प्राप्त झाली असून, त्यााचा उपयोग ते विद्यार्थ्यांना अधिक संवेदनशील, जबाबदार आणि नैतिक व्यक्ती बनवण्यासाठी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# महिलांसाठी व मुलांसाठी मोफत समर कॅम्पचे आयोजन

## वीरपुत्र महाराणा प्रतापसिंह पब्लिक स्कुल आणि मानिनी ग्रुप द्वारा आयोजन

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.२१**



एप्रिल रोजी वीरपुत्र महाराणा प्रतापसिंह पुब्लिक स्कुल आणि मानिनी ग्रुपच्या संयुक्त विद्यामानाने महिलांसाठी व मुलांसाठी समर कैम्पचे मोफत आयोजन करण्यात आले असून २० एप्रिल ते ३० एप्रिल पर्यंत घेण्यात येना-या या ग्रीष्म कालीन शिबिरामध्ये महिलांसाठी वैविध्यपूर्ण कला, आरोग्य विषययक माहिती, ब्यूटी पार्लर, मेहेंदी क्लास, शिवन काम, योगा तर मुलांसाठी मेडिटेशन, हस्ताक्षर सुधारने, पर्सनलीटी डेव्हलपमेंट, इंग्लिश स्पीकिंग, डांस,विविध प्रकारचे खेळ, आर्ट व चित्रकला असे अजुन काही कलात्मक गोष्टी शिकविल्या जाणार आहेत.

समर केम्प महिला व मूलांकरीता मोफत घेण्यात येत असून महिला व मूलामधील सुप्त गुणाना वाव मिळावा या साठी वीरपुत्र महाराणा प्रतापसिंह पुब्लिक स्कुल आणि मानिनी ग्रुप द्वारा विनामुल्य वीरपुत्र महाराणा प्रतापसिंह पुब्लिक स्कुल पिंपरी गवळी फाटा येथे घेण्यात येत आहे. हे शिबिर २० एप्रिल ते ३० एप्रिल पर्यन्त सुरु असून जे महिला व मुले प्रवेश घेऊ इच्छित असतील त्यांनी प्रवेश निश्चित करून घ्यावा. अधिक माहितीसाठी ७८२२८८५५६५, ९१४६२०१९५९ संपर्क साधावा.

# बीजेएस व डीआरएचएस यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मार्गदर्शन

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**देऊळगावराजा दि.२१**



भारतीय जैन संघटना(बिजेएस) व देऊळगाव हायस्कूल देऊळगाव राजा(डिआरएचएस) यांचे संयुक्त विद्यमाने इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना भविष्यात शिक्षणाच्या कोणकोणत्या सुविधा उपलब्ध आहे. यासाठी शैक्षणिक सुविधा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन दि.१९ एप्रिल २०२५ रोजी देऊळगाव राजा हायस्कूलच्या प्रांगणामध्ये करण्यात आले होते.

यावेळी संभाजीनगर येथील सावन चुडीवाल यांनी सांगितले की, या भारत देशात डोंगरापेक्षाही अफाट अशा वेगवेगळ्या शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध आहे विद्यार्थ्याने आपल्याला नेमकं कोणतं क्षेत्र निवडायचा आहे. याचा सखोल अभ्यास करूनच या आयुष्याच्या टर्निंग पॉईंट वर निर्णय घ्यावयास हवा केवळ अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधे व्यतिरिक्त खूप काही सुविधा उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळीचे सचिव सुबोधभाऊ मिश्रीकोटकर, संचालक सुमेर सावजी डोणगावकर, संस्थेचे प्राचार्य रंगनाथ कोल्हे, पर्यवेक्षक जाधव, प्रा. गजानन गाडेकर, चे राज्य कार्यकारणी सदस्य सन्मती जैन, चॅप्टर अध्यक्ष पियुष खडकपूरकर, नंदन दर्यापूरकर, सतेज डोणगावकर, उपस्थित होते. या मार्गदर्शन शिबिरात जवळपास एक हजार विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी सहभाग नोंदविला अधिक मार्गदर्शन करताना सावन चुडीवाल पुढे म्हणाले की या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर प्रत्येक विद्यार्थ्याला टार्गेट ठरवून क्षेत्र निवडावे लागणार आहे. उपलब्ध असलेल्या प्रत्येक क्षेत्रात विद्यार्थी हा त्याच्या गुणवत्तेनुसार चमकू शकतो कला, विज्ञान व वाणिज्य यामध्ये काय काय उपलब्ध आहे विज्ञान मध्ये सुद्धा खूप काही शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत. केवळ अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शिक्षणच का असा प्रश्न त्यांनी करून मधून पायलट व्हा मुलींनी नर्सिंगकडे वळा वाणिज्य मध्ये आता नव्याने अकाउंटिंगच्या व्यतिरिक्त खूप काही उपलब्ध आहे. सोबतच गेल्या वर्षापासून दहावीनंतर डिप्लोमा साठी आता खास करून विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी आर्किटेक्चरची सुविधा उपलब्ध झाली आहे. कला शाखेतून पत्रकारिता करिता मास्क कम्युनिकेशनची सुद्धा सुविधा उपलब्ध आहे. योग्य वेळी योग्य व्यासपीठ मिळाल्यास विद्यार्थी आपले करिअर चांगल्या प्रकारे घडवू शकतो असे त्यांनी सांगितले कार्यक्रमाचे संचलन प्रा. गजानन गाडेकर तर आभारचे सन्मती जैन यांनी मानले.

# कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण

## स्थानिक तक्रार समितीतील अध्यक्ष, सदस्य पदासाठी अर्ज आमंत्रित

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.२१**



कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियमानुसार, जिल्हा स्तरावर ''स्थानिक तक्रार समिती'' स्थापन करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हास्तरावरील स्थानिक तक्रार समितीमधील अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती करण्यासाठी इच्छुक पात्र व्यक्तीकडून दि. २९ एप्रिल २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तथा स्थानिक तक्रार समितीचे सदस्य सचिव यांनी दिली.

**अध्यक्ष पदाकरीता पात्रता :** अर्जदार किमान पदवीधर असावा, केवळ महिला व्यक्ती अध्यक्षपदासाठी अर्ज करून शकेल, महिलांच्या सोयीसाठी बांधील असावे. तसेच सामाजिक कार्याचा ५ वर्षाचा अनुभव असावा. अशासकीय अध्यक्षाचा कालावधी नेमणूकीपासून ३ वर्षाचा राहील.

**सदस्य पदाकरीता पात्रता :** महिलांच्या सोयीसाठी बांधील असलेल्या अशासकिय संघटना, संघ किंवा लैंगिक छळाच्या प्रश्नांशी परिचित असलेली व्यक्ती यामधून दोन सदस्य नामनिर्देशीत करावयाचे आहेत. त्यापैकी किमान एक सदस्य महिला असावी, कायद्याची पार्श्वभूमी असलेला असावा. तसेच किमान एक सदस्य, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती किंवा इतर मागासवर्ग किंवा अल्पसंख्यांक समाजातील महिला असावी.

इच्छूक पात्र व्यक्तिनी आपले शैक्षणिक पात्रता, कामाविषयीचा अनुभव व संमतीपत्र समितीच्या अध्यक्ष व सदस्य या पदावर नियुक्ती करणेबाबतचा अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बस स्टैंडच्या मागे मुठ्ठे ले आऊट डॉ. जोशी नेत्रालय बुलढाणा या कार्यालयास सादर करावे, असे प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

## थोडक्यात

### जलतारा योजना यशस्वी करण्यासाठी बळीराजा संस्थेचा पुढाकार



**मानोरा :** भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खालावत चालल्यामुळे शासन आणि काही समाजसेवी संस्थांच्यावतीने जलतारा योजना राबविण्यात येत आहे. शासनाच्यावतीने या योजनेसाठी अनुदान दिले जात असले तरी अनेक समस्यांमुळे काही शेतकरी या योजनेकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसते. त्यामुळे या योजनेचे महत्त्व प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे कार्य येथील बळीराजा बहुद्देशीय संस्था करीत आहे. कुपटा येथे ४०४.५१ हेक्टर जमीन वहितीत असून, या सर्व क्षेत्रामध्ये जलतारा योजना प्रभावीपणे राबवावी यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. कुपटा शेतशिवारातील टेंभाळा, खापरी, देरडी, वंजारखेडा, लोहारा, उमरदरी, धानोरा, कमळापूर या गावांतील शेतकऱ्यांनीही या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.

### अवैध दारू विक्रीवर कारवाई करण्याची मागणी

**वाशिम :** जिल्ह्यात दिवसेंदिवस बळावणाऱ्या अवैध दारू विक्रीविरोधात आता महिलांनी उघडपणे आवाज उठवला आहे. वज्रदेही महिला विकास संघाच्या संस्थापक अध्यक्ष आरती ठोके यांच्या नेतृत्वात महिलांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाला निवेदन सादर करत कठोर कारवाईची मागणी केली आहे.
निवेदनात म्हटले की, जिल्ह्यातील हॉटेल, ढाबे, पानटपऱ्यांवर उघडपणे चालणाऱ्या देशी व विदेशी दारू विक्रीमुळे महिलांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. मद्यपींच्या वागणुकीमुळे महिलांना अपमानास्पद प्रसंगांना सामोरे जावे लागत असून, तरुणींना रस्त्यावरून खाली मान घालून चालावे लागते, असेही त्यांनी नमूद केले. शाळकरी मुले व तरुणही दारूच्या आहारी जात असून, त्यातून गुन्हेगारी वाढते आहे. चोरी, मारहाण, बलात्कार यांसारख्या गुन्ह्यांची पाळंमुळं याच अवैध दारू विक्रीत असल्याचा संघटनेचा ठाम दावा आहे. ''
महिलांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर तत्काळ कारवाई झाली नाही, तर त्या जलकुंभावर किंवा मोबाइल टॉवरवर चढून आंदोलन करतील. याची सर्व जबाबदारी पोलिस प्रशासनावर राहील, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

### दोन वर्षीय मुलीसह विवाहिता दहा दिवसांपासून बेपत्ता !

**मंगरूळपीर :** २८ वर्षीय विवाहित महिला दोन वर्षांच्या मुलीसह १३ एप्रिलपासून बेपत्ता असून, याबाबतची तक्रार मंगरूळपीर पोलीस ठाण्यात १९ एप्रिल रोजी दाखल करण्यात आली आहे.
कैलास ढेंगे (वय ५२) यांच्या तक्रारीनुसार, विवाहितीने मुलीने आजीची तब्येत ठीक नाही, त्यामुळे ती माहेरी झोडगा येथे जाणार आहे, असे सांगितल्याने विवाहिता आणि तिची दोन वर्षांच्या मुलीला १३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता मंगरूळपीर बसस्थानकात सोडण्यात आले; मात्र त्या दिवशी विवाहिता माहेरी पोहोचली नाही आणि त्यानंतर तिचा कुठेही पत्ता लागलेला नाही. नातेवाइकांकडे चौकशी करूनही तिचा शोध लागला नसल्याने अखेर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. याप्रकरणी मंगरूळपीर पोलिसांनी मिसिंगची नोंद केली असून; अधिक तपास सुरू आहे.

### भरधाव दुचाकीसमोर वन्यप्राणी आडवा आल्याने अपघात

**कारंजा :** भरधाव दुचाकीसमोर वन्यप्राणी अचानक आडवा आल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वार गंभीररीत्या जखमी झाल्याची घटना रविवारी, २० एप्रिल रोजी दुपारी १:३० वाजताच्या सुमारास कारंजा-मानोरा मार्गावरील सोहळ अभयारण्याजवळ घडली. गजानन भारसके (वय ५०) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव असून, ते कारंजा शहरातील रहिवासी आहेत.
मिळालेल्या माहितीनुसार, भारसके हे म्हसणी येथे लग्नकार्याला जात असताना अचानक त्यांच्या दुचाकीसमोर वन्यप्राणी आडवा आला. त्यामुळे दुचाकीवरील नियंत्रण सुटून ते रस्त्यावर कोसळले आणि गंभीर जखमी झाले. घटनेनंतर तातडीने रुग्णवाहिकेचे चालक शिवम खोंड यांनी जखमीला कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले; मात्र प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविले.

### दादगाव येथील शेताच्या बांधावरील बांबू जळून खाक

**कारंजा :** दादगाव येथील शेतात लागलेल्या आगीत शेताच्या बांधावरील बांबू जळून खाक झाल्याची घटना रविवारी दुपारी १२ वाजता घडली. या आगीत सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. राम अमोल सावंत यांच्या शेतामधून विद्युत वाहिनी गेली असून, अचानक खांबावर स्पार्किंग झाल्याने ठिणग्या पडल्या आणि त्यामुळे आग लागली. या आगीत शेताच्या बांधावरील सर्व बांबू जळून नष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच कारंजा नगर परिषदेचे अग्निशमन दल तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. कर्मचारी बाळू काठोये, इमरान खान, अनुराग बारबोले आणि नरेंद्र भोयर यांच्या प्रयत्नांमुळे आग नियंत्रणात आणण्यात यश आले.

# डोक्यावर हंडा : महिलांची जिल्हा परिषदेवर धडक

## पाण्याचे भीषण संकट, प्रशासनाकडून टँकरही मिळेना








**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २१ :** पाण्याचे भीषण संकट निर्माण झाले असताना प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची उपाययोजना करण्यात आलेली नाही. परिणामी, महिलांना दूरवरून डोक्यावर पाणी आणावे लागत आहे. यामुळे मंगरूळपीर तालुक्यातील कळंबा बोडखे गावातील महिलांनी २१ एप्रिल रोजी भरउन्हात डोक्यावर हंडा घेऊन वाशिमच्या जिल्हा परिषदेवर मोर्चा काढला. वाशिम जिल्ह्यातील कळंबा बोडखे या गावातील महिलांना पाणीटंचाईचा मोठा सामना करावा लागत आहे.

गावाला पाणीपुरवठा करणारी योजना मंजूर होऊनही अद्याप पाणी मिळत नाही. प्रशासनाकडून टँकर मंजूर होत नाहीत, दिवसभर दोनशे रुपये मजुरी करून २०० लिटर पाणी विकत घेण्यासाठी १०० रुपये मोजावे लागण्याची वेळ कळंबा बोडखे गावातील नागरिकांना आली आहे. ही समस्या अनेक दिवसांपासून गावात निर्माण झाली आहे.

कळंबा बोडखे येथील नागरिकांची पाणी समस्या सोडवण्यासाठी जिल्हा प्रशासन अपयशी ठरले आहे. कळंबा बोडखे गावात २ कोटी ४८ लाख रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर झाली. या योजनेला मंजुरी मिळून तीन वर्षे लोटली; परंतु अद्याप पाणी मिळालं नाही.

यामुळे उपोषणाचा इशारा ग्रामस्थांनी दिला होता. यानंतरदेखील गावातील महिलांना ४० दिवसात पाणी देऊ, असे अश्वासन देण्यात आले होते. तरी देखील आश्वासनपूर्ती झाली नाही. आश्वासन दिल्यानंतरदेखील गावात पाणी न मिळाल्याने संतप्त महिलांनी आज, २१ एप्रिल रोजी जिल्हा परिषदेवर घागर मोर्चा काढला. भरउन्हात डोक्यावर पाण्याचा हंडा घेऊन महिला जिल्हा परिषदेवर धडकल्या. याठिकाणी वाशिम प्रशासनाला पाण्याची मागणी केली. जर त्वरित पाण्याची उपाययोजना न झाल्यास मोठे आंदोलन उभे करणार असल्याचे यावेळी आंदोलनकर्त्या महिलांनी सांगितले.

## अंगणवाडी सेविकांना मार्च महिन्याच्या मानधनाची प्रतीक्षा

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २१ :** अंगणवाडी सेविका कर्मचाऱ्यांचे माहे मार्च २०२५ चे मानधन खात्यात जमा झाले नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. मानधन मिळाले नसल्यामुळे जीवन जगायचे कसे ? असा प्रश्न अंगणवाडी सेविका यांना पडला आहे. मानधन खात्यात जमा करण्याची मागणी अंगणवाडी संघटनेच्या तालुका अध्यक्ष प्रमिला पखाले यांच्यासह इतरांनी केली आहे.

अंगणवाडी सेविकांना दरमहा १३ हजार रुपये तर मदतनीस यांना ७ हजार रुपये दरमहा मानधन दिले जाते. अंगणवाडी सेविकांना जीवन जगण्याचे एकमात्र साधन अंगणवाडीची नोकरी आहे. मिळणाऱ्या मानधनातून कुटुंबाचा प्रपंच चालविला जातो. मार्च महिन्याचे मानधन न मिळाल्याने अंगणवाडी सेविका व त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.. अंगणवाडी सेविकेच्या मागे पण खूपच कामे लागलेली आहेत.



अंगणवाडी सेविकांना मोबाईल रिचार्ज, टीएडीए व योजनेच्या कामासाठी स्वतः चे पैसे खर्च करावे लागतात. तसेच घरोघर जाऊन लाभार्थ्यांची केवायसी करणे, आयडी तयार करणे आणि एफ आर एस पद्धतीने त्यांचा फोटो कॅप्चर करणे लाभार्थ्यांचा ओटीपी घेणे, असे बरेच प्रकारचे कामे अंगणवाडी सेविकांना करावी लागते. वाढत्या महागाईने आधीच डोके वर काढले असून, मानधन मिळाले नसल्यामुळे अंगणवाडी सेविकांना त्वरित मानधन देण्यात येण्याची संघटना अध्यक्ष प्रमिला पखाले, सजीव रंजना इंगोले, शोभा मनोहर, शीला खिराडे, वनिता कावरे, भाग्यश्री डेरे , रंजीता राठोड यांनी मागणी केली आहे.

## जागतिक वसुंधरा दिनानिमित्त ‘सिड बँक’ प्रदर्शन

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

जागतिक वसुंधरा दिन विशेष




**वाशिम, दि. २१ :** एसएमसी इंग्लिश स्कूल येथे निसर्ग इको क्लब व राष्ट्रीय हरित सेना व सामाजिक वनीकरण विभाग वाशिम यांच्या विद्यमाने जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून सीड बँकेच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्य मीना उबगडे व पर्यवेक्षिका प्रणीता हरसुले होत्या. सदर सिड बँक प्रदर्शनांतर्गत विद्यार्थ्यांनी विविध रंग, आकार, वजन, उपयुक्तता व आरोग्यावर होणारे त्यांचे परिणाम व पर्यावरणाच्या दृष्टीने त्यांची उपयुक्तता याची विस्तृत माहिती दिली. या बीज संकलनाचा वापर सामाजिक वनीकरण विभाग वाशिम व शाळेच्या परिसरातील बॉटनिकल गार्डनसाठी करण्यात येणार आहे.

निसर्ग आणि मानव यांचे नाते अतुट आहे. आपल्या बुद्धी सामर्थ्याच्या बळावर संस्कृतीची उभारणी करणारा आणि प्रचंड प्रगती साधणारा एकमेव प्राणी म्हणजे मानव. मानवाच्या या वैशिष्ट्यामुळे व समाज प्रियतेमुळे त्यांच्या भोवतालच्या नैसर्गिक पर्यावरणाला सामाजिक पर्यावरणाचीसुद्धा जोड मिळाली. आधुनिक काळात एकीकडे मानवाने प्रगतीची उत्तुंग शिखरे गाठली; परंतु दुसरीकडे नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणाविषयी गुंतागुंतीची व भयानक समस्या उभ्या केल्या व वसुंधरेकडे दुर्लक्ष केले. बेसुमार वृक्षतोड केली त्यामुळे पशु -पक्षी -प्राणी देखील दिवसेंदिवस दुर्मिळ होत गेले. आपल्या देशातील अनेक शहरांमध्ये पाण्याचा तुटवडा जाणवत आहे. जगातील आश्चर्य असणारा ताजमहल प्रदूषणामुळे काळवंडत चालला आहे. प्रशांत महासागराच्या पोटात खळबळ माजली आहे. अमेरिका, फ्रान्स इत्यादी देशात आम्ल वर्षा होत आहे. थंड हवेचे ठिकाण असलेले माथेरान, महाबळेश्वर येथील वनसंपदा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे. पृथ्वीचे तापमान जर १०५ अंश सेल्सिअसपर्यंत झाले तर समुद्राच्या पाण्याची पातळी वाढेल व समुद्राच्या आजुबाजुची महानगरे गडप होतील. प्रदूषणाचा भस्मासुर वसुंधरेला गिळू पाहत आहे.

सिड बँकेच्या प्रदर्शनाचे आयोजन राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक अभिजीत जोशी ,प्राचार्य मीना उबगडे, विभागीय वन अधिकारी अशोक प-हाड, सहायक वनसंरक्षक राजेंद्र कातखेडे, वनपाल समाधान सानप, वनरक्षक भगवान वानखेडे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आले .प्रदर्शनी यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षीका भारती गटलेवार, प्रतीक्षा कान्हेड तसेच राष्ट्रीय हरित सेनेचे चिमुकले यांनी अथक परिश्रम घेतले. सदर उपक्रम हा राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक अभिजीत जोशी हे १६ वर्षा पासुन राबवित आहे. प्रदर्शनाला बहुसंख्य विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

## बंजारा परिषदेच्या महिला विदर्भ संघटकपदी सुनीता जाधव

**वाशिम :** राष्ट्रीय बंजारा महिला परिषदेच्या विदर्भ महिला संघटक या पदावर महिला चळवळीच्या नेत्या सुनीता किशोर जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



वाशिम जिल्ह्याचे काम महिला आघाडीच्या सीमा प्रकाश राठोड या काम पाहत आहेत. महिला सक्षमीकरणात सतत प्रकाशझोतात असणाऱ्या सुनीता किशोर जाधव यांचे माहेर वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुका असून, लग्नानंतर सद्यस्थितीत त्या आपल्या अकोला येथील परिवारासोबत वास्तव्य करत आहेत. त्यांची बंजारा परिषदेच्या महिला आघाडीच्या विदर्भ संघटक पदावर नियुक्ती करण्यात आल्याने वाशिम आणि अकोला या दोन्ही जिल्ह्यातील बंजारा समाज बांधवांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे. आपल्या नियुक्तीनंतर त्या म्हणाल्या की, बंजारा परिषदेच्या ध्येयधोरणानुसार आपण कार्य करणार असून महिलांच्या हक्कासाठी सदैव लढणार आहोत. बंजारा महिला राष्ट्रीय परिषदेने दिलेली जबाबदारी आपण पूर्ण विश्वासाने पार पाडणार आहोत.

## पोलीस अधीक्षकांकडून रिसोड पोलिसांचा सन्मान

**वाशिम :** रिसोड पोलिसांनी मागील दीड महिन्यात अपहरण, बलात्कार, पोक्सो, चोरी व इतर गंभीर गुन्ह्यांची यशस्वी उकल करत आरोपींना अटक करून पीडितांना न्याय मिळवून दिला आहे. त्यांच्या उत्कृष्ट कामाची दखल घेत १७ एप्रिल रोजी पोलिस अधीक्षक, अनुज तारे यांनी सर्व ठाणेदारांच्या उपस्थितीत रिसोड पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांचा व अंमलदारांचा प्रशस्तिपत्र देऊन सत्कार करण्यात आला.




रिसोड पोलिसांनी मागील दीड महिन्यात अपहरण, बलात्कार, पोक्सो आणि चोरीसारख्या गंभीर गुन्ह्यांची यशस्वी उकल करत आरोपींना अटक करून पीडितांना न्याय मिळवून दिला आहे. तसेच मोटारसायकल व मोबाइल चोरी प्रकरणातील अज्ञात आरोपींचाही शोध घेऊन गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कार्यक्रमात अपर पोलीस अधीक्षक लता फड व सहायक पोलिस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण, सहायक निरीक्षक शिवचरण डोंगरे, उपनिरीक्षक सचिन गोखले, रामेश्वर नागरे, हवालदार रतन बावस्कर, मंगेश मालवे तसेच अंमलदार रवी अढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोणे, प्रवीण ढवणे, हेमंत सरकटे, विश्वास चव्हाण, रूपेश मस्के, साहेबराव मुकाडे यांचा सन्मान करण्यात आला. या गौरवामुळे पोलिसांच्या कार्यात अधिक उत्साह निर्माण झाला असून, नागरिकांच्या सुरक्षेसाठी त्यांचे प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद ठरले आहेत.

## मानोरा तालुक्यातील सरपंच पदासाठी आरक्षण जाहीर

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २१ :** मानोरा तालुक्यातील एकूण ७७ ग्रामपंचायतचे २०२५ ते २०३० करिता सरपंच पदाचे आरक्षण २१ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आले. येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहात ही आरक्षण सोडत काढण्यात आली.

या आरक्षणामध्ये, अनुसूचित जातीसाठी वापटा, सोयजना, हिवरा खुर्द, ढोनी, भुली. अनुसूचित जाती महिलासाठी पारवा, फूलउमरी, वाईगौळ, आसोला खुर्द, पाळोदी. अनुसूचित जमातीसाठी तोरणाळा, दापूरा बुद्रुक, धानोरा बुद्रुक, सिंगडोह, हळदा, माहुली. अनुसूचित जमाती महिलासाठी. कुपटा, सोमनाथनगर, खापरदरी, हातना, पोहरादेवी. नागरिकांचा मागास प्रवर्गसाठी. रुद्राळा, रोहना, हिवरा बु., अभईखेडा, कोलार, वटफळ, उमरी बु., गोंडेगाव. ना. मा. प्र. महिलासाठी. सेवादासनगर, गिरडा, सावळी, तळप बुद्रुक,एकलारा. कारपा, आमदारी, रतनवाडी, शेंदोना, सर्वसाधारण जागेसाठी. अजनी, दापूरा खुर्द, भोयणी, चौसाळा, चोंढी, धामणी, बोरव्हा, कारखेडा, वरोली, देवठाना, आमगव्हाण, कोंडोली, सोमठाणा, साखरडोह, खांबाळा, गोस्ता, रुई, उमरी खुर्द,धावंडा. सर्वसाधारण महिला साठी. इंझोरी, जामदरा (घोटी), म्हसनी, मोहगव्हाण, जनुना खुर्द, आसोला बुद्रुक, कार्ली, देऊरवाडी, पंचाळा, गादेगाव, गव्हा, विठोली, गिरोली, भीलडोंगर, शेंदूरजना, मेंद्रा, हातोली, सोमेश्वरनगर, वसंतनगर (पोहरादेवी), आमकिन्ही.



मानोरा तालुक्यातील सोयजना या गावामध्ये अनुसूचित जमातीचे एकही मतदान नाही. असे असतानाही या ग्राम पंचायतला अनुसूचित जमातीचे सरपंच पद आरक्षित आले. त्यामुळे येथिल सरपंचपदी अनुसूचित जमातीमधून एकही उमेदवार मिळणार नसल्याने फार मोठा गोंधळ निर्माण झालेला आहे. अशा परिस्थितीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी या गावातील आरक्षणासंदर्भात कोणता निर्णय घेतात, याकडे संपूर्ण तालुका वासियांचे लक्ष लागून आहे.

आसोला खुर्द, पाळोदी, तळप बुद्रुक आणि एकलारा येथील आरक्षण ईश्वर चिठ्ठीद्वारे काढण्यात आले. उपविभागीय अधिकारी कैलास देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार डॉ संतोष येवलेकर, निवडणूक नायब तहसीलदार सतीश काळे, एम.व्ही. अस्टुरे, निवडणूक लिपीक यांनी आरक्षण सोडतसाठी कामगिरी बजावली.

## मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

**वाशिम :** उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालय, उदगीर यांच्यावतीने भीम जयंती ते शिवजयंतीपर्यंत मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. गत पंधरा वर्षापासून वाशिम अकोला बुलडाणा हिंगोली या जिल्ह्यातून नेत्र रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियाकरिता उदगीर येथे नेले जातात.

जिल्ह्यातील प्रत्येक गाव, वाडी व रस्त्यावर मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करून रुग्णालयाच्यावतीने नेत्र रुग्णवाहिका रुग्णांना रुग्णालयापर्यंत पोहोचविण्याचे काम करीत आहे. आर्थिक दुर्बल घटकातील रुग्ण व जे खासगी रुग्णालयांमध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया करू शकत नाहीत, अशा रुग्णांसाठी तेथे अल्प दरामध्ये सेवा उपलब्ध आहे.



मोतीबिंदूशिवाय काचबिंदू नासुर डोळ्यातील पडद्याची शस्त्रक्रिया व इतर सर्व डोळ्यातील दुर्धर आजाराची तपासणी व शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध आहे. भीम जयंती ते शिवजयंतीपर्यंत जिल्ह्यामध्ये प्रत्येक गावाकडे वस्तीवर मोफत नेत्र शिबिर आयोजित करण्याचा संकल्प रुग्णालयाच्यावतीने करण्यात आल्याची माहिती विदर्भ मराठवाडा शिबिर संयोजक, ठाकूर महावीर सिंग यांनी कळविले आहे.

## थोडक्यात

### उगवा गावात भीषण पाणी टंचाई



**अकोला:** जिल्ह्याच्या पंधरा हजार लोकसंख्या आलेल्या उगवा गावाला भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. नागरिकांना महिना महिना पाणी मिळत नसल्याने, नागरिक त्रस्त आहेत, तर पाणी चोरी होत असल्याने नागरिकांना पाण्याच्या टाकीला कुलूप लावून ठेवावे लागते. अकोला जिल्ह्यातील खारपाणपट्ट्यातील उगवा गाव हे जवळपास पंधरा हजार लोकसंख्येचे गाव आहे. या गावात ६४ खेडी योजनेतून एक-एक दीड-दीड महिना पाणी मिळत नाही. गावातील प्रमुख व्यवसाय शेती असल्याने, गावकरी दिवसभर शेतात असतात, त्यामुळे पाणी एक महिन्यानंतर मिळालेले पाणी चोरीला जाऊ नये, म्हणून पाण्याच्या टाकीला कुलूप लावून ठेवतात. पाणी चोरीच्या घटना घडायला लागल्यामुळे नागरिकांनी सतर्कता म्हणून पाण्याच्या टाकीला कुलूप लावून ठेवावे लागते, एवढंच नाहीतर गावात पाणी नाही म्हणून तरुणांना लग्नासाठी मुलीसुद्धा मिळत नसल्याची शोकांतिक गावकऱ्यांनी बोलून दाखविली. एकीकडे पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्यासाठी शासन लाखो रुपये खर्च करते; मात्र दुसरीकडे खारपाणपट्ट्यातील नागरिकांना पाण्यासाठी मैलोनमैल पायपीट करावी लागत असल्याचे वास्तव आहे. शासनाने पाण्यासंदर्भात तातडीने उपाय योजना करावी, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

### येवदा येथील ऋग्वेदा झळकणार 'बिल्लोरी' चित्रपटात



**वाडेगाव :** ग्रामीण भागातील येवदा येथील ११ वर्षिय ऋग्वेदाने आपल्या घरात अभिनयाचा कोणताही वारसा नसताना आपल्या इच्छाशक्तीच्या बळावर अभिनय क्षेत्रात ठसा उमटविला आहे. ती 'बिल्लोरी' या मराठी चित्रपटात बालकलाकाराच्या भूमिकेत मोठ्या पडद्यावर झळकणार असल्याने येवदा गावांसाठी भूषणावह बाब ठरली आहे. दर्यापूर तालुक्यातील येवदा येथील अरविंद उगले याची कन्या ऋग्वेदा हिला लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. तिने शाळेत शिक्षणासोबतच सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेत आपल्या कलेचा ठसा उमटविला आहे. ऋग्वेदा ही बालशिवाजी प्राथमिक शाळा अकोल्यातील इयत्ता ५ वीची विद्यार्थ्यांनी असून, वऱ्हाडातील पारंपरिक ग्रामीण युवा जगत आणि शहरी युवा जगत यांच्यातील व्यावहारिक अंतर दाखवणारा अस्सल स्थानिक कलाकारांनी भरलेल्या 'बिल्लोरी' या मराठी चित्रपटात ती मध्यवर्ती भूमिका साकारणारी बालकलाकार म्हणून मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. सद्गुरु इंटरप्राईजेसचे निर्माते प्रशांत मानकर यांचा हा बिल्लोरी मराठी चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार असून, त्याचे दिग्दर्शक सुनील शिरसाट हे आहेत. नुकत्याच अकोला येथील हॉटेल कृष्णा इम्पेरियल येथे या चित्रपटाच्या पोस्टरचे विमोचन आ.अमोल मिटकरी यांच्या हस्ते पार पडले आहे. या चित्रपटात जंगलात राहणारे आदिवासी अशिक्षित लोक खऱ्या अर्थाने सुशिक्षित झाले आहेत, असे वाटायला लागते. त्या उलट शहरात सुशिक्षित झालेली लोक आता जंगलातल्या आदिवासी प्रमाणे वागायला लागली आहेत. एकीकडे शिक्षणाने सुशिक्षित झालेले शहरातील तरुण संस्काराने आणि वैचारिक पातळीने सुसंस्कृत झाले आहे का? या विषयावर भाष्य करणारा हा 'बिल्लोरी' मराठी चित्रपट आहे.

# तेल्हारा शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढा

## अन्यथा आंदोलन छेडू; शिवसेनेचा मुख्याधिकाऱ्यांना इशारा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**तेल्हारा, दि. २१ : शहरातील मुख्य चौकांमध्ये करण्यात आलेल्या अतिक्रमणामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत असून, अपघातास आळा घालण्यासाठी वाढते अतिक्रमण काढण्यात यावे तसेच शहरातील विविध समस्या तत्काळ सोडविण्यात याव्यात, अशा प्रकारची मागणी शिवसेना तेल्हारा तालुका व शहराच्या वतीने तालुकाप्रमुख प्रवीण वैष्णव व शहर प्रमुख अनिकेत ढवळे यांच्या नेतृत्वात मुख्याधिकारी नगर परिषद यांच्याकडे निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे.**



तेल्हारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज टॉवर चौक ते जिजाऊ उद्यानपर्यंत रस्त्याच्या कळेला दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात विविध अतिक्रमण झाले आहे, यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच महापुरुषांच्या विटंबना होऊ नये, या दृष्टीने रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेले भाजीपाला, फळ फ्रुटच्या हातगाड्या अतिक्रमण यांना तात्पुरती आठवडी बाजार येथे व्यवस्थितपणे एका बाजूला जागा करून द्यावी व भविष्यात पुन्हा रस्त्यावर अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घ्यावी व नगर परिषदने व्हेजिटेबल मार्केटची जागा क्रीडा संकुल मागे नेमलेली आहे, या जागेवर लवकरात लवकर व्यवस्था करुन व्हेजिटेबल मार्केट कायम स्वरुपी करण्यात यावे, जिजाऊ उद्यान मध्ये सह परिवार नागरिक फिरायला येतात. उद्यानच्या मुख्य रस्त्यावर चारी बाजूने अंधार असतो. तेथे रोशनाईची व्यवस्था करावी. रविवार रोजी बाजारात उघड्यावर मास मच्छी विकले जाते, हे आरोग्यास हानिकारक आहे. उघड्यावर मांस मच्छी विकले जाऊ नये, याची नगर परिषदच्यावतीने खबरदारी घ्यावी, रविवारी आठवडी बाजार हा रहदारीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भरतो, त्यामुळे परिसरात नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. आठवडी बाजार हा बाजारात असलेल्या ओट्यांवर भरवण्यात यावा.

शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात खांबावरील लाइट बंद पडलेले आहेत. तोडी तक्रारी केल्या असूनसुद्धा अद्यापपर्यंत त्या खांबावरील लाइट लावण्यात आले नाही. महत्त्वाचे म्हणजे आपण ज्या अटी व शर्ती लागू करून वार्षिक ठेके देता, ठेका घेतल्यानंतर संबंधित ठेकेदार त्या अटी व शर्तीचे पालन करताना दिसत नाही. या अटी व शर्ती नागरिकांना कळाव्या, या करिता अटी व शर्तीचे फलक नगर परिषद कार्यालय येथे दर्शनिय भागात लावण्यात यावे व आपण स्वतः याकडे लक्ष द्यावे, असे असल्यास संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात यावी व तेल्हारा शहरातील विविध समस्या मुक्त कराव्या, ही तुमची प्रथम प्राथमिकता आहे .

तेल्हारा शहरातील विविध समस्या लवकरात लवकर मार्गी लावा, विविध समस्या मार्गी न लागल्यास शिवसेना तेल्हारा तालुका व शहराच्या वतीने शिवसेना स्टाइलने कोणत्याही प्रकारचे आंदोलन छेडण्यात येईल व याची सर्वस्व जबाबदारी ही संबंधित प्रशासनाची राहील. अशा प्रकारचे निवेदन मुख्याधिकारी यांना देण्यात आले आहे, तसेच त्याच्या प्रतिलिपी नामदार एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई, जिल्हाधिकारी कार्यालय अकोला व नगर रचना विभाग अकोला यांना देण्यात आले आहे. निवेदन देतेवेळी शिवसेना तालुकाप्रमुख प्रवीण वैष्णव, शहर प्रमुख अनिकेत ढवळेसह उपशहर प्रमुख निखिल हिवराळे, उपतालुका प्रमुख भांबेरी सर्कल आदित्य अग्रवाल, उपतालुका प्रमुख बेलखेड सर्कल, प्रकाश पाटील, चिकटे, राजेश गावत्रे, करन भटकर, प्रशांत गावत्रे, ज्ञानेश्वर ढेंगे ,शिवराम गिरी, मयूर वर्मा, अंकुश खंडारे, पंकज वाडेकर, राजेश सोनटक्के, विशाल वाडेकर, रोहित खक्कर, वृशभ ठाकूर, आकाश जसनपुरे, विशाल ठाकरे, मुन्ना भोजने ,आदेश उमाळे ,दीपक जउळकार, अक्षय वानखेडे ,उदय पळसकार, यश धामोळे ,ओम जउळकार, अक्षय मोहनकार, संतोष वर्मा, शुभम फाटे, रोहित धामोळे ,शुभम खंडारे, आदित्य डांगे, कार्तिक सदाशिव, गजानन गव्हाळे, भारत डुडवा, प्रकाश वानखडे, रघुनाथ विखे दानापूर, गोपाल आमले माळेगांव यांच्यासह शिवसेनेचे आजी-माजी पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होतेशिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अतिवृष्टीची मदत त्वरित द्यावी ;अन्यथा महाराष्ट्रदिनी अन्नत्याग आंदोलन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. २१ :** केंद्र व राज्य शासन विविध घटनेत मृत पावलेल्यांना लाखो रुपयांची मदत जाहीर करीत आहे; पण जो शेतकरी राबराबत्या उन्हात अतोनात मेहनत करून आपल्या शेतात धान्याचे उत्पादन करून बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करून देत आहे, अशा शेतकऱ्यांना सातबारा कोरा करू, असे आश्वासन दिले होते ;परंतु ते अजूनही पूर्ण झाले नाही.ही कोणती सरकार! शेतकऱ्यांना शासनाने वेठीस धरले आहे. आज बळीराजा मोठ्या संकटात सापडला आहे. आमदार, खासदार यांच्या मानधनात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे.मग जो शेतकरी अन्नधान्य पिकवून जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी अहोरात्र मेहनत करीत आहे,त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी शासन काय मागे पुढे पहात आहे.जर ३० एप्रिल पूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा न झाल्यास १ मे महाराष्ट्रदिनी रखरखत्या उन्हात गंभीर आंदोलन करण्यात येणार आहे. शासनाने निंभा, कुरूम, हातगाव, जामठी सर्कलमध्ये अतिवृष्टीची मदतीपासून वंचित शेतकऱ्यांना वंचित ठेवल्यामुळे त्वरित मदतीस पात्र करून ३० एप्रिल २०२५ पूर्वी मदत त्यांच्या बचत ठेवीला वर्ग करावी.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, असे आश्वासन दिले होते; परंतु त्या आश्वासनाची अजूनही पुरतता करण्यात आली नाही, त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकरी कमी उत्पादन व हमीभावापेक्षा कमी भावामुळे तोट्यात आला असून, थकीत कर्जदार सभासदांची कर्ज माफी त्वरित जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अन्यथा १ मे महाराष्ट्र दिनी रखरखत्या उन्हात अन्नत्याग आंदोलन करण्यात येणार आहे. राष्टीय महामार्ग क्रमांक ५३ वर दुपारी १२/४ वाजेपर्यंत हे आंदोलन सुरू राहणार आहे. तरी शासनाने शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नांकडे लक्ष केंद्रित करून त्यांच्या मागण्या मान्य कराव्या, असे २१ एप्रिल रोजी उपविभागीय अधिकारी संदीप कुमार अपार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर प्रगती शेतकरी मंडळाचे अध्यक्ष राजू साहेबराव वानखडे, अरूण बोंडे, सेवकराम लहाने, संतोष रद्रकार, मुन्ना नाईकनवरे, निखिल खरबडकार, किसन लोडम, कृष्णा ठाकरे, नंदकिशोर बबानिया,अनिल गावंडे,संजय वानखडे, सुभाष मोरे, जनार्दन धाये,प्रमोद खेडकर, मिलिंद वानखडे,सचिन बांबल, राजेंद्र दावेदार,धीरज लाडे, विवेक तिवारी,हरीदास फुके,प्रीतम देशमुख पंकज वानखडे, रणजित इंगोले, सुभाष महल्ले, विलास वानखडे, गोपाल बोंडे, श्रीकांत वानखडे आदी शेतकरी या सभा व निवेदन देण्यात मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनाच्या प्रति आमदार हरीष मारोती आप्पा पिंपळे, तहसीलदार, पोलीस निरीक्षक मूर्तिजापूर यांना २१ एप्रिल रोजी देण्यात आले आहे.

### उरळ सेतू केंद्रात जे. पी. डांगे यांचे प्रमाणीकरण -ॲग्रिस्टॅक योजनेचा घेतला आढावा




**कळंबी महागाव :** बाळापूर तालुक्यातील उरळ येथील सेतू केंद्रात ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य सचिव जे. पी. डांगे यांचे प्रमाणीकरण करण्यात आले. यावेळी ग्राम महसूल अधिकारी हरीश खराटे, शेतकरी सुधाकर पोहरे, सेतू केंद्राचे संचालक सुपराव वानखडे व ऑपरेटर रोहित निकाडे उपस्थित होते. प्रमाणीकरण प्रक्रियेनंतर डांगे यांनी ॲग्रिस्टॅक योजनेची अंमलबजावणी, माहिती संकलन आणि त्याचा उपयोग या मुद्द्यांवर आढावा घेतला. या योजनेद्वारे शेतकऱ्यांची शेतीसंबंधी माहिती डिजिटल स्वरूपात एकत्र केली जात असून, त्यावर आधारित योजनांची अचूक आखणी व अंमलबजावणी शासनाकडून करण्यात येणार आहे,असे त्यांनी सांगितले. डांगे यांनी सेतू केंद्रातील कर्मचारी व ग्रामस्थांशी संवाद साधत ॲग्रिस्टॅक योजनेमुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या फायद्यांबाबत समाधान व्यक्त केले. त्यांनी सेतू केंद्राचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगून, माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे ग्रामीण भागात होणाऱ्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

## अडगाव येथे भास्कर महाराज पुण्यतिथी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. २१ :**अडगाव बु. येथे श्री संत गजानन महाराजांचे पट्टशिष्य श्री संत भास्कर महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव शुक्रवारी (दि.१८) पार पडला.श्री क्षेत्र भास्कर नगरात शुक्रवारपासून (दि.११) पुण्यतिथी सप्ताह प्रारंभ होऊन त्यामध्ये ज्ञानेश्वरी पारायण,कीर्तन,प्रवचन,गाथा भजन इ.कार्यक्रम घेण्यात आले.श्री भास्कर महाराज पुण्यतिथीनिमित्त प्रथम सकाळी ७ वाजतापासून दिंड्या व पालखीची श्री क्षेत्र परिक्रमा झाली.या परिक्रमेत श्रींचे पट्टशिष्य भास्कर महाराजांच्या पादुका व रजत मुखवट्याची चांदीच्या पालखीतून मिरवणूक काढण्यात आली.या परिक्रमेत अग्रभागी श्रींची पालखी व सोबत या उत्सवाकरिता परगावाहून आलेल्या कापूसतळणी, गायवाडी, बोरगाव वैराळे,दहीगाव,अकोट,इत्यादी ठिकाणच्या सर्व दिंड्या व पालख्यांनी सहभाग घेतला. गुरु,शिष्यांचा जयजयकार सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत बळीराम महाराज दोड यांचे काल्याचे कीर्तन झाले. कीर्तनात त्यांनी श्री.भास्कर महाराज समाधी प्रसंगाचे वर्णन केले. श्रींनी आपले पट्टशिष्य भास्कर महाराजांना सन १९०७ मध्ये चैत्र कृ.दुपारी १२ वाजता स्वहस्ते समाधी दिली होती. म्हणून दुपारी १२ वाजता काल्याचे कीर्तनानंतर हजारो भाविकांनी टाळ व मृदंगाच्या गजरात गुरू शिष्यांच्या नावाचा जयघोष केला व आरती करण्यात आली. त्यानंतर हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## रंभापूर शेतशिवारात दोन एकर गहू जळून खाक

### शॉर्टसर्किटमुळे लागली आग, शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. २१ :** तालुक्यातील मौजे रंभापूर शेतशिवारात दोन एकर गहू जळून खाक झाल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे.

सोमवार, २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास रंभापूर शेतशिवारातील शेतकरी उमेश नारायण कात्रे राहणार रंभापूर यांच्या मालकीच्या गट क्रमांक ३०३ मधील क्षेत्रफळ १.२१ आर मध्ये भरदुपारी शॉट सर्किटमुळे गहू पिकाला आग लागली. सोंगणीला उभा असलेला गहू पूर्णपणे जळून खाक झाला. यामध्ये अंदाजे ५० क्विंटल गहू एक लक्ष पन्नास हजार रुपये किमतीचा त्याचप्रमाणे स्प्रिंकर पाईप सट अंदाजे पस्तीस हजार रुपये किमतीचा असा एकूण १,८५००० रुपयाचे नुकसान झाले आहे, असा पंचनामा महसूल अधिकारी जे.पी. बेलसरे रंभापूर ,कृषी सहायक एस. एस.तळोकार रंभापूर यांनी केला असून, यावेळी स्वाती गुजरकार, धीरज गिते,अविनाश गिते,पंकज गिते,रोशन कंकाळे, स्वप्नील गिते,रामदास मेश्राम,केशव वाहाणे,वैभव गुजरकर पंचनामा करतेवेळी हजर होते. झालेली नुकसान भरपाई शासनाने द्यावी, अशी मागणी शेतकरी उमेश कात्रे यांनी केली आहे.

# आमदारांशी गैरवर्तन करणाऱ्या पीआयची जिल्हा बदली व निलंबनाची मागणी !

## आमदार रणधीर सावरकरांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २१ :** बार्शीटाकळी तालुक्यातील चौकशी प्रकरणावरून मोठा वाद निर्माण झाला असून, भाजपा प्रदेश सरचिटणीस व आमदार रणधीर सावरकर यांनी लोकप्रतिनिधींशी गैरवर्तन करणाऱ्या पोलीस निरीक्षकावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आमदार हरीश पिंपळे यांच्याशी अपशब्द वापरणाऱ्या पीआय प्रकाश तुनकलवार यांची जिल्हा बाहेर बदली करून त्यांना तात्काळ निलंबित करावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात आमदार यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र देऊन हे प्रकरण लावून धरले आहे.



गोवंश तस्करीच्या विरोधात तक्रार देण्यासाठी आमदार हरीश पिंपळे यांनी कार्यकर्ते हरीश वाघ यांच्या माध्यमातून पोलिसांकडे तक्रार दिली होती. त्यानंतर विधानसभा सदस्यांनी बार्शीटाकळी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक प्रकाश तुनकलवार यांना कारवाईचे निर्देश दिले. मात्र, यावर प्रतिक्रिया देताना संबंधित अधिकाऱ्याने अपशब्द वापरल्याचे आरोप आहेत. या प्रकारामुळे आमदाराचा अपमान झाला असून, लोकशाहीत लोकप्रतिनिधींचा अपमान हा खपवून घेतला जाणार नसल्याचा इशारा आमदार सावरकर यांनी दिला आहे.

**राजकीय पातळीवर तीव्र प्रतिक्रिया**

या घटनेची राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश पुंडकर यांनीही गंभीर दखल घेतली आहे. आमदार रणधीर सावरकर व खासदार अनुप धोत्रे यांनी संयुक्तरित्या पोलिस प्रशासनावर नाराजी व्यक्त करत, संबंधित पीआयला त्वरित जिल्ह्याबाहेर बदली करण्यासोबतच त्याच्यावर निलंबनाची कार्यवाही व्हावी अशी मागणी केली आहे. बार्शीटाकळी तालुक्यातील विविध गावात गोवंश तस्करी आणि चोऱ्यांचे घटना वाढत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. मात्र, पोलिसांकडून यावर प्रभावी कारवाई होत नसल्याचे आरोप भाजप पदाधिकाऱ्यांनी लावले आहेत. काही पोलीस अधिकारी आरोपींना वाचवण्यासाठी प्रयत्न करत असल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळेच या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

### तात्पुरते पाऊल उचलले, पण तीव्र कारवाईची मागणी कायम

सध्या पीआय तुनकलवार यांच्याकडून तात्पुरता कारभार काढून त्यांची नियुक्ती पोलीस मुख्यालयात करण्यात आली आहे. मात्र, ही कारवाई अपुरी असून त्यांच्यावर निलंबनासह इतर कठोर शिस्तभंगविषयक कारवाई व्हावी, अशी भूमिका भाजप पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे.

### ....पुढील पाऊल काय?

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी जिल्हा पोलीस अधीक्षकांमार्फत करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. दरम्यान, भाजप पदाधिकाऱ्यांनी जनतेच्या भावना लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने कठोर निर्णय घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# तहसीलदाराला धमकी, जातीवाचक अपशब्दांची पातळी गाठली!

## सोशल मीडियावर ऑडिओ क्लिप व्हायरल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २१ :** तालुक्यातील महसूल प्रशासनावर दबाव आणण्यासाठी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मागासवर्गीय अधिकारी असलेल्या तहसीलदारांना अवैध मुरुम वाहतुकीवर कारवाई केल्याच्या कारणावरून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत, तहसीलची सरकारी गाडी जाळून टाकण्याची तसेच अधिकाऱ्यांना जिवंत जाळण्याची धमकी देण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. हे सर्व प्रकरण मोबाईलद्वारे रेकॉर्ड होऊन सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले आहे. दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११.०० ते १२.३० या वेळेत तहसीलदारांच्या दालनात सचिन निमकाळे (रा. आसोला) व त्यांचे ३ ते ४ सहकारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी तहसील कार्यालयात कार्यरत असलेल्या कंत्राटी वाहनचालक मुजाहीद खान यांच्याविषयी मौखिक तक्रार केली. या चर्चेदरम्यान, सचिन निमकाळे यांपैकी एका सहकाऱ्याने तहसीलदारांना आपला मोबाइल देत, अरविंद पाटील पहार यांनी केलेली अर्वाच्य व जातिवाचक भाषा असलेली ऑडिओ क्लिप दाखवली.

या क्लिपमध्ये तहसीलदारांना ''तहसीलची गाडी जाळून टाकेन'', ''माझ्या समोर तो वाहनचालक दिसला तर तुला व त्या तहसीलदाराला जाळून मारेन'', ''साले, भडवीचे'' अशा अत्यंत खालच्या स्तरावरील भाषेत धमक्या दिल्या गेल्या. विशेष म्हणजे, हे वक्तव्य व्हॉट्सॲप स्टेटसवर ठेवून ते सोशल मीडियावरही व्हायरल करण्यात आले. यामुळे तहसीलदारांची सामाजिक व मानसिक हानी झाल्याचे त्यांनी आपल्या रिपोर्टमध्ये नमूद केले आहे.

### कारवाई मागणी

या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता तहसीलदारांनी अनुसुचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ आणि सुधारित नियम २०१६ अंतर्गत कलम ३(१)(क्यु) आणि (आर) अन्वये अरविंद पाटील पहार, सचिन निमकाळे व त्यांच्या सहकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. यासोबतच त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र, नेमणूक आदेश, संबंधित कायद्याची प्रत आणि ऑडिओ-व्हिडीओ क्लिप्स साक्षरूपात सादर केल्या आहेत.

### साक्षीदार व पुरावे

या घटनेच्या वेळी सलाबत खान हे उपस्थित होते व धमकी देणाऱ्या व्यक्तीची बोलचाल त्यांच्या कानावर पडल्याची साक्षही त्यांनी दिली आहे. तसेच तहसील कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज व मोबाइलमधील ऑडिओ क्लिप्स पेन ड्राईव्हमध्ये सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

१

बुलढाणा, मंगळवार २२ एप्रिल २०२५ www.ajinkyabharat.com


## थोडक्यात

### अट्टल दुचाकी चोरट्यास ठोकल्या बेड्या

**बुलडाणा : :** शहर पोलीस स्टेशन हद्दीतून दुचाकी चोरी प्रकरणातील अट्टल चोरट्यास बुलढाणा शहर पोलिसांनी २० एप्रिल रोजी अटक केली आहे. तेजस संजय पोकळे रा. रोहिणखेड, ता. मोताळा असे आरोपीचे नाव असून त्याने दुचाकी चोरीच्या पाच गुन्ह्याची कबुली दिली आहे. चोरी केलेल्या दुचाकीसह एकूण एक लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. अलीकडच्या काळात शहरातील विविध भागातून दुचाकी चोरी होत असल्याच्या अनेक घटना सम रे आल्या. याप्रकरणी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, १५ एप्रिल रोजी शहर पोलिसांत दाखल असलेल्या दुचाकी चोरी प्रकरणाच्या अनुषंगाने तपास केला असता, तांत्रिक बाबी आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपी निष्पन्न झाला. आरोपी तेजस पोकळे याने अनेक ठिकाणाहून दुचाकी केल्याचे सांगत पाच गुन्ह्यांची कबुली पोलिसांना दिली. यावरून, त्यााच्याविरोधात बुलढाणा पोलिसांनी अटकेची कारवाई केली आहे. त्याच्याकडून चोरी केलेल्या पाच दुचाकी जप्त करण्यात आल्या असून, तब्बल एक लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

### पाण्याच्या टाकीवरून पडल्याने मजुराचा मृत्यु

**खामगाव:** निर्माणाधीन पाण्याच्या टाकीवरून पडल्याने मजूर युवकाचा मृत्यु झाल्याची घटना पहरजीरा येथे घडली. बबलु मनसुरी हपीन (२७) रा. चितोली ता. गोरीया कोठी जी. सिवान बिहार हा युवक पहुरजीरा येथे एका पाण्याच्या टाकीवर काम करीत होता. यावेळी तो पाण्याच्या टाकी वरून खाली पडल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. नातेवाईकांनी त्याला लगेच खामगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल केले. यावेळी डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी खाम गाव शहर पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे.

### खामगावच्या तापमानाचा पारा पोचला ४५.२ अंश सेल्सिअस वर

**खामगाव:** यंदाच्या उन्हाळ्यातील सर्वाधिक ४५.२ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद २० एप्रिल २५ रोजी करण्यात आली आहे. हॉट शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खामगाव शहराच्या तापमानाचा पारा गत दहा दिवसापासून वाढत आहे. वाढत्याा तापमानामुळे खामगावकर अक्षरशः हैराण झालेले आहे. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासूनच सूयनि आपले खरे रूप दाखविण्यास सुरुवात केली आहे. एप्रिलच्या प्रारंभाला उन्हाची तीव्रता इतकी आहे. तर मे महिन्यात शहराच्या तापमानाचा पारा अजून किती वाढत जाईल

# स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी समिती आक्रमक

## १ मे महाराष्ट्र दिनाचा निषेध करुन काळा दिवस पाळणार–ॲड.वामनराव चटप, २५ मे रोजी 'पश्चिम विदर्भ मेळावा'

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा, दि.२१**

केंद्र सरकाने विदर्भाचे स्वतंत्र राज्य निर्माण करावे, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ति करावी, अन्नधान्यावरील तात्काळ रद्द करावा, यासह विविध मागण्यांसाठी विदर्भ राज्य आंदोलन समिती आक्रमक झाली आहे. त्याचाच एक भाग म्हणून एक मे महाराष्ट्र दिनावर समितीने बहिष्कार टाकण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र दिन हा आमच्यासाठी काळा दिन असून त्याावर बहिष्कार घालत असल्याची घोषणा आज विदर्भात राज्य आंदोलन समितीचे प्रमुख एडवोकेट वामनराव चटप यांनी पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत बुलढाणा येथे केली.

या वेळी माजी आमदार ॲड. वामनराव चटप यांच्या सह महिला प्रदेशाध्यक्ष



श्रीमती रंजनाताई मामर्डे, समितीचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष प्रा. राम बारोटे, प्रा. एस पी हिवाळे, दामोदर शर्मा, सुखदेव नरोटे, प्रकाश घुबे, अनिल रिंढे, रामदास शिंगणे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना एडवोकेट वामनराव चटप म्हणाले, मराठी भाषिकांचे वेगळे राज्य असावे, म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, संयुक्त महाराष्ट्र चळवळ सुरू झाली. या चळवळीत वैदर्भियांना, भाषेच्या नावाखाली भावनिक आवाहन करण्यात आले होते. त्यास संपूर्ण विदर्भातील जनतेने पाठिंबा दिला. परिणामी १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. याच दिवसापासून, संपन्न विदर्भ प्रदेशाची अक्षरशः लूट सुरू झाली. पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांनी, मुंबईकर व्यावसायिकांच्या सोबत संगनमत करून विदर्भातील खनीज, कोळसा, वीज, वनसंपदा, शेतमाल याचे बेमालूमपणे शोषण सुरू केले.मागील पाच दशकात विदर्भाला भिकार अवस्थेत आणून ठेवले आहे. त्याामुळे १ मे हा महाराष्ट्र दिन विदर्भासाठी काळा दिवस ठरला. विदर्भातील जनतेने आपले वेगळे राज्य असावे, यासाठी विदर्भ राज्य आंदोलन समिती सातत्याने लढा देत आहे. त्याचा एक भाग म्हणून विदर्भातील जनतेने १ मे महाराष्ट्र दिन हा काळा दिवस म्हणून त्याचा निषेध करावा असे आवाहन ॲड. वामनराव चटप यांनी केले.

विदर्भ राज्य आंदोलन समितीचे कार्य अधिक गतिमान व्हावे यासाठी, घटनेच्या तरतुदीनुसार, जिल्हा व तालुका कार्यकारिणीची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव प्रस्तुत करताना , यातूनच वेगळ्या विदर्भाची चळवळ खऱ्या अर्थात जनआंदोलनाचे स्वरूप धारण करेल असा विश्वास महिला प्रदेशाध्यक्ष श्रीमती रंजनाताई मामर्डे त्यांनी व्यक्त केला.

# दुचाकी आणि कारचा भीषण अपघात; दुचाकीवरील पती–पत्नी जागीच ठार

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**चिखली दि.२१**

बुलडाणा येथून घराकडे चिखली येथे येत असलेल्या तिशीतील दाम्पत्याच्या दुचाकीला समोरुन भरधाव येणाऱ्या कारची जबर धडक बसल्याने झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील पती-पत्नी जागीच ठार झाले. ही घटना रविवार दि. २० एप्रिल रोजी रात्री ८ वाजताचे सुमारास केळवद गावानजिक घडली. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

याबाबत प्राप्त माहिती अशी की, चिखली येथील संभाजी नगर परिसरात वास्तव्यास असलेले गणेश प्रकाश गायकवाड वय ३५ वर्षे आणि त्यांच्या पती उषा वय ३० वर्षे हे दोघे आपल्या दुचाकीने रविवार दि. २० एप्रिल रोजी सायंकाळी बुलडाणा येथून घराकडे निघाले होते. दरम्यान केळवद गावाजवळ आल्यानंतर समोरुन येणारी कार क्र. एम.एच.१२-जेसी ४८४६ च्या चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधावपणे चालवित त्याच्या पुढील वाहनाला ओव्हरटेक केले. मात्र ओव्हरटेक करीत असतांना गणेश प्रकाश गायकवाड यांच्या दुचाकीला सदर कारने जोरदार धडक दिली. धडक एवढी जोरदार होती की अपघातानंतर मोठा आवाज झाला व परिसरातील नागरीक मदतीला धावले. मात्र गणेश व त्यांच्या पती उषा ह्या गंभीर जखमी झाल्याने जागीच ठार झाले होते. यावेळी कारचा चालक तात्काळ घटनास्थळावरुन फरार झाला. दरम्यान बराच वेळ रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. अपघातस्थळी नागरीकांची मोठी गर्दी झाली होती. मात्र पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून रहदारी सुरळीत केली. याबाबत पवन भगवान गायकवाड रा. पळसखेड दौलत यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चिखली पोलिसांनी कारच्या चालकाविरोधात नुसार गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास चिखली पोलिस स्टेशनचे सपोनी स्वप्निल तायडे हे करीत आहेत.

## दुधाचे वाहन संकटात

# 'अमर' नंतर दुसऱ्या दिवशी 'विकास'च्या वाहनाचा अपघात; दुभाजक व वाहनाचे नुकसान

**अजिंक्य भारत / प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.२१**

२१ एप्रिल चिखलीकडून मलकापूरच्या दिशेने जाणाऱ्या दूध वाहतूक करणाऱ्या वाहनाच्या चालकाचा नियंत्रण सुटल्याने वाहन दुभाजाला धडकले .यात चालक किरकोळ जखमी झाला आहे.हा अपघात आज २१ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास बुलडाणा शहरातील त्रिशरण चौका जवळ ''डाईट'' समोर घडला आहे.

विकास दूधचे वाहन हे चिखली कडून जळगांवला जात होते.सकाळी बुलडाणा येथे पोहोचल्यानंतर चालकाचा वाहणावरील नियंत्रण सुटला आणि वाहन दुभाजकाला घासून पुढे गेले यात दुभाजक व वाहनांचे नुकसान झाले आहे.सकाळी अपघात होऊन दुपारी ४ वाजे पर्यंत वाहन अपघातस्थळी उभेच होते.




**दुधाच्या वाहनावर संकट???**
बुलडाणा तालुक्यातील धाड येथील ''अमर डेअरी''च्या दूध संकलन केंद्रातून दूध घेऊन बोदवडकडे जाणाऱ्या टँकरचे ब्रेक फेल होऊन टँकर पलटी झाल्याची घटना काल २० एप्रिल रोजी राजूर घाटात घडली आणि आज बुलडाणा शहरात ''विकास'' दुधाच्या वाहनाचा अपघात झाला आहे.

# आरोग्य सहसंचालकांची बोंडगावसह नख गळतीच्या गावांना भेट

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**शेगाव दि.२१**

तालुक्यातील बोंडगावसह १२ गावामधे केस गळती ने नागरिक हैराण झाले होते. काही दिवस केस गळतीला विराम मिळाला असताना ८ दिवसापासून या सर्व गावामधे अचानक नखे तुटण्याचे नवे संकट उभे राहिल्याने नागरिक हादरले आहेत. आरोग्य संचालकांनी आज भेट दिल्याने गावातील नागरिक चांगलेच आक्रमक झाले होते.

केस गळती च्या वेळी आरोग्य विभागाने सर्वे व्यतिरिक्त कोणतेच काम केले नाही. त्याामुळे नागरिकांना या आरोग्य समस्येला सामोरे जावे लागत असल्याने बोंडगाव चे मा. सरपंच व शिवसेना तालुका प्रमुख रामा पाटील थारकर यांनी आरोग्य



संचालकांच्या समोरच आरोग्य विभागास चांगलेच धारेवर धरले.

ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण मागणीवरून आरोग्य विभाग आणि कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी बोंडगावात दाखल झाले या अधिकाऱ्यांनी काही चौकशी, भेटी, व नमुने घेतले. पण, दोन महिने उलटूनही प्राथमिक निदान, स्पष्ट कारणमीमांसा, वा अहवाल ग्रामस्थांसमोर ठेवण्यात आलेला नाही. जर शासन या आजाराच्या मुळाशी जाणार नसेल, तत्काळ मोफत तपासणी करणार नसेल, तर हे नागरिकांच्या जिवाशी खेळणे होईल आरोग्य सहसंचालकांना गावकऱ्यांनी एकमुखाने पुढील मागण्या स्पष्ट केल्या आहेत:

संपूर्ण गावाची शासकीय खर्चाने मोफत आरोग्य तपासणी करावी.

दररोज गोड्या व सुरक्षित पाण्याचा टँकरने पुरवठा करावा. सर्व नमुन्यांचे शुद्ध तपासणी अहवाल सार्वजनिक करावेत. संपूर्ण घटनेच्या चौकशीसाठी समिती वा उच्चस्तरीय वैज्ञानिक समितीची स्थापना करावी. ज्यांच्या आरोग्याला गंभीर हानी झाली आहे. अशा नागरिकांना शासनाकडून भरपाई व उपचार योजनेचा लाभ मिळावा. ही केवळ बोंडगावची घटना नाही ही एक 'वॉर्निंग बेल' आहे.

सध्याच्या स्थितीत सरकार आणि यंत्रणा 'संदर्भात चौकशी सुरू आहे' हे सांगून वेळ मारून नेत आहेत, पण वेळ केव्हाच निघून गेली आहे. आता नागरिक 'अहवाल' नव्हे, 'उपाय आणि उत्तरदायित्व' मागत आहेत. शासनाने जर हा प्रश्न गांभीर्याने न घेतला, तर येत्या काळात या प्रकरणाची सामाजिक आणि राजकीय, पातळीवर तीव्र दखल घेतली जाईल आणि यासाठी जबाबदार अधिकारी वा यंत्रणा उघड होणार आहेत.

# आरक्षण उपवर्गीकरण संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची अंमलबजावणी करा

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**दे.राजा दि.२१**

सुप्रिम कोर्टाच्या ७ जजेसच्या खंडपीठाने दवेंदर सिंग विरुद्ध स्टेट ऑफ पंजाब सिव्हिल अपिल क्रमांक २३१७/२०११ या रिव्हू पिटीशन मध्ये अनु.जाती व अनु.जनजाती मधिल ऊपवर्गिकरण करण्याचा महाराष्ट्र राज्याला अधिकार देण्यात आला आहे. परंतु महाराष्ट्र सरकारकडून आरक्षण उपवर्गीकरण निर्णय देण्यास दिरंगाई केली जात आहे. आ. कायंदे यांना सकल मातंग समाजाच्या वतीने महाराष्ट्र राज्य सरकारकडे मातंग समाजाचा महत्वपूर्ण आरक्षण उपवर्गीकरणाचा मुद्दा आपण स्वतःहा मांडवा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनात म्हंटले आहे की, ०१/०८/२०२४ रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जातीचे आरक्षण उपवर्गीकरण करण्याचा संपूर्ण अधिकार राज्य सरकारला आहेत व त्यानुसार राज्य सरकारने उपवर्गीकरण करावे असे निर्णय



दिले आहेत. त्याानुसार महाराष्ट्र सरकारने हायकोर्टाचे माजी न्यायमूर्ती मनोहर बदर यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे. आरक्षण उपवर्गीकरण करण्यासाठी वास्तविक अभ्यास करून तीन महिन्यात उपवर्गीकरण आराखडा सादर करायला पाहिजे होता. परंतु समितीने अद्यापही कुठलीच प्रगती या कामात केली नाही असे दिसून येत आहे.

तरी शासनाने तात्काळ कार्यवाही करून लवकरात लवकर माझी न्यायमूर्ती बदर समितीच्या उपवर्गीकरणाचा आराखडा स्वीकृत करून उपवर्गीकरण माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या सात बेंचची न्यायालयाचा सन्मान राखावे व राज्यातील अतिउपेक्षत, उपेक्षित जातींना न्याय द्यावा अन्यथा राज्यातील सकल मातंग समाजाच्या वतीने २० मे रोजी या महाराष्ट्राभर तीव्र आंदोलन करण्यात येईल याची शासनाने नोंद घ्यावी असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी मंगला निकाळजे,प्रभाकर धोंगडे, अजय साबळे, प्रदीप जाधव, देवानंद धोंगडे, डॉ. सुभाष खरात, राजू नाडे, भगवान खंदारे, रवी लाखे, किशोर साळवे,नारायण बोरुडे, नारायण लोखंडे,संजय राऊत, रंगनाथ निकाळजे, अनंत सोळुंके, अमित राऊत, गणेश हिवाळे, की.साळवे, सुनील लोखंडे, सचिन अवसरमोल, नारायण निकाळजे, शंकर खरात यांच्यासह मातंग समाज बांधव उपस्थित होते.

# केंद्रीयमंत्री जाधव यांनी निर्देशित केलेले तज्ञ केस गळती व नख गळती गावात पोहचणार

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.२१**

केस गळती झालेल्या रुग्णाचे नख गळती होत असल्याने या प्रकरणाच्या मुळाशी जाण्याच्या दृष्टीकोणातून केंद्र सरकारच्या आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालयाच्यावतीने केंद्र आणि राज्य सरकारच्या ९ विभागाचे तज्ञ केस गळती आणि नख गळती व्यक्तींना आणि त्यांच्या भेट घेऊन तथ्य संकलन करणार आहे. दिल्लीची ही टीम आज जिल्ह्यामध्ये दाखल होणार असल्याची माहिती केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील पहुरजिरा, कालवड, कठोरा ,भोनगाव, बोंडगाव यांच्यासह शेगाव आणि नांदुरा तालुक्यातील



तेरा गावांमध्ये केस गळती चे प्रकार समोर आला होता त्यानंतर केस गळती झालेल्या रुग्णांचे नख गळतीही होत असल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर या प्रकरणाच्या मुळशी जावून शोध घेण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्यावतीने केंद्र आणि राज्यसरकारच्यावतीने नऊ विभागांचे तज्ञ या गावात पाठवण्यात येणार आहे या तज्ञांची टीम आज जिल्ह्यामध्ये दाखल होणार आहे. यामध्ये भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद, राष्ट्रीय रोग नियंत्रण विभाग, विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, पाणी गुणवत्ता विभाग जल जीवन मिशन, लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेज नवी दिल्ली येथील डरमेटोलॉजी विभागाचे वरिष्ठ अध्यापक तज्ञ, अन्नसुरक्षा व मानद प्राधिकरण विभागाचे संचालक, भारतीय गहू व जव संशोधन केंद्र हरियाणा, प्लांट क्वारंटाईन विभाग आणि कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयचे तज्ञ बुलढाणा जिल्ह्यात येणार आहेत हे सर्व तज्ञ केस गळती व नख गळती कुटुंबीयांना व आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्तींना प्रत्यक्षात भेटून तथ्य संकलन करणार आहे अशी माहिती केंद्रीय आयुष आरोग्य उपक्रम कल्याण राज्यमंत्री

# शेतकरी भवन लोकार्पण सोहळ्यात पत्रकारांचा गौरव

## केंद्रीय मंत्री ना. जाधव, कामगार मंत्री फुंडकर, माजी आ. रायमुलकर यांची उपस्थिती

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मेहकर दि.२१**

निर्भीड पत्रकारिता म्हणजे धाडसाने आणि निष्पक्षपणे सत्य मांडणे ज्यामुळे समाजाला न्याय मिळतो. निर्भीड पत्रकाराचा सत्कार म्हणजे त्यांच्या या योगदानाला गौरवणे जेणेकरून ते अधिक निर्भीडपणे पत्रकारिता करत राहतील. याच पार्श्वभूमीवर दि. २० एप्रिल २०२५ रोजी मेहकरच्या वैभवात भर पाडणाऱ्या शेतकरी भवन या भव्य दिव्य सोहळ्याच्या लोकार्पण प्रसंगी पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव,कामगार मंत्री ना. आकाश फुंडकर, माजी आ. डॉ.संजय रायमुलकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, जिल्हाप्रमुख बळीभाऊ मापारी, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषी भाऊ जाधव, युवा नेते नीरज भाऊ रायमुलकर,




शिवसेना तालुकाप्रमुख सुरेश तात्या वाळूकर यासह विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवर उपस्थित होते. आज समाजामध्ये निर्भीड पत्रकारितेचे खुप महत्व असुन सत्य आणि न्याय या ब्रीद वाक्यानुसार निर्भीड पत्रकारिता समाजाला सत्य माहिती देते आणि अन्याय, भ्रष्टाचार उघड करते. निर्भीड पत्रकारिता लोकशाहीला मजबूत करते, कारण ती नागरिकांना माहिती मिळवण्याचा अधिकार देते निर्भीड पत्रकारिता समाजात विविध समस्या आणि मुद्द्यांवर जागरूकता वाढवते, ज्यामुळे लोक एकत्र येऊन समस्यांवर उपाय शोधू शकतात. निर्भीड पत्रकारिता लोकशाहीचे एक महत्वाचे स्तंभ आहे. जी समाजाला योग्य दिशा दर्शवते आणि लोकांमध्ये न्याय मिळवण्याची भावना जागृत करते या सर्व बाबीसाठी पत्रकार उद्धव फंगाळ सातत्याने सजग प्रहारी म्हणून पत्रकारितेच्या माध्यमातून समाजामध्ये जनजागृती करण्याचे काम एकनिष्ठतेने करतात. ते मागील ३० वर्षापासून सातत्याने लेखणीची धुरा सक्षमपनाने आपल्या खांद्यावर सांभाळत आहे. सत्कार हा पत्रकारांना प्रोत्साहन देतो, त्यांच्या लेखणीला बळ देण्यासोबतच त्यांच्या कामाला अधिक महत्व प्राप्त करून देतात फंगाळ समाजाला सत्य माहिती देतात आणि समाजासाठी लढतात. फंगाळ निश्चित सातत्याने आपल्या फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून मेहकर शहर व तालुक्यातील प्रत्येक घटनेची अपडेट तालुक्यातीलच नव्हे तर जिल्ह्यातील वाचकांचा कुठल्याही प्रकारच्या जाहिरातीच्या पाठलाग न करता समाजात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा लेखाजोखा ते वाचकापर्यंत पोहोचवतात सतत आपल्या पत्रकारितेशी इमान राखत वस्तुनिष्ठ बातम्या देण्यासाठी त्याचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला मेहकर तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५

# राज्य कल्याण आयुक्तांची अव्यवहारी व अन्यायकारी भूमिका?

## कामगार कल्याण मंडळ आजी-माजी कर्मचाऱ्यांमध्ये आक्रोश; शासन निर्देशानंतरही कर्मचाऱ्यांना देय थकबाकी देण्यास मंडळ असमर्थ

अजिंक्य भारत । संजय देशमुख

**अमरावती, दि. २१ :** गेल्या ७ दशकांपेक्षा अधिक काळापासून महाराष्ट्राला बलशाली कल्याणकारी राज्याची ओळख करून देण्यात अग्रेसर ठरलेल्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या नितीभ्रष्ट कारभाराकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. शासन सेवा शर्ती मापदंडक नियमाप्रमाणे अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीचा कार्यकाळ २ वर्षाचा असतो. काही अपहार्य परिस्थितीत मुख्यमंत्र्यांची मान्यता घेऊन पुन्हा हा कार्यकाळ सहा महिने किंवा एक वर्षापर्यंत नियमाप्रमाणे वाढवला जाऊ शकतो. परंतु हा नियम डावलून नियमबाह्यरित्या प्रतिनियुक्तीवर असलेले या मंडळाच्या मुख्य प्रशासक पदावर राज्याचे कल्याण आयुक्त रविराज इळवे हे गेल्या पाच वर्षापासून कार्यरत आहेत. इळवे यांची अहंकारी असंवेदनकृती सोबतच अव्यवहारी- अन्यायकारक भूमिका? त्यामुळे या मंडळाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासन निर्देशानंतरही मंडळाच्या आजी-माजी कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची देय थकबाकी रक्कम देण्यास मंडळ प्रशासन अनेक वर्षापासून असमर्थता प्रकट करीत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आक्रोश निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे ! मात्र दुसरीकडे कामगार कल्याणकारी कार्याशी सुसंगत नसलेल्या कामावर लाखो- करोडोंचा निधी उधळला जात असून त्या माध्यमातून मंडळातील वादग्रस्त काही फिक्सर अधिकाऱ्यांची मौज होत असल्याचे आरोप होत आहेत. त्याबाबत अनेक तक्रारी शासन दरबारी प्रलंबित आहेत. त्या कारणाने हे मंडळ दिवाळखोरीच्या वाटेवर वाटचाल करीत असल्याची विदारक वस्तुस्थिती जागृत कामगार क्षेत्रातील समाज सेवाव्रतीकडून व्यक्त केली जात आहे.राज्यातील विविध प्रशासकीय सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांसह महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील आजी- माजी कर्मचाऱ्यांना शासन सेवा कर्मचाऱ्यांना शासन सेवा मापदंडानुसार शासन निर्णय-


रविराज इळवे


आकाश फुंडकर


आशिष जयस्वाल

मराठी भाषा विभागाचे शासन परिपत्रक क्र. मभाप-२०१६/ प्र.क्र. १३ भाषा-२ दि. २४ मे २०१६ अन्वये मंडळातील गट क व ड श्रेणी संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना दि. १ जानेवारी २०१६ पासून या सातव्या वेतन आयोग कार्यकाळामध्ये सुधारित तीन लाभाच्या सेवांतर्गत दहा- विस व तीस वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना सुधारित आश्वासित प्रगती योजना शासन आदेशाने लागू करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र शासन वित्त विभाग - शासन निर्णय क्र. वेतन - ११११/प्र. क्र. ३/२०१९/ सेवा-३ दि. २०/३/२०१९ नुसार निर्देशित आदेश परिपत्रक निर्गमित केले आहे. परंतु त्याचा लाभ कल्याण आयुक्त इळवे यांनी मंडळातील सर्वसाधारण लहान पदावरील कर्मचाऱ्यांना अद्याप दिला नाही, तर त्यांना पदोन्नती सुद्धा दिली नाही. याबाबत अस्तित्वात असलेल्या मंडळ कर्मचाऱ्यांच्या चार संघटनेतील प्रभावशाली मानले जाणारे झुंजारशाली पदाधिकारी तत्कालीन कामगार राज्यमंत्री तथा मंडळ कर्मचारी संघटना व प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू, कामगार नेते तथा विद्यमान विधान परिषद सदस्य संजय केनेकर, ज्येष्ठ कामगार पितृतुल्य नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे गाढे अभ्यासक आमदार भाई जगताप, दिलीप दादा जगताप, कामगार क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते यशवंत भोसले यांच्यासह अनेक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कल्याण आयुक्त इळवे यांच्या कर्मचारी अन्यायकारी कृती विरोधात कठोर भूमिका घेतली. यामुळे इळवे यांनी त्यांच्या तात्पुरत्या समाधानासाठी दिनांक १७ जून २०२४ रोजी टिपणी मान्य करीत १७ कर्मचाऱ्यांना सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याकरता यादी जाक्र/ साप्रवि/ आस्था/२०२४/७४८ दि. २१ जून २०२४ रोजी प्रसिद्ध केली व त्यांची माहिती मागवली होती, परंतु अद्यापपर्यंत एकाही कर्मचाऱ्याला न्याय दिलेला नाही हे विशेष. शासन अधिसूचना वित्त विभागाचे दि. ३० जानेवारी २०१९ चे निर्देशान्वये मंडळातील कर्मचारी व अधिकाऱ्यांना सन २०१९-२० पासून पुढील ५ वर्षात समान हप्त्यात सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह खात्यात थकबाकी जमा करावी, तर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सदर रक्कम रोखीने अदा करणे गरजेचे होते.

### कामगार मंत्री याकडे लक्ष देणार का?

मंडळ प्रशासनाच्या या अनागोंदी कारभारामुळे या मंडळाचा कारभार दिवाळखोरीच्या वाटेवर आहे ! या मंडळाची अस्मिता जोपासण्याकरिता न्यायव्रती ना.ॲड.आकाश फुंडकर - कामगार मंत्री आणि ना.ॲड आशिष जयस्वाल - कामगार राज्यमंत्री यांनी या मंडळाच्या कारभाराची झाडाझडती घेऊन अन्यायग्रस्त कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा. सोबतच या मंडळाला गतवैभव प्राप्त करून द्यावे,अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केंजळे, उत्तर पूर्व मुंबई यांनी एका प्रसिद्धी पत्राद्वारे केली आहे.

परंतु त्याची अंमलबजावणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले गेले. सदैव मंडळाच्या आर्थिक स्थितीची कारणे देत अडचणी पुढे करण्यात आल्या आहेत. आतापर्यंत ७ व्या वेतन आयोगाच्या थकबाकी रकमेपैकी ५० टक्के रक्कम देण्यात आली. तर उर्वरित थकबाकी रक्कम केव्हा मिळेल याची अनिश्चितता कायम आहे. यावरून मंडळाची आर्थिक स्थितीचे आकलन होते. त्यानुसार मंडळ दिवाळखोरीच्या वाटेवर असल्याचे बोलले जात आहे. गतकाळात या मंडळाची डबघाईस गेलेली आर्थिक स्थिती सुधारावी व मंडळाचे अस्तित्व कायम राहण्यासोबतच कामगार कल्याण मंडळाच्या कार्याला नवसंजीवनी मिळावी याकरिता तत्कालीन सरकारने कामगार कल्याण निधीमध्ये दुप्पटीने वाढ केली आहे, असे असताना देखील मंडळ प्रशासन कर्मचाऱ्यांना न्याय देण्याच्या भूमिकेत दिसून येत नाही. यावरून कल्याण आयुक्त इळवे यांची अव्यवहारी व अन्यायकारी भूमिका दिसून येत असल्याने त्यांच्या या कृती विरोधात कर्मचाऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. मंडळाकडून थकबाकी रक्कम मिळेल या आशेने तुटपुंज्या वेतनावर काम करणारे कर्मचारी कर्जबाजारी झाले आहेत. परंतु मंडळाच्या नाकर्ते भूमिकेमुळे त्यांची कुचुंबना होताना दिसून येत आहे.

# थोडक्यात

### बसमधून सोन्याचे दागिने उडविले

**अमरावती :** महिला ही मामेभावाचे लग्न असल्यामुळे दर्यापूर येथील डेपोमधून अमरावतीच्या बसमध्ये बसली होती. बॅंगमध्ये छोटी पर्स ठेवलेली होती. ती पर्स अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. सोन्याचे दागिने व नगदी ४ हजार रुपये असा एकूण २ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना २० एप्रिलला ३ वाजताच्या सुमारास घडली. फिर्यादी महिला एकविरा विद्युत कॉलनी अमरावती या मामेभावाचे लग्न असल्याने दर्यापुरला गेल्या होत्या. अमरावतीला परत येत असताना त्या बसमध्ये बसल्या. बसमध्ये कोणीतरी अज्ञात इसमाने बॅंकमधील छोटी पर्स चोरून नेली. त्या पर्समध्ये ३५ ग्रॅमचे मंगळसुत्र, ७ ग्रॅम कानातले, दोन ग्रॅमचे डोरले व नगदी ४ हजार रुपये होते. महिला ही दर्यापूरवरून अमरावती आल्यावर घरी त्यांनी सोन्याचे दागिने असलेली पर्स पाहिली असता दिसून आली नाही. सदर घटनेची तक्रार महिलेने गाडगेनगर पोलिसात दिली. पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्द गुन्हा दाखल केला आहे.

### विद्यार्थ्यावर चाकूने हल्ला

**अमरावती :** फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या अंतर्गत येत असलेल्या उत्तम नगर परिसरात अल्पवयीन विद्यार्थी ११ वीचा पेपर सोडून मित्रा सोबत पायदळ येत असताना दुचाकीवरून आलेल्या चार जणांनी त्याला लाथा बुक्क्या व कमरेतून चाकू काढून मारला त्यामुळे तो जखमी झाला. ही घटना २० एप्रिलला घडली. फिर्यादी वैभव प्रकाश खंडारे, १६ रा. चवरे नगर, याचा ११ वीचा पेपर होता. पेपर झाल्यावर मित्रासोबत घरी पायदळ येत होता. दुचाकीवरून अनोळखी चार इसम १८ ते २० वयोगटातील आले व वैभव खंडारे याला अडवून त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्याला दगड मारले. या प्रकरणी एका मुलाने कमबरेतून चाकू काढून वैभव खंडारे याच्या पाठीत मारला व त्याच दुचाकीने पळून गेले. यातील चाकूने मारहाण करणाऱ्या सॅन्ड उर्फ अर्थव म्हणून असे आवाज देत होते. सदर घटनेची तक्रार वैभव खंडारे यांनी फेजरपुरा पोलिसात दिली. पोलिसांनी तक्रारीवरून चार आरोपिविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फ्रेजरपुरा पोलिस त्या आरोपींचा शोध घेत आहेत.

# नॅशनल हेरॉल्ड घोटाळ्याविरोधात भाजयुमोचे आंदोलन

## प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस कार्यालया पुढे निदर्शने

## राहुल गांधीची प्रेतयात्रा काढून केला निषेध, कॉंग्रेस कार्यकर्ते आक्रमक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २१ :** नॅशनल हेरॉल्ड घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर कठोर कारवाईची मागणी करत भारतीय जनता युवा मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशतर्फे अमरावती येथील कॉंग्रेस कमिटीच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले, विशेष म्हणजे या आंदोलनाच्या वेळी युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पिंपरी चिंचवड येथील रहिवासी श्री अनुप मोरे ते आवर्जून उपस्थित होते. देशभरात सध्या नॅशनल हेरॉल्ड घोटाळा गाजत आहे, यासंदर्भात पीडीतर्फे राहुल गांधी यांना नोटीस सुद्धा बजावण्यात आलेली आहे तसेच याच प्रकरणांमध्ये कॉंग्रेस नेते राहुल गांधी व श्रीमती सोनिया गांधी हे जामिनावर बाहेर आहे. या दोन्ही कॉंग्रेस नेत्यांवर कठोर कायदेशीर




कारवाई करून यांना कठोर शिक्षा द्यावी या मागणीसह संपूर्ण देशामध्ये भारतीय जनता युवा मोर्चा ने आंदोलनाची मालिका उभी केली आहे, महाराष्ट्रात सुद्धा पुणे संभाजीनगर नाशिक कोल्हापूर सांगली सातारा नांदेड लातूर सह अनेक जिल्ह्यांमध्ये आंदोलन करण्यात आलेले आहे.
यानुसार आज अमरावती येथे भारतीय जनता युवा मोर्चा ने तीव्र आंदोलन केले, यावेळी राहुल गांधी यांची प्रेतयात्रा काढण्यात आली. यावेळी युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री श्री बादल कुलकर्णी, अमरावती शहर जिल्हाध्यक्ष श्री कौशिक अग्रवाल, ग्रामीण अध्यक्ष श्री अजिंक्य वानखडे, प्रदेश सचिव प्रणित सोनी, कार्यकारिणी सदस्य तुषार चौधरी, निलेश पवार, ग्रामीण महामंत्री करण धोटे,नितीन गुजर, शहर महामंत्री प्रवीण रुद्रकार, ऋषिकेश देशमुख, अखिलेश राठी,यश शर्मा, रोहित गुप्ता, गोपाल साहु, वंश गांवडे, अखिलेश खडेकार, राजेश बंसतणार, युवराज पवार, सौरभ रत्नपारखी, ऋषिकेश तेल्हार, अनिकेत वाजुरकर,सुमित गुल्हाने, शुमभ गोम, पवन जेशिकर, देवा जेशिकर, सहिल चौधरी, निरंजन दुबे, मनिष अडविकार ऋषिकेश चौबे, श्याम साहू, निरंजन दुबे, स्वराज ठाकरे, निखिल टेकाळे, गौरव मडगे, सागर माहुरे निवृत्ती, निवृत्ती सावरकर, शुभम सांगले, वैभव गायकी,सनी दुदवानी, आकाश अविटकर, श्रीपेश धानोरकर, तुषार अंगोरे, अलपेश जुनघरे, कुणाल गोरे, योगेश श्रीवास्तव, स्वप्निल बावरिया, वैभव बनकर, उमग मोगा, विजय उपाध्याय, राज नगरे, अनिकेत राजुरकर अनिकेत विश्वकर्मा,वैभव बेलसरे, महेश भारतीय अभिषेक जोशी ऋषिकेश चौबे. कार्तिक सामदेकर, प्रफुल मानके, आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषी कार्यालयात अधिकाऱ्यांना तीन तास घेराव



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, दि. २१ :** तालुक्यातील हजारो शेतकरी पीक विम्याच्या नुकसान भरपाई पासून वंचित असल्याने शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी शेतकऱ्यांनसह कृषी कार्यालयात पीक विमा प्रतिनिधीना तीन तास घेराव करून धारेवर धरले पीक विमा प्रतिनिधीनि वंचित असलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून निधी प्राप्त होताच १० दिवसाचे आत पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करू अशे चर्चेदरम्यान बैठकीच्या इतिवृत्तात आश्वासन दिले.
शेतकऱ्यांचा वाढता रोष पाहता मंजूर असलेल्या पीक विम्याच्या एकूण रकमेतून २५% रक्कम पीक विमाच्या नुकसान भरपाई पासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ दोन दिवसांत विम्याचे पैसे मिळतील व दहा दिवसा नंतर शासनाकडून निधी प्राप्त होताच उर्वरित पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करू असे पीक विमा कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी अभिलाष नरोडे जिल्हा व्यवस्थापक मृदुल गजबे यांनी बैठकीचे इतिवृत्तात कबूल करून कंपनीकडून दोन दिवसांत लेखी पत्र देण्याचे आश्वासन दिले यावेळी ता कृ अधिकारी विकास पाटील मंडळ अधिकारी रोशन इंदोरे कृषी अधीक्षक शेख वानखडे इत्यादी कृषी विभागाचे व विमा कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते यावेळी शिवसेनेचे बाळासाहेब राणे प्रकाश मारोटकर निलेश इखार गुणवन्त चांदूरकर चेतन डकरे पवन पुसदकर शुभम सावरकर जयंत सुने प्रमोद डकरे विजय पेटले रितेश जाधव प्रकाश इखार सुरेंद्र गावफळे शाम सुने लीलाधर चौधरी इत्यादी शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# श्याम गवळी यांची भातकुली ग्रामीण मंडळ अध्यक्षपदी निवड

## पूर्णानगरात पुन्हा एक मानाचा तूरा



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पूर्णानगर, दि. २१ :** पूर्णानगर येथील रहिवासी असलेले व भातकुली तालुक्यासोबतच जिल्यातील युवावर्गावर आपल्या व्यक्तीमत्वचा ठसा उमटवणारे सामाजिक कार्यकर्ते श्याम गवळी यांची भारतीय जनता पार्टी च्या भातकुली (ग्रामीण) मंडळ अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. श्याम गवळी हे कृषी क्षेत्रासोबतच अनेक वर्षापासून सामाजिक चळवळीत कार्यरत आहेत तसेच त्यांनी यापूर्वी भाजपा ओबीसी सेलचे भातकुली तालुका अध्यक्ष पदही भूषवले आहे. त्यांचा परिसरात दांडगा जनसंपर्क असल्याने पार्टीने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्यावर भातकुली (ग्रामीण) मंडळ अध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल आमदार राजेश वानखडे, महामंत्री नितीन गुळदे, दत्ता गेडाम, अमरदीप तेलखडे, सोपान गुळदे, अरविंद अकोलकर, शिवानंद पाटील, उमेश भुसारी, धनंजय कोराटे, प्रशांत राऊत, सागर तायडे तसेच राजमाता जिजाऊ बहुउद्धेशीय संस्था पूर्णानगरचे संस्थापक अध्यक्ष तथा लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे अमरावती जिल्हा उपाध्यक्ष संजय सरवटकर यांनी अभिनंदन केले आहे.

# विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यास विरोध कशासाठी?

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २१ :** डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे शैक्षणिक, सामाजिक व कृषी क्षेत्रातील योगदान अतुलनीय होते. ते खरे द्रष्टे पुरुष होते. तळागाळातील माणूस शिकला तर त्याचे सर्वच बाबतीत उत्थान होते. पर्यायाने त्यातून देशासाठी उत्तम नागरिक म्हणून मनुष्यबळ मिळते, अशी त्यांची मांडणी होती. त्यासाठीच त्यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेची निर्मिती केली. त्यांचे नाव अमरावती विमानतळाला देण्यात यावे, अशीच जनभावना आहे. पण, अलीकडच्या काळात कुठल्याही मुद्यावर वाद निर्माण करण्याची प्रथाच जणू पडली आहे.
कृषी क्षेत्रातील भक्कम पाया, कृषी धोरण आणि विचारांची वाटचाल करणारी व्यक्ती म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख (भाऊसाहेब) यांच्याकडे आजही पाहिले जाते. देश स्वातंत्र्य होण्यापूर्वी भारतीय शेती आणि कृषी क्षेत्राला नवे वळण देणारे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्राबरोबरच शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान आहे.
अमरावती विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्याची मागणी जुनी आहे. त्यासाठी भाऊसाहेबांच्या अनुयायांपी पाठपुरावा देखील केला. अमरावती महापालिका आणि जिल्हा परिषदेत यासंदर्भात ठराव देखील पारित करण्यात आले. पण, अमरावती विमानतळ लोकार्पणासाठी सज्ज होत असताना अचानकपणे या विमानतळाला संत गुलाबराव महाराज यांचे नाव देण्याची मागणी पुढे केली जाते आणि वाद उभा केला जातो, हे दुर्देवाचे आहे. ज्यांनी ही मागणी केली, तेही डॉ. भाऊसाहेबांनी लावलेल्या वटवृक्षाचे लाभार्थी आहेत, हे विसरता कामा नये.
मुळात संत गुलाबराव महाराज किंवा डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याची तुलनाच होऊ शकत नाही. त्यांचा काळ वेगवेगळा. क्षेत्रही वेगळे. या दोन्ही महापुरूषांच्या नावाला कुणाचेही विरोध असण्याचे कारण नाही, पण वाद उभा करण्यामागे कोण आहेत, याचाही शोध घेतला पाहिजे. हा वाद जर राजकारणातून केला जात असेल, तर ते अत्यंत धोकादायक आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाला कुणी विरोध केला नसताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नागपूर येथील वर्तुळातून संत गुलाबराव महाराजांचे नाव ऐनवेळी समोर करण्यात आले. या नावाचा प्रस्ताव मांडणारे प्रा. अरविंद देशमुख नावाचे गृहस्थ ब्राम्हण आहेत. त्यांचा डॉ. भाऊसाहेबांच्या नावाला का विरोध आहे, याची विचारणा आता त्यांनाच केली पाहिजे.
अमरावती शहर हे एक सांस्कृतिक शहर म्हणून ओळखले जाते. संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, डॉ. पंजाबराव देशमुख यासारख्या थोरांची कर्मभूमी असलेल्या जिल्ह्याला मोठा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. त्याला डाग लागू नये, ही अमरावतीकरांची इच्छा आहे. संत गुलाबराव महाराज हे दृष्टीहीन होते, तरी ते प्रज्ञाचक्षू होते. ते स्वतःला ज्ञानेशकन्या अर्थात ज्ञानेश्वरांची कन्या मानत. अवघे ३४ वर्ष त्यांचे आयुष्य असले तरी त्यांची ग्रंथसंपदा समजून घेण्याचे सामर्थ्य अनेक विचारवंतांमध्येही


माजी नगरसेवक नितीन देशमुख यांचा सवाल

नाही असे म्हटले जाते. योग, उपनिषद, ब्रम्हसूत्र ध्यान, शास्त्र अशा विविध विषयांवर त्यांनी १३० ग्रंथ लिहिलेत. हे अलौकिक कार्य आहे. त्यांच्या नावे अमरावती जिल्ह्यात भव्य असे आध्यात्मिक संकुल उभारणे, त्यांच्या विचारांचा प्रचार करण्यासाठी संस्था उभारण्याचे काम निश्चितपणे करता येऊ शकेल. पण, त्यांचे नाव समोर करून डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाला विरोध करणारे कोण आहेत, याचाही विचार झाला पाहिजे. रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ उभारण्यात येत आहे. या विद्यापीठाला त्यांचे नाव दिल्यास तो त्यांच्या कार्याचा सन्मानही ठरू शकेल. यावर निश्चितपणे विचारवंतांनी प्रकाश टाकायला हवा, पण डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाला विरोध करणे चुकीचे असल्याचे माजी नगरसेवक तथा रंगोली ग्रुपचे संचालक नितीन देशमुख यांनी म्हटले आहे.
यासंदर्भात त्यांनी म्हटले आह की महाराष्ट्रातील प्रादेशिक समतोल साधत वसंतराव नाईक यांच्या सरकारने अकोला येथे २० ऑक्टोबर १९६९ साली कृषी विद्यापीठ स्थापन केले. या विद्यापीठास डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात आले आहे.
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची स्थापना विदर्भातच व्हावी याकरिता १९६८ साली आंदोलन उभारण्यात आले होते. या आंदोलनातील सहभागी आंदोलकांनी २० ऑगस्ट रोजी अमरावती येथे उग्र निदर्शन केली. विद्यापीठ आंदोलकांना रोखण्यासाठी झालेल्या गोळीबारात ९ जणांना प्राण गमवावा लागला होता. याची आठवण अनेकांना आहे. त्यामुळे अमरावतीत त्यांच्या नावे भव्य वास्तू असावी, अशी अपेक्षा करणे गैर नाही.
पंजाबराव देशमुख हे केंद्रीय कृषीमंत्री असताना नवी दिल्ली येथे भव्य दिव्य अशा जागतिक कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. ११ डिसेंबर १९५९ ते फेब्रुवारी १९६० या दरम्यान अंदाजे १०० एकर जागेत हे प्रदर्शनाचे नियोजन करण्यात आले होते. कृषी प्रदर्शन भारताच्या कृषी क्रांतीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरले होते. देशाच्या कानाकोपऱ्यातून शेतकऱ्यांनी हे प्रदर्शन पाहण्यासाठी हजेरी लावली होती. एक नवा क्रांतीचा विचार घेऊनच शेतकरी परतत होते.
जवळपास २ कोटी शेतकऱ्यांनी या कृषी भेट दिल्याचे बोलले जाते. आधुनिक काळात प्रेरणास्त्रोत ठरलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव अमरावती विमानतळाला देणे त्यामुळे औचित्यपूर्ण ठरणार आहे. असे माजी नगर सेवक नितीन देशमुख (९८९००९८७८७) यांनी म्हटले आहे.

# थोडक्यात

## रामकृष्ण कॉलनी येथे विश्वमांगल्य सभा



**मोर्शी :** मोर्शी येथे रामकृष्ण कॉलनी स्थित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मंदिर सभागृहात दि. १८ एप्रिल २०२५ रोजी ''विश्वमांगल्य सभा'' बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून तेजसाताई जोशी विश्वमांगल्य पदाधिकारी,डॉ.सौ. वसुधाताई अनिल बोंडे उपस्थित होत्या. सर्वप्रथम उपस्थित अतिथींच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ''विश्वमांगल्य सभा''ही महिलांची एक राष्ट्रीय संघटना आहे.भारतीय संस्कृतीचा आत्मा आपली कुटुंब व्यवस्था आहे.या कुटुंबाचा मुख्य आधार आणि केंद्रबिंदू प्रत्येक घराची आई आहे.विश्वमांगल्य सभेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सशक्त,सुसंस्कृत, कुटुंबाभिमुख,हुशार महिला आणि माता निर्माण करणे ज्यांना राष्ट्र आणि धर्मावर गाढ श्रद्धा आहे.असे ''विश्वमांगल्य सभा''चे उद्दिष्ट असल्याचे यावेळी बैठकीला मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या तेजसाताई जोशी व डॉ.सौ वसुधाताई अनिल बोंडे यांनी केले.यावेळी विदर्भ कार्यालय प्रमुख रश्मीताई इतकीकर, जिल्हा सरचिटणीस प्रतिभा मोहन राऊत, शहर सरचिटणीस अनिता मनोज लांजेवार, शहर अध्यक्ष शिलाताई धावडे,सुनंदाताई लाडविकर,रेश्माताई नितिन उमाळे,कविता ठाकरे,सुनिता कोहळे, संगीता तायडे,शारदा खाजोने,मायाताई वानखडे,कविता बनसोड,श्रेया संजय काळे,जयश्री काकडे, सुमंगला श्रीराव, राजकन्या मोहने, कल्पना कडू,उषाताई अढाऊ,स्वेता राऊत, शितल गेडाम,आशा ठाकरे,रंजनाताई, रोशनी निकम,प्रियंका जकाते,विजया अंधारे, पुनम मोहड,अनुराधा मानकर,सपना बर्थ, प्रतिभा फुनसे यासह मोठ्या प्रमाणात महिलांची उपस्थिती होती.

## रुग्णांना फळे व बिस्किटाचे वाटप



**मोर्शी :** लहान मुलीचा वाढदिवस चक्क रुग्णांना फळे व बिस्किटांचे वाटप करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला. समाजाचे आपणही काहीतरी देणं लागतं हा उद्देश समोर ठेवून सामाजिक कार्यकर्ते तथा रक्तदाता संघाचे सचिव कृष्णा वाघमारे यांनी आपली मुलगी कु.सावनी हिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून २० एप्रिल रोजी उपजिल्हा रूग्णालय येथे भरती असलेल्या रुग्णांना व रूग्णाच्या नातेवाईकांना फळ व बिस्किटाचे वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार, वैद्यकीय अधिकारी डॉ.सचिन कोरडे,अधिपरिचारीका मिनाक्षी वगारे, वर्षाताई दारोकार,प्रणीता अंबाडकर,स्नेहल बेहरे, भुषण कोकाटे,सुजित वानखडे, दिनेश पोके, प्रशांत ठोंबरे,कृष्णा वाघमारे,भाजपा सरचिटणीस अनितताई लांजेवार, सुलोचना साठवणे यासह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते.

## भक्तिधाम चांदूरबाजार येथे बाल सुसंस्कार शिबिर

**अमरावती :** संत श्री गुलाबराव महाराज भक्तिधाम चांदूरबाजार येथे २ मे ते २० मे दरम्यान बाल सुसंस्कार शिबिर संपन्न होणार आहे, यामध्ये सकाळच्या सत्रामध्ये रोज सकाळी ६ वाजता पासून काकडा भजन, योगासन व प्राणायाम, स्वामतनिर्णाय, चितोपदेश, महाराजांची बाराखडी, साधुबोध , महाराजांचे चरित्र, ज्ञानेश्वरी व गीतापाठ या ग्रंथांवरील अभ्यास. तसेच दुपारच्या सत्रामध्ये गायन, टाळ, मृदुंग, वैष्णव नर्तन व हरिपाठ व सायंकाळच्या सत्रामध्ये व्याख्यान व मार्गदर्शन संपन्न होणार आहे. शिबिरामध्ये ह. भ. प. श्री श्रीधर महाराज आवारे, रामदास महाराज राजगुरू, गणेश महाराज गिरी, संजयभाऊ अढाऊ, शंकरराव लव्हाळे, ज्ञानेश्वर महाराज गुल्हाने, श्रीकांत भुसकडे, गिरीश शहाणे, पांडुरंग ठाकरे, वैष्णव अढाऊ ,संकेत गायकी, श्रीकांत चौधरी, महेश बोबडे, हरीश गोबाडे, संजय कोंडे, मनोहर कायटे,व ज्ञानोदय विद्या मंदिर येथील शिक्षक व शिक्षिका या शिबिराला मार्गदर्शन व प्रशिक्षण देणार आहे. तरी परिसरातील वर्ग १ ते १० पर्यंत शिकणाऱ्या सर्व मुलांना स्वतःचे अंथरुण, चादर, ताट, वाटी, प्याला, वही, पेन आदी साहित्य घेऊन दिनांक २ तारखेला ज्यांचा प्रवेश निश्चित झाला त्यांना सकाळी १२ वाजेपर्यंत भक्तिधाम येथे पोहचायचे आहे. या वर्षी संस्थेने प्रथम येणारे, व संस्थेने ठरवून दिलेल्या अटी व शर्ती चे पालन करणारे फक्त १०० विद्यार्थ्यांनाच शिबिरात घ्यायचे ठरविले आहे, तरी ३० एप्रिल पर्यंत विद्यार्थी व पालकांनी भक्तिधाम कार्यालय चांदूरबाजार येथे येऊन आपला प्रवेश निश्चित करावा, त्यानंतर येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही याची नोंद घ्यावी, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष रवींद्र इंगोले यांनी दिली.

## निधन वार्ता

### विजयसिंह गौर

**अमरावती :** महाकाली माता प्रतिष्ठानचे पिठाधिश्वर श्री शक्ती



महाराज यांचे पिता विजयसिंह गौर यांचे रविवारी (दि.२०) रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते. सोमवारी सकाळी ११ वाजता अंबाविहार महालक्ष्मी नगर अमरावती येथून त्यांची अंत्ययात्रा निघाली.त्यांच्यावर स्थानिक हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार पार पडले.त्यांच्या निधनाने कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

# शिक्षक बदल्याकरिता विभाग सज्ज

## नियोजनाकरिता नऊ सदस्य समितीचे गठन, अडचणीच्या निराधार करिता वार रूम

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २१ :** शाळांची उन्हाळी सुट्टी लागल्यानंतर मे महिन्यात शिक्षक बदल्यांची धूम जिल्ह्यात सुरू होणार आहे. याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. तसेच बदल्यांच्या नियोजनाकरिता नोडल अधिकारी म्हणून उपशिक्षणाधिकारी यांच्या नेतृत्वात नऊ सदस्य समितीचे गठन करण्यात आले आहे. याशिवाय बदल्याबाबत शिक्षकांच्या समस्या सोडवण्याकरता वार रूम देखील सुरू करण्यात आले आहे.

दरवर्षी शिक्षक बदल्यावर अनेक शिक्षकाकडून अक्षय घेतले जातात. याशिवाय अनेक शिक्षक न्यायालयात गेल्याने यापूर्वीची प्रक्रिया देखील रखडली होती. त्यामुळे यावेळी शिक्षण विभागाकडून जिल्हा अंतर्गत बदल्या बाबत सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. मे पासून प्रत्यक्षात बदली प्रक्रियेला सुरुवात होणार असून याकरिता नऊ सदस्य समितीचे गठन करून त्यांना बदल्याबाबत विविध कामांचे वाटप देखील करण्यात आले आहे. बदली प्रक्रिया राबवण्याबाबतची कारवाई विहित वेळेत करण्याकरिता वार रूम सुरू करण्यात आली आहे. यामध्ये नोडल अधिकारी म्हणून उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली असून समितीमध्ये अधीक्षक अश्विनी पवार गटशिक्षणाधिकारी गंगाधर मोहने सहाय्यक प्रशासक अधिकारी संजय मुंडे कनिष्ठ अधिकारी प्रवीण जिसकार वरिष्ठ सहाय्यक विजय मालोकार कनिष्ठ सहाय्यक विश्वनाथ तपासे गिरीश देशमुख प्रवीण बोरकर यांचा समावेश आहे. या समितीमधील सदस्यांना विविध कामाचे वाटप केले आहे. अपील निकाली काढणे, बदली प्रक्रियेच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे, बदली विषयक ऑनलाईन संगणकीय कामकाज करणे, आस्थापना विषयी कामकाज शिक्षकांच्या प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने शिक्षकांची माहिती अद्यावत करणे आदी विविध कामांचा समावेश आहे. या समितीला कारणीन सुट्टीच्या दिवशी बदली संदर्भात कामकाज करावे लागणार आहे तसेच बदली प्रक्रिया करिता पूर्ण वेळ कामकाज सुरू राहील असे निर्देश शिक्षणाधिकारी डॉक्टर अरविंद मोहरे यांनी दिले.

### असे आहे बदल्यांचे वेळापत्रक

२१ एप्रिल रोजी समानीकरणाअंतर्गत रिक्त पदे निश्चित करणे, २८ एप्रिल ला स्वर्ग एक मधील शिक्षकांच्या रिक्त जागा घोषित करणे, चार मे रोजी संवर्ग दोन मधील शिक्षकांसाठी रिक्त जागा घोषित करणे व पसंती क्रम भरविण्याकरिता वेळ देणे व त्यानंतर बदली प्रक्रिया राबविणे, पाचव्या टप्प्यात १६ मे रोजी शिक्षकांच्या जागा घोषित करून बदली प्रक्रिया राबविणे व त्यानंतर २२ मे रोजी विस्थापित शिक्षकांच्या बदल्या तर २८ मे रोजी अवघड क्षेत्रातील रिक्त जागा भरल्या जाणार आहे. अशी माहिती शिक्षण विभागाकडून प्राप्त झाली आहे.

# धारणी उपविभागात काही दिवस वीज पुरवठा बंद

## कडा उपकेंद्रावर पॉवर ट्रान्सफार्मर क्षमतेत वाढ



अजिंक्य भारत । भारत वरठे

**धारणी, दि. २१ :** उपविभाग अंतर्गत ३३ केव्ही कढाव उपकेंद्राम ध्ये येथे सध्या कार्यरत असलेल्या ५ एमवीएच्या पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढवून १० एमवीएचा नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे महत्वाचे काम सोमवार, २१ एप्रिलपासून ते शनिवार, २६ एप्रिलपर्यंत चालणार आहे.

या कालावधीत फक्त एका ५ च्या पॉवर ट्रान्सफॉर्मर वरून पुरवठा असणार असल्यामुळे सध्या सुरू असलेल्या भारनियमनात अधिक वाढ होणार असून अनेक गावांम ध्ये वीज पुरवठा काही वेळासाठी खंडीत करण्यात येणार आहे. वीज पुरवठ्यावर होणारा परिणाम सर्व ११ केवी. वाहिन्यांवर सध्या सुरू असलेल्या भारनियमनापेक्षा जास्तीचे भारनियमन करावे लागणार असल्यामुळे ११ हरीसाल फिडर वरील राणीग्राम, लवादा, कोलूपुर, चित्री, बोरी, हरीसाल, रोरा, मांगिया, कोलकास, पिली, सेमाडोह, चिखली,केशरपुर, भेरोजा, केली, कारा, कोट, नांदुरी, कोठा, सोसोखेडा, जांभू, बोथरा, पाटको, तारुबंधा. ११ पाटीया फिडर वरील कढाव, उतावली, पोहरा, गोबरकहू, काकरमल, कारदा, चिपोली, पोटीलावा, पाटिया, हातनंदा, चौराकुंड, फॉरेस्ट मालूर. ११ दुनी फिडर वरील इनी ढाना, इनी बाजार ढाना, दिदम्बा, भुलोरी, भैरदाबल्डा, राणामालूर आणि आजू बाजूच्या परिसरातील वीज पुरवठा प्रभावित होईल. कार्यकारी अभियंता, अचलपूर यांनी कळविले आहे.

# शिक्षण मंत्र्यांसोबत प्राथमिक शिक्षक समितीची बैठक

## प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी डॉ. नितू गावंडे यांची उपस्थिती


अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती दि.२१ :** शालेय शिक्षण राज्यमंत्री ना. डॉ. पंकजभाऊ भोयर यांनी निमंत्रित केल्यानुसार महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती प्रतिनिधींसह बैठक सोमवारी (२१ एप्रिल) निर्धारित वेळेवर वर्धा येथे संपन्न झाली. यावेळी राज्यस्तरीय विविध (प्रत्येक) प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. मंत्री महोदयांनी सर्व प्रश्न आस्थेने समजून घेऊन संबंधित आस्थापनांकडे केले आणि गांभीर्याने पाठपुरावा करण्याबाबत आश्वस्त केले. या वेळी संचमान्यता शासन निर्णय १५ मार्च २०२४ रद्द करणेबाबत. शिक्षण सेवक पद रद्द करणेबाबत. (मानधन वाढ करणे. शिक्षण सेवक अर्हताकारी सेवा कालावधी कमी करणे. ग्रामीण भागातील



शिक्षकांच्या मुख्यालय व घरभाडे भत्ता बावत. पदवीधर शिक्षक वेतनश्रेणी सर्व पदवीधरांना लागू करणे. सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटी दूर करणे. वस्ती शाळा शिक्षकांची मूळ नियुक्ती तारीख ग्राह्य धरून आवश्यक लाभ देणे. नपा/मनपा शिक्षकांच्या वेतनासाठी १००% अनुदान शिक्षण विभागाने अदा करून शालार्थ प्रणाली लागू करावी. अशैक्षणिक/दैनंदिन अध्यापनावर विपरीत परिणाम करणारी कामे बंद करणे. शाळेतील जीर्ण वस्तूंचे निर्लेखन करणे. शिक्षकांच्या बदली प्रक्रियेबाबत.तसेच वर्धा जिल्हास्तरीय प्रश्नांच्या कालबद्ध सोडवणुकीसाठीचे निर्देश व अहवाल सादर करण्याच्या सूचना संबंधितांना यावेळी राज्यमंत्री शालेय शिक्षण मंत्री यांनी दिल्या. यावेळी राज्याध्यक्ष विजय कोंबे, जिल्हा नेते रामदास खेकारे, जिल्हाध्यक्ष अजय बोबडे, सरचिटणीस श्रीकांत अहेरराव, ज्येष्ठ बांधव प्रदीप मसने, वर्धा तालुकाध्यक्ष राजेश महाबुधे, सेलू तालुकाध्यक्ष किशोर कामडी, जिल्हा कार्यालयीन चिटणीस प्रशांत निंभोरकर, वर्धा तालुका पदाधिकारी रविंद्र लवणे आदी उपस्थित होते.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले.

# बाबुजी, तुम्ही शतायुषी व्हा!



**आ**ज दिलीपबाबूजी इंगोले, कोषाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांचा ७५ वा वाढदिवस, या अमृत महोत्सवी दिनानिमित्त बाबूजींना मन:पूर्वक शुभेच्छा!

एप्रिल महिन्याची २२ तारीख उजाडली आणि इंगोले परिवारात एका बालकाने जन्म घेतला. आई इंदूबाई आणि वडील भगवंतराव यांचे हे अपत्य, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा आशिर्वाद घेऊनच जन्माला आले असावे का असा प्रश्न पडतो. कारण एकच ते म्हणजे त्यांची श्री शिवाजी शिक्षणसंस्थेप्रती असलेली आत्मियता, मनस्वी स्वीकारलेली बांधिलकी. श्री शिवाजी शिक्षणसंस्थेप्रती मनापासून असलेली ओढ त्यांच्या कार्यातून दिसून येते. नव्हे हृदयाच्या आरशातून प्रतिबिंबीत झालेले संस्थेप्रती असलेल्या आदराचे, जाणीवेचे प्रतिबिंब त्यांच्या संस्थेप्रती विकासाच्या तळमळीतून दिसते.

शिवपरिवारातील असाच हा एक खंदा शिलेदार, दिलीपबाबू इंगोले यांचा आज वाढदिवस. शिक्षण क्षेत्रात राज्यशास्त्रात स्नातकोत्तर पदवी प्राप्त केली असली तरी त्यांच्या कार्यात 'राजकारण' कधी डोकावले नाही. मला आश्चर्य वाटते. आजही त्यांची ओळख दिलीपबाबू अशीच आहे. त्यांची वृत्ती बालकासारखीच निर्मळ म्हणून त्यांच्या नावापुढचे 'बाबू' खरेच सार्थ ठरते. दिलीप बाबू इंगोले म्हणजे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकार व क्रीडा या क्षेत्रात कार्यरत असलेले एक बहुआयामी व्यक्तीमत्व, उत्कृष्ट क्रीडा संघटक म्हणून राज्य शासनाच्या अत्यंत प्रतिष्ठेचा 'शिव छत्रपती' पुरस्काराने ते सन्मानित, महाविद्यालयीन जीवनापासून राजकारणात सक्रिय, अमरावती जिल्हा महाराष्ट्र विद्यार्थी काँग्रेस, अमरावती जिल्हा एनएसयुआयचे सचिव म्हणून व महाराष्ट्र एनएसयुआयचे राज्य कार्यकारिणी सदस्य म्हणून त्यांचे कार्य मोठे आहे. अमरावती जिल्हा ग्रामिण राष्ट्रीय काँग्रेसचे महासचिव, जिल्हा युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष व अमरावती शहर ब्लॉक काँग्रेसचे सचिव, सहकार क्षेत्रातील अतिशय प्रतिष्ठित अशा डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑफ बँकेचे संचालक, उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून त्यांनी बराच काळ कार्य केले. बँकेच्या जळणघडणीत त्यांचे मोलाचे योगदान आहे. आजही ते दि. ३१ डिसेंबर २०१९ रोजीचे रिजर्व बँकेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑफ बँक, अमरावती येथे गठित केलेल्या व्यवस्थापकीय समितीचे ते अध्यक्ष आहेत. अशा विविध क्षेत्रात कार्यरत असूनही मैदानी खेळ हा त्यांच्या जिवनाचा अविभाज्य भाग आहे. व्हॉलीबॉल या खेळाच्या विकासासाठी सतत प्रयत्नशिल राहून क्रीडा क्षेत्रात नैपुण्य मिळावे या करीता विद्यार्थ्यांना नेहमी प्रोत्साहित करीत असतात. स्थानिक, राष्ट्रीय स्तरावरसुध्दा त्यांचे कार्य आहे. अंबापेठ स्पोर्टींग क्लबचे १९७० पासून महासचिव, अमरावती जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे उपाध्यक्ष व विद्यमान अध्यक्ष म्हणून कार्यरत, महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेचे उपाध्यक्ष व प्रमुख महाराष्ट्र ऑलीम्पीक संघटनेचे कार्यकारी सदस्य, महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्ष व अखिल भारतीय व्हॉलीबॉल चमूचे उपाध्यक्ष म्हणून आजही व्हॉलीबॉलच्या विकासासाठी कार्यरत, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य म्हणून कार्य करतानाच श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारीणी सदस्य व उपाध्यक्ष म्हणून कार्य केल्यानंतर सद्या ते २०१७ पासून संस्थेचे कोषाध्यक्ष या पदावर काम करित असतांना संस्थेच्या हिताच्या दृष्टीने उत्कृष्टरित्या काम सांभाळीत आहे.

माणूस जेव्हा जन्माला येतो तेव्हा जन्माबरोबरच नियमित त्याच्या निहित कर्तव्याची गाठ त्यांच्या आयुष्याशी बांधली असते. करता- करविता एक अज्ञात अशी शक्ती ज्याला आपण परमेश्वर म्हणतो तेच हे सर्व आपल्या हातून घडवितो असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा त्या विश्वव्यापक शक्तीला विसरुन कसे चालेल. म्हणूनच की काय शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात अत्यंत जबाबदारीची पदे सांभाळत असले तरी धार्मिक क्षेत्राकडेही दिलीपबाबूचे दुर्लक्ष झालेले नाही. कुंड सर्जापूरचे मुळ रहिवासी असलेल्या इंगोले घराण्यातील दिलीपबाबू कुंड सर्जापूरातील श्रीराम मंदिर देवस्थानचे अध्यक्ष आहेत.

अशी अनेक महत्वाची व जबाबदारीचे पदे सांभाळत असतांनाही सर्वच कामांना न्याय देण्याची त्यांची वृत्ती पाहिली की मन थक्क होते. यात गैर असे काहीच नाही. आज सर्व भौतिक सुखांचा, सुकाळ आहे. पण दुष्काळ आहे तो 'माणसांचा' म्हणूनच दिलीपबाबू सांरखे कर्तव्याप्रती प्रामाणिक असलेले व्यक्तीमत्व जनमानसात विशिष्ट स्थान मिळवतात माणूस घडतो तो संस्कारांनी आणि जो संस्कारीत आहे त्याचा ठसा त्यांच्या कार्यावर पडतोच. शिवपरिवारात असलेल्या नवरत्न दरबारातील दिलीपबाबू इंगोले म्हणजे स्पटीकासारखे निर्मळ व्यक्तीमत्व.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त हा लेखन प्रपंच ज्याना शिवसंस्थेप्रती अशी मनस्वी आस्था आहे, संस्थेच्या प्रगतिचा ध्यास आहे, त्यांच्या बाबत दोन शब्द लिहून लेखनीनेही धन्य व्हावे, अशा योग्यतेची ही मानसे. त्यांना निरामय आणि उदंड आयुष्य लाभो हीच प्रभू चरणी प्रार्थणा पुन्हा एकदा बाबूजींना ७५ व्या वाढदिवसानिमित्त व अमृत महोत्सवानिमित्त अनंत कोटी शुभेच्छा.

**संजय भोकसे**
अंकेक्षक तथा मा. कोषाध्यक्ष
यांचे स्विय सहाय्यक
श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती.

# उर्गेन संघरक्षित इंटरनॅशनल स्कूल संस्थापक तथा शिक्षक कर्मचाऱ्यांची भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी शाळेला भेट

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २१ :** नागसेन ज्ञान प्रसारक मंडळ द्वारा संचालित आनंद प्राथमिक शाळा, आनंद माध्यमिक विदयालय तसेच उर्गेन संघरक्षित इंटरनॅशनल स्कूल येथील संस्थापक तथा शिक्षक कर्मचाऱ्यांनी भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा साखरा, वाशिम येथे नुकतीच शैक्षणिक भेट दिली. भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येथील मुख्याध्यापकअंबादास कऱ्हे सर व इतर शिक्षक कर्मचाऱ्यांनी नागसेन ज्ञान प्रसारक मंडळ अध्यक्ष धम्मचारिनी पद्ममनी हिरा




रक्षित मॅडम तसेच आनंद माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक धम्मचारी रत्नराज संदीप रक्षित सर तसेच उर्गेन शाळेच्या मुख्याध्यापिका प्रविणा चिंचोळे व सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांचे स्वागत केले. शाळेमधील विद्यार्थ्यांमध्ये जिद्द व चिकाटी असल्यास व गुणवत्ता निर्माण करायची असल्यास भौतिक सुविधांचा मुद्दा हा महत्त्वाचा ठरतच नाही याची जाणीव साखरा येथील शाळेला भेट देऊन निदर्शनास आले. जिल्हा परिषद शाळा व विद्यार्थी बद्दल जेव्हा विचार करतो तेव्हा जेमतेम पटसंख्या, सध्या वर्ग खोल्या, हाय प्रोफाईल शाळेमध्ये मुलांपेक्षा कमी हुशार विद्यार्थी असा दृष्टिकोन आपला ठरलेला आहे. परंतु आम्हा सर्व शिक्षकांना साखरा येथील शाळेने जिल्हा परिषद शाळेकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलायला भाग पाडले.

सकाळी ५ वाजता शाळेला भेट देण्याकरिता आम्ही सर्व शिक्षक कर्मचारी निघालो व सकाळी सात वाजता साखरा येथील शाळेत पोहोचलो. शाळेत शिरताच आम्ही बघितले की काही मुले वर्ग तर काही मुले वर्गा बाहेरील परिसर, तर काही मुले पिण्याच्या पाण्याचे ठिकाण स्वच्छ करत होते. परिपाठाकरिता विद्यार्थी रांगेमध्ये उभे राहोतोपर्यंत राजू महाले सरांनी सामान्य ज्ञानाचा प्रश्न उत्तरे विचारण्यास सुरुवात केली. उत्तर सांगण्याकरिता १० नव्हे २० नव्हे तर उपस्थित सर्वच मुलांचे हात वरती होते.

परिपाठामध्ये रांगेत उभे राहण्यापर्यंतचा जो वेळ असतो त्या वेळेचा सदुपयोग राजू महाले सरांनी सामान्य ज्ञानाचे प्रश्न विचारण्यासाठी केला. परिपाठाबद्दल सांगावाचे झाल्यास मुलींनी कणखर आवाजामध्ये व आत्मविश्वासाने आपला परिपाठ सादर केला.

जुन्या शाळेच्या परिसरात गेल्यानंतर तेथील संतोष आमले सरांनी त्या शाळेचा रोपट्याला वटवृक्षात कशाप्रकारे रूपांतरित केले हे सांगितले शाळेची स्थापना २००८ साली झाली. लोकसहभागातून व शिक्षक वर्गणीतून पुढे शाळा वाढत गेली व वर्गही वाढत गेले. आज तिथे प्री प्रायमरीला तब्बल ४३९ विद्यार्थी आहेत. वर्ग एक ते वर्ग नऊ मध्ये ९५० विद्यार्थी आहेत. त्यानंतर तेथे चालू असलेला ५ व्या वर्गाच्या नवोदय व स्कॉलरशिप परीक्षेची तयारी करून घेत असतानाच्या वर्गखोलीत दाखल झाल्यानंतर त्या पाचव्या वर्गाच्या विद्यार्थ्यांचा गणित सोडविण्याचा वेग बघून आम्ही सर्व विस्मित झालो.

## घटना-घडामोडी

### भाजपा तालुकाध्यक्षपदी प्रदीप सवळे, शहराध्यक्षपदी अभय इंगळे




**दिग्रस :** भारतीय जनता पार्टीच्या दिग्रस तालुकाध्यक्षपदी प्रदीप सवळे तर शहराध्यक्षपदी अभय इंगळे यांची निवड करण्यात आली आहे. भाजपा निरीक्षक घनश्याम वानखडे व विलास कवाणे यांनी रविवारी (दि. २०) ही कार्यकारिणी जाहीर केली. सवळे आणि इंगळे हे पक्षाचे सक्रिय सदस्य असून, वयाच्या अटीत बसल्याने त्यांची सर्वानुमते निवड झाली आहे. या निवडीनंतर स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौकात भाजपा कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष केला. नवनियुक्त अध्यक्षांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. अभय इंगळे हे पत्रकार म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांच्या निवडीबद्दल शहरातील मान्यवरांसह विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. या निवडीमुळे पक्ष संघटनेला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आगामी काळात पक्ष वाढीसाठी आणि संघटनात्मक बांधणीसाठी नव्या पदाधिकाऱ्यांसमोर मोठे आव्हान असणार आहे. पक्षाने युवा नेतृत्वाला संधी दिल्याची चर्चा आहे.



### शिक्षण ही देशाच्या भविष्यासाठी गुंतवणूक आहे, खर्च नव्हे - डॉ. विघे

**घाटंजी :** शिक्षण ही देशाच्या भविष्यासाठी गुंतवणूक आहे, खर्च नव्हे, असे प्रतिपादन डॉ. प्रशांत विघे यांनी केले. येथील एस.पी.एम. महाविद्यालयात 'शिक्षण व्यवस्थेतील बदलता प्रवाह आणि आव्हाने' या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीतील आव्हाने आणि शासनाच्या भूमिकेवर त्यांनी सविस्तर भाष्य केले. डॉ. विघे म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरण चांगले असले तरी शिक्षक भरतीतील रिक्त जागा, निधीची कमतरता यामुळे अंमलबजावणी कठीण आहे. अध्यक्ष प्राचार्य डॉ. शहजाद यांनी शिक्षकांचे प्रभावी प्रतिनिधित्व आवश्यक असल्याचे सांगितले. डॉ. धर्मेंद्र तेलगोटे यांनी भ्रष्टाचारमुक्त, समाजपरिवर्तनाचा ध्यास असलेल्या नेतृत्वाची गरज व्यक्त केली. शिक्षकांचे प्रश्न सभागृहात प्रभावीपणे मांडले जात नसल्याने समस्या वाढल्याचेही डॉ. विघे म्हणाले. धोरण यशस्वी करण्यासाठी शासन, शिक्षक, पालक, विद्यार्थी व समाजाचा समन्वय आवश्यक आहे. डॉ. विवेक जगताप यांनी संचालन, तर डॉ. राऊत यांनी आभार मानले. परिसंवादास प्राध्यापक, शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते.

### नव्याने बांधलेल्या रस्ता दुभाजकाची दुरवस्था

**पुसद:** शहरातील फुना ते बाना या मुख्य सिमेंट रस्त्यावरील नव्याने बांधलेल्या दुभाजकाची अल्पावधीतच दुरवस्था झाली आहे. थातुरमातुर बांधकाम आणि अनेक ठिकाणी नागरिकांनी सोयीसाठी तोडलेल्या जाळ्या यामुळे हे दुभाजक आता अपघातांना निमंत्रण देत आहे. यामुळे दररोज छोटे-मोठे अपघात घडत असून, नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. रस्ता रुंदीकरणाऐवजी अरुंद झाला, बांधकाम अपूर्ण आहे, नाले अर्धवट आहेत आणि दुभाजकातील झाडे गायब झाली. तोडलेल्या दुभाजकांमुळे पादचारी व वाहने अचानक रस्त्यावर येतात, ज्यामुळे जीवघेणे अपघात होत आहेत. यात अनेकांना प्राण गमवावे लागले आहेत. संबंधित अधिकारी हे उघड्या डोळ्यांनी पाहूनही दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत आहे. हे तुटलेले दुभाजक दुरुस्त होणार का? दोषींवर कारवाई होणार का? की निरपराध्यांचे बळी जातच राहणार? याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

### विशेष जनसुरक्षा विधेयक रद्द करण्याची मागणी

**यवतमाळ:** विशेष जनसुरक्षा विधेयक रद्द करण्याच्या मागणीसाठी २२ एप्रिल रोजी यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार आहे. भारत जोडो अभियानाचे जिल्हा समन्वयक उत्तमराव खंदारे यांच्या नेतृत्वाखाली सकाळी साडेअकरा वाजता हे निवेदन दिले जाईल. जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समितीच्या माध्यमातून विविध संघटना या आंदोलनात सहभागी होणार आहेत. या विधेयकामुळे नागरिकांचे अधिकार धोक्यात येत असल्याचा आरोप करत, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही निवेदन पाठवण्यात येणार आहे. या आंदोलनात भारतीय लोकशाही अभियान, किसान अधिकार अभियान, माकप, भाकप, काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट), आप, शिवसेना, आरपीआय, संभाजी ब्रिगेड, भीम आर्मी, आदिवासी विकास परिषद, मुस्लिम सोशल फोरम, ओबीसी संघटना, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, एमआयएम, कामगार संघटनांसह अनेक सामाजिक व राजकीय पक्ष सहभागी आहेत. हे विधेयक रद्द होईपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला आहे.

## निधन वार्ता

### विशाल गाबडा



**यवतमाळ :** येथील ओमप्रकाश जनरल स्टोर्सचे संचालक विशाल लिलारामजी गाबडा यांचे मातोश्री व कपिल महेश कुमार गाबडा यांच्या आजी सुमित्रादेवी लिलारामजी गाबडा (वय ८०) यांचे वृध्दपकाळाने निधन झाले. त्यांचे मागे एक मुलगा, एक मुलगी व बराच मोठा आप्त परीवार आहेत. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# महिलांच्या सक्षमीकरणाचा बोजवारा!

## बचत गटांच्या महिला अडकल्या मायक्रो फायनान्सच्या जाळ्यात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ सागर भगत

**यवतमाळ, दि. २१ : जिल्ह्यात तब्बल ४९ हजार ६३६ बचत गट कार्यरत आहेत. असे असले तरी महिला सक्षमीकरणाच्या या व्यापक प्रयत्नांना खासगी मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या शोषणाने गालबोट लागत आहे. हजारो महिला आर्थिक प्रवाहात आणण्याचा उद्देश असताना, अवाजवी व्याजदर आणि वसुलीच्या अमानुष तगाद्यामुळे अनेकजणी कर्जाच्या दृष्टचक्रात अडकत असल्याचा गंभीर बाबत समोर येत आहे. प्रशासकीय उदासीनता याला खतपाणी घालत असल्याची आता चर्चा होत आहे.**



जिल्ह्यात महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा मध्यवर्ती, सहकारी बँक आणि इतर यंत्रणांमार्फत बचत गटांचे मोठे जाळे विणण्यात आले आहे. जिल्ह्यात एकूण ४९ हजार ६३६ बचत गट कार्यरत आहे. त्यात यवतमाळ तालुक्यात ४८१५, बाभुळगाव २०९१, कळंब ३२५४, दिग्रस २१६८, पुसद ४७२७, उमरखेड ४०००, महागाव ३८२८, आर्णी ३०८१, घाटंजी २३६६, केळापूर २२५१, राळेगाव ३१०६, मारेगाव २९७६, झरी जामणी १६४८, वणी ३५७९, दारव्हा ३४७२, आणि नेर तालुक्यात २२७४ बचत गट आहेत. त्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे १३ हजार ३९६ बचत गट आहेत. तर नागरी ३५२, महिला आर्थिक विकास महामंडळ चार हजार १९३, शेतकरी बचत गट पाच हजार २१६ एवढे आहे. एवढ्या मोठ्या संख्येने कार्यरत गटांच्या माध्यमातून महिला आर्थिक व्यवहारांसाठी आणि उद्योजकतेसाठी पुढे येत असल्या तरी, अनेक ठिकाणी हेच बचत गट खासगी मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या वसुली चक्रात अडकल्याचे विदारक चित्र समोर येत आहे. या कंपन्यांकडून होणारी संभाव्य पिळवणूक, अवाजवी व्याजदर आणि वसुलीसाठी वापरल्या जाणाऱ्या आक्रमक व अमानुष पद्धतींमुळे महिला सक्षमीकरणाऐवजी कर्जाच्या खाईत ढकलल्या जात आहेत. प्रशासकीय यंत्रणा (उदा. सहाय्यक निबंधक, डीआरडीए, एमएव्हीआयएम) या खासगी कंपन्यांच्या कामकाजावर आणि त्यांच्याकडून होणाऱ्या शोषणावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात अपयशी ठरत असल्याचा थेट आरोप होत आहे. केवळ गट स्थापनेचे उद्दिष्ट न ठेवता, त्यांच्या आर्थिक सुरक्षेची आणि संरक्षणाची जबाबदारी प्रशासनाने स्वीकारण्याची गरज आहे.

### कर्ज मंजुरीतील फसवणूक

अनेकदा, गरजू महिलांना सहज कर्ज देण्याच्या नावाखाली काही मायक्रो फायनान्स कंपन्या कथितरित्या अवास्तव व्याजदर आणि छुपे शुल्क आकारतात. कर्जाच्या किचकट अटी व शर्तींमुळे महिलांना कर्जाच्या एकूण भाराची पूर्ण कल्पना येत नाही. गटातील महिलांना एकत्र किंवा एका कर्जावर दुसरे कर्ज घेण्यास प्रवृत्त करून नकळतपणे कर्जाच्या सापळ्यात अडकवले जाते. गरजेपेक्षा जास्त कर्ज देऊन अनावश्यक खर्चालाही प्रोत्साहन दिले जात असल्याची उदाहरणे समोर येत आहे.

### वसुलीसाठी आक्रमक तगादा

कर्जाचा हप्ता वेळेवर न भरल्यास काही कंपन्यांचे वसुली प्रतिनिधी कथितरित्या अत्यंत आक्रमकपणे आणि दबावतंत्राचा वापर करतात. वारंवार घरी भेटी देणे, सार्वजनिक ठिकाणी अपमान करणे, सतत फोन करणे किंवा सामाजिक बहिष्कार टाकण्याची धमकी देणे, असे प्रकार वापरले जातात. एका सदस्याच्या थकबाकीसाठी संपूर्ण गटाला जबाबदार धरून मानसिक दबाव आणला जातो. यामुळे महिला तणावाखाली येतात व हप्ता भरण्यासाठी मिळेल त्या मार्गाने पैसे उभे करतात.

# सराईत चोरट्यास पोलिसांनी ठोकल्या बेड्या

## ४० हजारांचा मुद्देमाल जप्त, शहर पोलिसांच्या डीबी पथकाची कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २१ :** येथील शासकीय रुग्णालयातून वीजवाहक तांब्याच्या तारा चोरणाऱ्या आरोपीला शहर पोलिसांनी अटक केली आहे. तसेच त्याच्याकडून चोरीच्या तारांसह दोन मोबाईल असा अंदाजित ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तो रुग्णालयात यापूर्वीही चोऱ्या करीत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

उमेश लक्ष्मण घुटके (वय ३६) असे अटक करण्यात आलेल्या संशयित चोरट्याचे नाव आहे. शहरातील शासकीय रुग्णालयात झालेल्या चोरीप्रकरणी डॉ. शरद प्रकाश राखुंडे (वय ४१, रा. श्रीकृष्ण नगर, दारव्हा रोड) यांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. चोरट्याने रुग्णालयाच्या परिसरातील पत्रे बाजूला सरकवून आत प्रवेश केला. तेथून विद्युत तार आणि लहान इलेक्ट्रिक डीपीमधील तांब्याची तार असा अंदाजे २० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांनी तात्काळ गुन्हे शोध पथकाला (डी. बी. पथक) तपासाच्या सूचना दिल्या. डी.बी. पथकाने शासकीय रुग्णालय परिसर आणि आसपासच्या परिसरात गुप्त बातमीदार नेमले, स्वतः गस्त घातली आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. यातून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीची ओळख पटवण्यात आली. पोलिसांनी तातडीने सापळा रचून संशयित आरोपी उमेश लक्ष्मण घुटके (वय ३६, रा. तीन खंबे, उमरसरा) याला काही तासांतच शासकीय रुग्णालय परिसरातून ताब्यात घेऊन अटक केली. आरोपी उमेश घुटके याची कसून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीला गेलेली २० हजार रुपये किमतीची विद्युत व तांब्याची तार आणि त्याने इतर वेळी चोरलेले २० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन, असा एकूण ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी घुटके हा सराईत गुन्हेगार असून, यापूर्वीही त्याने शासकीय रुग्णालयातून विद्युत वायर तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांचे मोबाईल चोरल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

# रोजे ठेवणाऱ्या ३६ बालकांचा गौरव सोहळा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**फुलसावंगी, दि. २१ :** येथील जिया मेमोरियल फाउंडेशनतर्फे १८ एप्रिल रोजी एका प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात रमजान महिन्यात पूर्ण रोजे ठेवणाऱ्या ३६ बालकांचा गौरव करण्यात आला. तेरा वर्षांखालील मुलांसाठी आयोजित या स्पर्धेमुळे गावात उत्साहाचे वातावरण होते. जामा मशिदीत झालेल्या या कार्यक्रमात मुलांचे प्रमाणपत्र व स्मृतिचिन्हे देऊन कौतुक करण्यात आले.

फाउंडेशनचे अध्यक्ष मोहम्मद मुसद्दिक यांनी रमजान व रोज्याचे महत्व सांगितले. रोजा म्हणजे केवळ उपाशी राहणे नव्हे, तर वाईट नजरेपासून, वाईट कृत्यांपासून, वाईट मार्गापासून आणि वाईट बोलण्यापासून स्वतःला वाचवणे आहे. ईश्वराचे भय निर्माण करणे हा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हाच संयम वर्षभर टिकवण्यासाठी रोजे प्रशिक्षित करतात. या उपक्रमाचे गावकऱ्यांनी स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जामा मशिदीचे अध्यक्ष नवाब जानी होते. विश्वस्त व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुफ्ती मोहम्मद मुनव्वर यांच्याहस्ते कार्यक्रमाची सांगता झाली.

# मुस्लीम-गवळी समाजाचा सामूहिक विवाह सोहळा उत्साहात

## २८ जोडपी विवाहबद्ध, सर्वधर्मीय बांधवांची उपस्थिती

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**दिग्रस, दि. २१ :** येथील मुस्लीम गवळी समाजातर्फे आयोजित सामूहिक विवाह सोहळ्यात रविवारी (दि. २०) २८ जोडपी विवाहबंधनात अडकली. महेबूबनगर येथे झालेल्या या सोहळ्याला सर्वपक्षीय नेते आणि सर्वधर्मीय नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजाच्या वीस वर्षांच्या परंपरेनुसार अत्यंत साध्या पद्धतीने, कोणताही बडेजाव न करता हे विवाह संपन्न झाले. नवदाम्पत्यांवर शुभेच्छांचा वर्षाव झाला.

या समाजाचे वैशिष्ट्य म्हणजे गरीब-श्रीमंत सर्वजण केवळ सामूहिक सोहळ्यातच विवाह करतात. मौलवी मुहम्मद सादिक आलमगीरी यांच्यासह अनेक उलेमांनी निकाह पठण केले. खा. संजय देशमुख, माणिकराव ठाकरे, आ. साजिद खान पठाण यांनी आयोजकांचे कौतुक केले. या आदर्शवत उपक्रमामुळे समाजात एकोपा टिकून आहे, असे मत व्यक्त करण्यात आले. हैदराबाद, अमरावती, अकोला, बुलढाणासह अनेक शहरांमधून आलेले पाहुणे, वऱ्हाडी मंडळी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुस्लीम गवळी बिरादरीच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# हक्क हिसकाविताना झोप कशी येते-प्रा.पाटील

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नेर (परसोपंत), दि. २१ :** महापुरुषांनी मिळवून दिलेले हक्क व अधिकार हिसकावून घेतले जात असताना बहुजनांना झोप कशी येते, असा संतप्त सवाल प्रा. जगदीश पाटील यांनी केला. नेर येथील संबोधी बुद्ध विहारात यशोधरा महिला मंडळाने आयोजित केलेल्या महात्मा फुले जयंती कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. सत्ताधाऱ्यांकडून बहुजनांना गुलामगिरीकडे ढकलण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, माता रमाई, सावित्रीबाईंनी जीवाचे रान करून बहुजनांना अधिकार मिळवून दिले, याची आठवण पाटील यांनी करून दिली. आज मात्र हे सर्व अधिकार पायदळी तुडवले जात आहेत, असे ते म्हणाले. यावेळी संघमित्रा माने, सुनिता हळदे, प्रा. निलेश मोखाडे यांनीही विचार मांडले. कार्यक्रमाचे संचालन वेणू खोब्रागडे यांनी, तर आभार उज्वला चव्हाण यांनी मानले. माजी सभापती विनायक भोयर, डॉ. शरद मोरे, वनिता मोरे, कोल्हे बाबा, सुनंदा भोयर, विशाखा मेश्राम, संगीता गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक यावेळी उपस्थित होते.

### दगड मारल्याने बेदम मारहाण

**पुसद, दि २१:** काही दिवसांपूर्वी मोटारसायकलवर दगड मारल्याचा जाब विचारल्याने एका व्यक्तीने फिर्यादीला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच, फिर्यादीच्या घरासमोर येऊन धिंगाणा घालत लोखंडी पाईपने कपाळावर मारून जखमी केले. अजय लक्ष्मण शेळके (वय २६, रा. धनकेश्वर नगर) यांच्या फिर्यादीवरून वसंतनगर पोलिसांनी विजय विष्णू गडदे (वय २७, रा. धनकेश्वर नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना धनकेश्वर नगर येथे १८ एप्रिल रोजी रात्री १० वाजता घडली. क्षुल्लक कारणावरून शरीर दुखापतींच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अनेकदा अशा प्रकरणांमध्ये गंभीर स्वरुपाचे गुन्हेही घडतात. त्यामुळे अशा घटनांकडे पोलिस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

# सरपंचपदांसाठी आरक्षण सोडत जाहीर

## २३ व २४ एप्रिल रोजी तालुकास्तरीय सोडतीचा कार्यक्रम होणार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २१ :** जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या आगामी (२०२५-३०) कार्यकाळासाठी सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत जाहीर झाली आहे. ही सोडत प्रक्रिया २३ व २४ एप्रिल रोजी संबंधित तहसील कार्यालयांमध्ये होणार आहे. याद्वारे अनुसूचित जाती, जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि महिलांसाठी राखीव सरपंचपदे निश्चित केली जातील.

जिल्ह्यातील ज्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका ५ मार्च २०२५ ते ४ मार्च २०३० या कालावधीत होणार आहेत. अशा सर्व ग्रामपंचायतींमधील सरपंचपदांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी ही सोडत प्रक्रिया राबविण्यात येत आहे. संविधानातील तरतुदीनुसार आणि शासनाच्या नियमांनुसार, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग (नामाप्र) आणि सर्व प्रवर्गातील महिला यांच्यासाठी सरपंच पदाकरिता आरक्षण ठेवले जाते. हे आरक्षण निश्चित करण्यासाठी सार्वजनिक सोडत काढण्यात येणार आहे. ही सोडत प्रक्रिया संबंधित तालुक्याच्या तहसील कार्यालयात बुधवार (दि. २३) एप्रिल आणि गुरुवार (दि. २४) एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी (नियंत्रण अधिकारी) आणि तहसीलदार (प्राधिकृत अधिकारी) यांच्या प्रमुख उपस्थितीत ही प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडेल.



**तालुकानिहाय सरपंचपदासाठी आरक्षणाची सोडत बुधवारी (दि. २३) यवतमाळ, आर्णी, दारव्हा, पुसद, उमरखेड, राळेगाव, वणी, केळापूर, झरी जामणी होणार आहे. तर गुरुवारी (दि. २४) बाभुळगाव, नेर, दिग्रस, महागाव, कळंब, मारेगाव, घाटंजी या तालुक्यात जाहीर होणार आहे. या महत्वपूर्ण सोडतीच्या वेळी संबंधित नागरिक आणि ग्रामपंचायत सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, जेणेकरून आरक्षण प्रक्रिया सर्वांसमक्ष पारदर्शकपणे पार पडेल. या आरक्षण सोडतीनंतर जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणुकांचे पुढील राजकारण आणि उमेदवारी निश्चितीची प्रक्रिया सुरू होण्यास मदत होईल.**

**- विकास मिना**
**जिल्हाधिकारी, यवतमाळ**

# जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींचे घर ते घर सर्वेक्षण करा : मीना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२१:** जिल्ह्यातील एकही दिव्यांग व्यक्ती शासकीय योजनांच्या नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी त्यांचे घर ते घर सर्वेक्षण करा, असे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले आहेत. दिव्यांग कल्याण विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. सर्वेक्षणाचा खर्च दिव्यांग कल्याण निधीतून करण्याचे त्यांनी सुचवले आहे.

महसूल भवन येथे जिल्हाधिकारी श्री. मीना यांनी दिव्यांग कल्याण विभागाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला जिल्हा परिषदेचे जिल्हा समाजकल्याण अधिकारी पियुष चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता विक्रम शिरभाते, समाजकल्याणचे निरीक्षक व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. उर्वरित दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे तत्काळ द्यावीत, मतिमंद व्यक्तींना कायदेशीर पालकत्व देण्यासाठी मोहीम राबवावी, तसेच समग्र शिक्षा अभियानातील विद्यार्थ्यांची १००टक्के तपासणी पूर्ण करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या. तपासणीत हयगय करणाऱ्यांवर कारवाईचे व ग्रामपंचायतींचा ५टक्के दिव्यांग निधी जमा करण्याचे निर्देशही दिले. यावेळी त्यांनी विविध विभागांमार्फत दिव्यांगांसाठी राबवल्या जाणाऱ्या स्वयंरोजगार, आरोग्य, शिक्षण व इतर योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.

# पाणीटंचाईचा 'आगडोंब' थांबवा!

## आमदार किसनराव वानखेडे; इसापूरचे पाणी ३ दिवसांत शेवटच्या गावापर्यंत पोहोचवा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**✦ संभाजी भोयर**



**उमरखेड, दि.२१ :** इसापूर धरणाचे पाणी पैनगंगा नदीपात्रात सोडूनही ते शेवटच्या गावांपर्यंत न पोहोचल्याने उमरखेड तालुक्यात पाणीप्रश्न गंभीर बनला आहे. यावर आमदार किसनराव वानखेडे यांनी सोमवारी, दि. २१ येथील एसडीओ कार्यालयात तातडीची बैठक घेतली. पाणी अडवणारे पंप व बंधारे हटवून ३ दिवसांत पाणी पोहोचविण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. उमरखेड तालुक्यात पैनगंगा नदीकाठावरील गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. इसापूर धरणातून (सध्या ५२टक्के पाणीसाठा) पाणी सोडण्यात आले असले, तरी ते अद्याप शेवटच्या गावांपर्यंत पोहोचलेले नाही. या गंभीर समस्येवर चर्चा करण्यासाठी आमदार किसनराव वानखेडे यांच्या पुढाकाराने सोमवारी उपविभागीय अधिकारी (एसडीओ) सखाराम मुळे यांच्या दालनात सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची तातडीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आमदार वानखेडे आणि भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी, पाणी सोडूनही शेवटपर्यंत का पोहाचले नाही, याचा जाब अधिकाऱ्यांना विचारला. अनेक गावांतून तक्रारी येत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. यावर तत्काळ उपाययोजना करण्यासाठी पथके निर्माण करून नदीपात्रातील पाणी अडवणारे नाले, बंधारे किंवा शेतकऱ्यांनी लावलेले अनधिकृत मोटार पंप हटविण्याचे निर्देश देण्यात आले. संबंधित शेतकऱ्यांना सूचना देऊन हे अडथळे दूर करण्यास सांगण्यात येणार आहे. तसेच, नदीच्या दोन्ही बाजूंकडील (विदर्भ व मराठवाडा) असे पंप त्वरित बंद करून त्यांचा वीजपुरवठा खंडित करण्याचे निर्देश एसडीओ सखाराम मुळे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले. अनेक गावांमध्ये स्थानिक पातळीवर पाणीपुरवठा विस्कळित (उदा. विहिरीवर पंप नसणे) असल्याने टंचाई भासते, मात्र त्याची शहानिशा करूनच उपाययोजना कराव्यात, असेही मुळे यांनी स्पष्ट केले. आमदार वानखेडे यांनी येत्या तीन दिवसांत पाणी शेवटच्या गावापर्यंत पोहोचलेच पाहिजे, असे कडक निर्देश दिले. तसेच, पुढील दीड महिना अधिकाऱ्यांनी दक्ष राहून पाणीटंचाईचा कृत्रिम 'आगडोंब' होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन केले. या बैठकीस माजी आमदार विजय खडसे, विनायक राणे, सुदर्शन रावते, सावळेश्वर, माणकेश्वर, कोटा तांडा, मुरली येथील नागरिक, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता अभय जगताप, तहसीलदार राजेंद्र सुरडकर, गटविकास अधिकारी किरण कोळपे, महावितरणचे कार्यकारी अभियंता जैन, ऊर्ध्व पैनगंगाचे सचिन मुटकुळे आदी उपस्थित होते.

> 'पाणी नदीपात्रात सुटले आहे, पण शेवटपर्यंत का पोहोचले नाही याच्या कारणमिमांसेसाठी ही बैठक होती. या बैठकीत येत्या तीन दिवसात शंभर टक्के पाणी शेवटच्या मुरली, परोटीपर्यंत पोहोचेल यासाठी कर्मचारी पथके निर्माण करून पाणीपुरवठा केला जाणार आहे.
>
> -नितीन भुतडा
> समन्वयक, भाजपा
> यवतमाळ जिल्हा.

# पोलिसांच्या सीसीटीएनएस कार्याला एडीजी दोरजेंची थाप

## वार्षिक निरीक्षण: मुख्यालय, कळंब, दारव्हा ठाण्यांची पाहणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.२१: सीसीटीएनएस प्रणालीतील उत्कृष्ट कामासाठी यवतमाळ पोलिसांचे कौतुक करत, अपर पोलिस महासंचालक अश्वती दोरजे यांनी जिल्हा पोलिस दलाच्या वार्षिक निरीक्षणाचा नुकताच समारोप केला. सोमवारी, दि.२१एप्रिल रोजी विविध पोलिस ठाणे व मुख्यालयाला भेट देत त्यांनी कामकाजात सुधारणा व आत्मपरीक्षणावर भर दिला.**

**SPECIAL रिपोर्ट**

महाराष्ट्र पोलिस दलातील कार्यपद्धतीची तपासणी आणि सुधारणा करण्याच्या उद्देशाने हे वार्षिक निरीक्षण पार पडले. सोमवारी सकाळी यवतमाळात दाखल झाल्यानंतर एडीजी अश्वती दोरजे यांनी प्रथम पोलिस मुख्यालय आणि मोटार परिवहन विभागाची पाहणी केली. त्यांनी येथील आरोग्यम् पोलिस जीम, कॅन्टीन आणि पेट्रोलपंपाची माहिती घेतली. यापूर्वी तीन दिवस आधीच त्यांचे पथक दाखल झाले होते, ज्यांनी कळंब पोलिस ठाणे आणि पांढरकवडा उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाचे निरीक्षण करून अहवाल सादर केला होता. यात गुन्हे आढावा, कर्मचाऱ्यांच्या सेवा-सुविधा (रजा, पदोन्नती) यांचा समावेश होता. पोलिस अधीक्षक श्री. कुमार चिंता यांच्याशी चर्चा केल्यानंतर एडीजी दोरजे यांनी कळंब पोलिस ठाण्याची पाहणी केली. दुपारी त्यांनी विशेष पोलिस महानिरीक्षक श्री. रामनाथ पोकळे आणि पोलिस अधीक्षक श्री. कुमार चिंता यांच्यासह दारव्हा पोलिस ठाण्याला भेट देऊन तेथील विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी सीसीटीएनएस प्रणालीच्या वापरात यवतमाळ जिल्हा अग्रेसर असल्याने मिळालेल्या पुरस्काराबद्दल अभिनंदन केले. त्यांनी अधिकाऱ्यांशी बोलताना सांगितले की, निरीक्षणाचा उद्देश त्रुटी शोधून तत्काळ उपाययोजना करणे, कार्यक्षमतेचे आत्ममूल्यांकन करणे आणि पोलिस दल अधिक लोकाभिमुख बनवणे हा आहे.



> ‘आपल्या कामातील कमतरता वेळीच ओळखून त्यावर तत्काळ उपाययोजना करा. कार्यक्षमतेचे आत्मपरीक्षण करा आणि आवश्यक त्या सुधारणा घडवून आणा,‘ असा सल्ला एडीजी अश्वती दोरजे यांनी दिला. ‘नागरिकांशी अधिक चांगला संवाद साधा, त्यांच्या समस्या समजून घ्या. पोलिस दल हे अधिक लोकाभिमुख कसे होईल, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.'
>
> -अश्वती दोरजे
> अपर पोलिस महासंचालक, म.रा.

### निरीक्षणाचे मुख्य पैलू

- या वार्षिक निरीक्षणात प्रामुख्याने जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था स्थिती, गुन्हेगारी प्रतिबंध व उकल, पोलिस ठाण्यांचे रेकॉर्ड आणि कामकाज पद्धती, शस्त्रास्त्र हाताळणी, पोलिस कर्मचाऱ्यांचे प्रश्न व सेवा-सुविधा (उदा. रजा, पदोन्नती, निवास), पोलिस मुख्यालय आणि विविध शाखांची (वाहतूक, गुन्हे शाखा इ.) कार्यक्षमता तपासण्यात आली. त्रुटींवर बोट ठेवून सुधारणांसाठी मार्गदर्शन करण्यात आले.

## थोडक्यात

### बॅगेतून दागिने, रोकड लंपास

**दिग्रस:** पोहरादेवी येथून मंगरुळपीर मार्गे परत येत असताना एका महिलेच्या बॅगेतून अज्ञात चोरट्याने सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण एक लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. दिपमाला चौधरी (वय ६१, ह.मु. पुसद) यांच्या तक्रारीवरून दिग्रस पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी मानोरा चौक, दिग्रस येथे आल्यावर बॅगेतील कपडे तपासले असता ही चोरी उघडकीस आली. यात विविध प्रकारचे सोन्याचे दागिने आणि ३१ हजार रुपये रोख रक्कम चोरीला गेली.

### अपघातात चालक जागीच ठार

**दिग्रस :** दारूच्या नशेत भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे मोटारसायकल चालवून उभ्या असलेल्या आयशर वाहनाला मागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाला. मृतक अविनाश अंबादास अंबुरे (वय ४०, रा. वनोली, महागाव) असे नाव आहे. फिर्यादी निखिल सुभाष अंबुरे (वय २४, रा. वनोली) हे मृताचे चुलत भाऊ आहेत. मृतक त्याच्या मोटारसायकलने (क्र. एमएच २९ एवाय २७०१) रोहणादेवी येथील लग्नाचा कार्यक्रम आटोपून घरी जात असताना कळसा गावाजवळ २० एप्रिल रोजी दुपारी हा अपघात झाला.

### नांदेड रोडवरून दुचाकी चोरीला

**उमरखेड :** शहरातील टिपू सुलतान चौक, नांदेड रोड येथून २५ हजार रुपये किमतीची मोटारसायकल (क्र. एमएच २९ एएस ६२८७) अज्ञात चोरट्याने चोरून नेली. डॉ. स्वप्नील प्रभाकर जिवणे (वय ३७, रा. बोरबन) यांच्या फिर्यादीवरून उमरखेड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना १९ एप्रिल रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घडली.

### पिकअपच्या धडकेत तिघे जखमी

**महागाव :** भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे चालवलेल्या पिकअप वाहनाने (क्र. एमएच २६ बीई ७२२०) मोटारसायकलला मागून धडक दिल्याने तिघे जण गंभीर जखमी झाले. जखमींमध्ये विजय अवधूत भारती (वय ४९), त्यांचा मुलगा वेदांत (वय १६) आणि प्रदीप विजय भारती (वय २३) यांचा समावेश आहे. अनमोल गोवर्धन भारती (वय ३७, रा. महागाव) यांच्या फिर्यादीवरून महागाव पोलिसांनी पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## CAPTION कराटे प्रशिक्षण



**यवतमाळ :** जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या संकल्पनेतून महिला सुरक्षा व सक्षमीकरण तसेच महिला, मुलींचा सर्वांगीण विकास होण्याच्या उद्देशाने स्वसंरक्षण, आरोग्य, शैक्षणिक सक्षमीकरणाकरीता ऑपरेशन प्रस्थानव्दारे निवासी शिबिर आयोजित केले होते. यावेळी शिबिराला उपस्थित असलेल्या महिला.

# भाजप शहराध्यक्षपदी सूरज गुप्ता, योगेश पाटील यांची निवड

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २१:** भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) यवतमाळ दक्षिण शहर अध्यक्षपदी सूरज गुप्ता आणि यवतमाळ उत्तर शहर अध्यक्षपदी योगेश पाटील यांची निवड करण्यात आली.

यवतमाळ भाजप जिल्हा कार्यालयात रविवार, दि.२० एप्रिल रोजी पार पडलेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी मंत्री मदन येरावार आणि जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे यांच्या सूचनेनुसार ही निवड करण्यात आली. जिल्हा निवडणूक अधिकारी राजू पडगीलवार यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत यवतमाळ दक्षिणचे निवडणूक अधिकारी प्रफुल्ल चव्हाण आणि यवतमाळ उत्तरचे निवडणूक अधिकारी दत्ता रहाणे यांनी नवनियुक्त अध्यक्षांची घोषणा केली. यावेळी माजी शहराध्यक्ष शंतनू शेटे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष कीर्ती राऊत, विजय खडसे, प्रशांत यादव, अजय बिहाडे, निर्मला विनकरे, ज्ञानेश्वर सुरजुशे, इरफान मलनस, लक्ष्मीकांत लोळगे यांच्यासह जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.



**यवतमाळ : भाजपचे शहराध्यक्ष सर्वश्री सूरज गुप्ता, तसेच योगेश पाटील यांचे स्वागत करताना प्रफुल्ल चव्हाण आणि दत्ता रहाणे.**

# 'ऑपरेशन प्रस्थान'अंतर्गत महिलांना स्वसंरक्षणाचे धडे

## पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांची संकल्पना; निवासी शिबिरात २२८ युवतींचा सहभाग

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.२१:** जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या संकल्पनेतून 'ऑपरेशन प्रस्थान'अंतर्गत २२८ मुली व महिलांसाठी दोन दिवसीय निवासी स्वसंरक्षण (कराटे) शिबिरास सोमवार, दि. २१पासून प्रारंभ झाला. महिला सुरक्षा, सक्षमीकरण आणि सर्वांगीण विकासासाठी आयोजित या शिबिरात कराटे प्रशिक्षणासह कायदेविषयक व आरोग्यविषयक मार्गदर्शनही केले जाणार आहे.

महिला सुरक्षा आणि सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी, तसेच महिला व मुलींचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या संकल्पनेतून 'ऑपरेशन प्रस्थान'हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून, सोमवार (दि. २१) आणि मंगळवार, दि.२२एप्रिल रोजी दोन दिवसीय निवासी स्वसंरक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात १५ ते ३० वयोगटातील एकूण २२८ मुली आणि महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला आहे. या शिबिरात सहभागी युवतींना कराटे प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वसंरक्षणाचे धडे दिले जात आहेत. यवतमाळ जिल्हा कराटे असोसिएशनचे सेक्रेटरी व राष्ट्रीय ब्लॅक बेल्टधारक डॉ. आनंद भुसारी यांच्या प्रमुख मार्गदर्शनात प्रशिक्षकांची चमू कार्यरत आहे. यामध्ये ब्लॅक बेल्टधारक मोहम्मद शेख, नीतेश प्रभू पाली, ज्ञानेश्वर डोईजड, राजदीप जयस्वाल, संजय कोल्हे, संजय पाटील आणि ब्राऊन बेल्टधारक आर्यन जाधव यांचा समावेश असून, ते युवतींना कराटेचे डावपेच शिकवत आहेत. केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिक आणि बौद्धिक सक्षमीकरणावरही या शिबिरात भर देण्यात आला आहे. यासाठी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. ॲड. सीमा तेलंगे यांनी महिलांविषयीच्या कायदेविषयक तरतुदींची माहिती दिली, तर पोलिस निरीक्षक राहुल आठवले (सायबर पोलिस स्टेशन, यवतमाळ) यांनी महिला सक्षमीकरणावर मार्गदर्शन केले. महिलांच्या आरोग्यविषयक अडचणी आणि त्यावरील उपायांसंदर्भात स्त्री-रोग व प्रसूतीतज्ज्ञ डॉ. वृषाली माने यांनी मार्गदर्शन केले. या दोन दिवसीय शिबिरातून युवतींमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचा आणि त्यांना सक्षम बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# आदिवासीबहुल कोपामांडवी गावानेच लावले लेकीचे लग्न थाटात!

## शेतकरी आत्महत्येची पार्श्वभूमी ; गीता चिंचोलकर यांच्या संघर्षाला सलाम, शेतकरी नेते किशोर तिवारी यांची उपस्थिती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**✦ गणेश खडसे**

**यवतमाळ, दि.२१: पतीच्या आत्महत्येने निराधार झालेल्या केळापूर तालुक्यातील श्रीमती गीता चिंचोलकर यांच्या लेकीच्या लग्नात संपूर्ण कोपामांडवी गाव माहेरपणाला धावून आले. रविवारी, दि.२० एप्रिल रोजी शुभ मुहूर्तावर पार पडलेल्या या हृदयस्पर्शी विवाह सोहळ्यात समाजाने उत्स्फूर्त मदत करून लक्ष्मीला आशीर्वाद दिले. याप्रसंगी शेतकरी नेते किशोर तिवारी यांनी उपवर-वधूस शुभाशीर्वाद दिले.**



**यवतमाळ : वधू-वरांना शुभाशीर्वाद देताना शेतकरी नेते किशोर तिवारी व अन्य.**

**विधायक**

विदर्भात १९९६पासून सुरू असलेल्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर, माणुसकीचे अनोखे दर्शन घडवणारी ही घटना आहे. कोपामांडवी येथील शेतकरी श्रावण चिंचोलकर यांनी २००६मध्ये कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केली होती. तेव्हा त्यांची पत्नी गीता अवघ्या १७ वर्षांची होती आणि मुलगी लक्ष्मी सहा महिन्यांची. तेव्हापासून गीता यांनी अत्यंत कष्टाने, मोलमजुरी करून संसार चालवला आणि मुलीला वाढवले. लक्ष्मीच्या लग्नासाठी मराठवाकडी येथील तरुण शेतकरी श्री. कुणाल वाघमारे यांनी पुढाकार घेतला. त्यांनी कोणताही हुंडा न घेता लक्ष्मीशी विवाह करण्याची तयारी दर्शविली, इतकेच नव्हे तर तिला पुढे शिक्षण देण्याची जबाबदारीही स्वीकारली. त्यांच्या या आदर्श भूमिकेमुळे समाजातून मदतीचा ओघ सुरू झाला.

रविवारी कोपामांडवीत झालेल्या लक्ष्मीच्या विवाह सोहळ्याला अक्षरशः संपूर्ण गाव लोटले होते. गावातील महिलांनी लक्ष्मीला आपल्या मुलीप्रमाणेच प्रेम दिले. परिसरातील शेतकरी आणि शेतमजुरांनीही मदतीसाठी हात पुढे केले. याशिवाय नागपूर येथील खुशरू पोचा, आमदार मदन येरावार, अजय संचेती, ग्रँड मराठा फाउंडेशन, खेतानी फाउंडेशन, जगदंबा मंदिर संस्थान, लायका गुरुद्वारा, चंद्रा नाईक, सतीश झांझरिया, सुविधी सुराणा, रोहित पाटील, आमदार संजय देरकर, माजी खासदार हेमंत पाटील, नितीन सरदार यांसारख्या अनेक दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी गीता चिंचोलकर यांना या कार्यासाठी भरीव मदत केली. या अविस्मरणीय सोहळ्याला स्मिता तिवारी, अंकित नैताम आणि शेतकरी विधवांच्या प्रश्नांसाठी नेहमी लढणारे किशोर तिवारी हे देखील उपस्थित होते. एकीकडे समाज एकवटून मदत करत असताना, दुसरीकडे प्रशासन मात्र अशा कुटुंबांसाठी असलेल्या योजना आणि निधीबाबत उदासीन असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली.

### ‘हुंडा नाही, शिक्षण देणार!

- शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलीशी विवाह करताना, मराठवाकडी येथील तरुण शेतकरी श्री. कुणाल वाघमारे यांनी कोणताही हुंडा घेतला नाही. इतकेच नाही, तर त्यांनी लक्ष्मीच्या पुढील शिक्षणाची जबाबदारीही स्वीकारली आहे. त्यांचा हा निर्णय अत्यंत कौतुकास्पद असून, समाजासमोर एक आदर्श निर्माण करणारा आहे.